सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, ३ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक २७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# उद्या निश्चित होणार मुख्यमंत्री

## भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी निर्मला सीतारामन्, विजय रूपाणी निरीक्षक

◆ **नवी दिल्ली, २ डिसेंबर**

भाजपा विधिमंडळ पक्षाचा नवा नेता निवडण्यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक बुधवारी मुंबईत होणार आहे. या बैठकीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् तसेच गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांची नावे जाहीर केली आहे. या बैठकीत महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्याची निवड केली जाणार आहे.

विधानसभा निवडणुकीत विजयी झालेल्या भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांची नुकतीच बैठक झाली. या बैठकीत शिवसेनेचे विधिमंडळ पक्षनेते म्हणून एकनाथ शिंदे, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून अजित पवार यांची निवड झाली. पण, विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून दहा दिवस झाले असतानाही विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक झाली नाही.

महायुतीचा मुख्यमंत्री अद्याप जाहीर झाला नसला, तरी महायुतीच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी आझाद मैदानावर ५ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

निर्मला सीतारामन् आणि विजय रूपाणी आधी आमदारांशी चर्चा करतील, त्यानंतर भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेत्याचे नाव जाहीर करतील. माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आधी भाजपा विधिमंडळ पक्षाचे तसेच नंतर महायुतीचे मुख्यमंत्री म्हणून निवड होईल, अशी चर्चा आहे. विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाल्यानंतर फडणवीस महायुतीतील अन्य पक्षांच्या नेत्यांसह राज्यपाल राधाकृष्णन् यांची भेट घेऊन सरकार स्थापण्याचा दावा करतील. महायुतीच्या सरकारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री, तर शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचा उपमुख्यमंत्री राहणार आहे.

दरम्यान, महायुतीच्या नेत्यांची मंत्रिमंडळाच्या रचनेवर चर्चा करण्यासाठी सोमवारी सायंकाळी होणारी बैठक काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे आज रद्द करावी लागली. आता ही बैठक उद्या मंगळवारी होण्याची शक्यता आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# एकनाथ शिंदे यांच्या सर्व बैठका रद्द

### विश्रांतीसाठी ठाण्यातच राहणार

◆ **मुंबई, २ डिसेंबर**


काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दरे या गावातून रविवारी ठाण्यात दाखल झाले. त्यानंतर सोमवारी त्यांनी शिवसेनेच्या आमदारांची बैठक बोलावली होती. परंतु, ही बैठक पुन्हा रद्द करण्यात आली आहे. तसेच आजच्या इतर सर्व बैठका देखील रद्द करण्यात आल्या आहेत. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिल्यामुळे आज सर्व बैठका रद्द करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

दिल्लीतील बैठकीनंतर आज एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात मुंबईत बैठक होणार होती. या बैठकीत राजकीय घडामोडींवर चर्चा होणार होती. परंतु आज एकनाथ शिंदे यांनी सर्व बैठका रद्द केल्याने महायुतीची बैठक देखील आता लांबणीवर गेली आहे. दरम्यान, देवेंद्र फडणवीसांच्या सागर निवासस्थानी हालचाली वाढल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर नेत्यांनी फडणवीस यांची भेट घेतली. दरम्यान, अजित पवार दिल्लीला गेल्याचे वृत्त आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारातील तेजीने निर्देशांक, निफ्टी वधारले

**मुंबई** : चांगल्या जागतिक संकेतांदरम्यान सोमवारी शेअर बाजारात खरेदी दिसून आली.



दिवसभरातील व्यवहारात निर्देशांक आणि निफ्टी दोन्ही मोठ्या वाढीसह बंद झाले. निफ्टीत १४५ अंकांची वाढ होऊन तो २४,२७६ वर बंद झाला, तर निर्देशांक ४४५ अंकांनी वाढून ८०,२४८ च्या पातळीवर बंद झाला. निर्देशांकातील ३० पैकी २१ शेअर्स तेजीत होते. त्यात अल्ट्राटेक सिमेंट, जेएसडब्ल्यू स्टील, अदानी, टेक महिंद्रा आणि टायटन आदींचा समावेश होता. घसरलेल्या शेअर्समध्ये एनटीपीसी, कोटक बँक, एचयूएल, इंडसइंड बँक आणि पॉवर ग्रीडचा समावेश होता.

### मी उपमुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही : खा.शिंदे

**मुंबई** : राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र, खासदार श्रीकांत शिंदे हे उपमुख्यमंत्री होणार आणि तशी मागणी शिंदे गटाकडून करण्यात आल्याची चर्चा माध्यमांमध्ये आहे. मात्र, मी उपमुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही, असे स्पष्ट करीत, माध्यमांनी अशा चर्चांना पूर्णविराम द्यावा असे आवाहन श्रीकांत शिंदे यांनी केले आहे. खासदार शिंदे यांनी 'एक्स'वरून याबाबतची पोस्ट केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमधून राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये सुरुवातीलाच लिहिले की, महायुतीच्या सरकारचा शपथविधी थोडा लांबल्यामुळे सध्या चर्चा आणि अफवांना पेव फुटले आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोन दिवस गावी विश्रांती घेतली. त्यामुळे अफवांना अधिकच बहर आला. मी उपमुख्यमंत्री होणार अशा बातम्या प्रश्नचिन्हे टाकून गेले दोन दिवस दिल्या जात आहेत. वस्तुतः यात कोणतेही तथ्य नसून, माझ्या उपमुख्यमंत्रिपदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत. माध्यमांचा उत्साह आणि स्पर्धा आम्ही समजू शकतो, परंतु बातम्या देताना त्यांनी वास्तवाकडे पाठ फिरवू नये, अशी माझी विनंती आहे.

### शरद गटाचे खा. म्हात्रे फडणवीसांच्या भेटीला

**मुंबई** : आता पुढील पाच वर्षे राज्यात आणि केंद्रात महायुतीची सत्ता असणार आहे. या पृष्ठभूमीवर आता महाराष्ट्रात नवी राजकीय समीकरणे आकाराला येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कारण, सागर बंगल्यावर सोमवारी दुपारी शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी हजर झाले. सुरेश म्हात्रे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. मे महिन्यात झालेल्या निवडणुकीत सुरेश म्हात्रे हे कपिल पाटील यांचा पराभव करीत 'जायंट किलर' ठरले होते. मात्र, आता विधानसभेच्या निकालानंतर सुरेश म्हात्रे अचानक देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर पोहोचल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, या भेटीचा नेमका तपशील अद्याप समोर आलेला नाही. सुरेश म्हात्रे यांनी आपण देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी आल्याचे सांगितले. येत्या ५ तारखेला मुंबईतील आझाद मैदानावर महायुती सरकारचा शपथविधी होणार असल्याची माहिती आहे.

### सुंदर पिचाईंना मुंबई कोर्टाची नोटीस

**मुंबई** : जगातील सर्वांत मोठ्या टेक कंपन्यांपैकी एक असलेल्या गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांना मुंबईतील न्यायालयाने अवमान नोटीस पाठवली आहे. गुगलच्या व्हिडीओ स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्म युट्यूबने न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे ही नोटीस पाठवण्यात आली आहे. न्यायालयाने याआधी युट्यूबला ध्यान फाऊंडेशनचे संस्थापक योगी अश्विनी यांना लक्ष्य करणारे बदनामीकारक व्हिडीओ काढून टाकण्याचे आदेश दिले होते होते आणि युट्यूबने या आदेशाचे पालन केले नाही.



संसद संकुलात सोमवारी 'द साबरमती रिपोर्ट' चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव

# इस्कॉनच्या ५४ सदस्यांना भारतात येण्यापासून रोखले

### बांगलादेशची दडपशाही सुरूच

◆ **ढाका, २ डिसेंबर**

बांगलादेश सरकारची देशातील हिंदूंच्या विरोधात दडपशाही सुरूच आहे. आता वैध प्रवासी कागदपत्रे असूनही बांगलादेशच्या सीमा अधिकाऱ्यांनी इस्कॉनच्या ५४ सदस्यांना भारतात जाण्यापासून सीमेवर रोखले.

बांगलादेशाच्या विविध जिल्ह्यांतील भाविकांसह इस्कॉनचे ५४ सदस्य शनिवारी रात्री आणि रविवारी सकाळी बेनापोल बॉर्डर क्रॉसिंगवर दाखल झाले होते. पण, त्यांना तेथे अनेक तास ताटकळत ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांना त्यांच्याकडे प्रवास करण्यासाठी अधिकृत परवानगी नसल्याचे सांगण्यात आले.

बांगलादेश सरकारने इस्कॉन संस्थेला लक्ष्य केले आहे. या संस्थेशी संबंधित पुजाऱ्यांना अटक करणे आणि त्यांची बँक खाती गोठवण्यात आल्याचे याआधी उघडकीस आले आहे. आता त्यांना भारतात जाण्यापासून रोखण्यात आले आहे. इमिग्रेशन पोलिस अधिकाऱ्यांनी बांगलादेशी वृत्तपत्र डेली स्टारशी बोलताना सांगितले की, त्यांना उच्चस्तरावरून इस्कॉनच्या सदस्यांना भारतात जाण्यासाठी परवानगी न देण्याच्या सूचना मिळाल्या आहेत.

बेनापोल इमिग्रेशन पोलिस अधिकारी इम्तियाज अहसानुल कादर भुईया यांनी सांगितले की, आम्ही पोलिसांच्या विशेष विभागाकडे सल्लामसलत केली आहे आणि त्यांना सीमा ओलांडण्याची परवानगी न देण्याच्या सूचना आम्हाला उच्च अधिकाऱ्यांकडून मिळाल्या आहेत. सीमेवरील पोलिस अधिकाऱ्यांनी दावा केला की, इस्कॉन सदस्यांना भारतात धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित राहायचे आहे. त्यांच्याकडे वैध पासपोर्ट आणि व्हिसादेखील आहे. पण, त्यांना आवश्यक असलेली विशिष्ट सरकारी परवानगी मिळालेली नाही. ते या परवानगीशिवाय सीमापार जाऊ शकत नाहीत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

> **इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी सीमेवर रोखले**
>
> इस्कॉनचे सदस्य असलेले सौरभ तपंदर चेली म्हणाले, आम्ही भारतात होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निघालो होतो. पण, आम्हाला सरकारी परवानगी नसल्याचे कारण देत इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी सीमेवर रोखले.

# संसदेचे कामकाज सुरळीत चालणार

### सत्ताधारी-विरोधकांत मतैक्य

◆ **नवी दिल्ली, २ डिसेंबर**

संसदेत निर्माण झालेला गतिरोध दूर करण्यासाठी सोमवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत सहमती झाल्यामुळे उद्या मंगळवारपासून दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरळीत चालण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सदस्यांनी सभागृहाचे कामकाज सुररळीत चालू द्यावे, जनतेशी संबंधित मुद्दे सभागृहात उपस्थित करण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी या बैठकीत केले. त्याला सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सहमती दर्शवली आणि सभागृहाच्या कामकाजात निर्माण झालेला गतिरोध दूर करण्याचे आश्वासन दिले. यामुळे उद्यापासून संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरळीत चालेल, असा विश्वास सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी व्यक्त केला.

ओम बिर्ला यांनी बोलावलेल्या या बैठकीला सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, काँग्रेसचे गौरव गोगोई, शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, द्रमुकचे टी. आर. बालू, सपाचे धर्मेंद्र यादव, तृणमूल काँग्रेसतर्फे कल्याण बॅनर्जी, उबाठाचे अरविंद सावंत, माकपचे के. राधाकृष्णन, राजदचे अभय कुशवाह आणि जदयुचे दिलैस्वर कामत उपस्थित होते.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे पहिल्या आठवड्यात काहीच कामकाज होऊ शकले नाही. प्रश्नोत्तराचा तसेच शून्य तास झाला नाही.

संविधानाचा स्वीकार करण्याला ७५ वर्षे पूर्ण झाली आहे, त्यानिमित्त संसदेच्या दोन्ही सभागृहात संविधानावर विशेष चर्चा होणार आहे. लोकसभेत ही चर्चा १३ आणि १४ डिसेंबरला, तर राज्यसभेत १६ आणि १७ डिसेंबरला होऊ शकते. भारतीय संविधानाचे मूलबूत सिद्धांत आणि देशाच्या प्रगती आणि विकासात त्याचे योगदान या मुद्यांवर ही चर्चा होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन्ही सभागृहातील चर्चेला उत्तर देऊ शकतात. ◂(तभा वृत्तसेवा)

### लोकसभा महासचिव म्हणून उत्पलकुमार यांना मुदतवाढ

**नवी दिल्ली** : लोकसभेचे महासचिव उत्पलकुमारसिंह यांना वर्षभराची मुदतवाढ मिळाली आहे. विद्यमान अटी आणि शर्तीवरच लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी उत्पलकुमार सिंह यांना कॅबिनेट सचिव समकक्ष पदावर लोकसभा महासचिव म्हणून मुदतवाढ दिली. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत त्यांचा कार्यकाळ राहणार आहे. उत्तराखंड कॅडरचे १९८६ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असलेले उत्पलकुमार सिंह यांनी उत्तराखंड सरकारचे मुख्य सचिव म्हणून काम केले.

# २६ राफेल-एम जेट खरेदीसाठी जानेवारीत करार

◆ **नवी दिल्ली, २ डिसेंबर**

नौदलासाठी २६ राफेल लढाऊ विमान आणि तीन अतिरिक्त स्कॉर्पिन पाणबुड्यांच्या प्रस्तावित खरेदीसाठी भारत जानेवारी महिन्यात करार करणार आहे, अशी माहिती नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांनी सोमवारी दिली.



दोन एसएसएनसाठी (अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या) मिळालेली मंजुरी हे दर्शवते की, सरकारला अशा नौकांच्या निर्मितीसाठी स्वदेशी क्षमतांवर विश्वास आहे, असे दिनेश त्रिपाठी यांनी नौदल दिनापूर्वी पत्रपरिषदेत सांगितले. नौदल शक्ती वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून देशात सध्या ६३ नौका आणि पाणबुड्यांची बांधणी सुरू आहे. एक वर्षात मोठ्या संख्येने मंच नौदलात सहभागी होण्याच्या प्रतीक्षेत असतील, तसेच एका नौकेचा नौदलात समावेश केला जाईल, असे त्रिपाठी यांनी सांगितले. सैन्यात विशिष्ट तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी आम्ही प्रयत्न दुप्पट केले आहेत. राफेल-एम आणि स्कॉर्पिन पाणबुड्यांच्या खरेदीला पुढील महिन्यात अंतिम स्वरूप दिले जाण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील वर्षी जुलैमध्ये संरक्षण मंत्रालयाने फ्रान्सकडून राफेल-एम जेट खरेदी करण्यात मान्यता दिली. ही विमाने प्रामुख्याने स्वदेशी बनावटीची विमानवाहू नौका आयएनएस विक्रांतवर तैनात केली जातील. भारतीय नौदल शेजारील देशांकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी सज्ज आहे, असे त्रिपाठी पाकिस्तानच्या सागरी सामर्थ्य वाढवण्याच्या प्रयत्नांबद्दल म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# शेतकऱ्यांसाठी 'फार्मर आयडी कार्ड'

### केंद्र सरकारचा पुढाकार

◆ **नवी दिल्ली, २ डिसेंबर**

देशभरातील शेतकऱ्यांना डिजिटल कृषी मिशन अंतर्गत डिजिटल ओळख देण्यासाठी केंद्र सरकारने फार्मर आयडी तयार करण्याची योजना आखली आहे. याद्वारे ११ कोटी शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्र देण्यात येणार आहे. या एकाच कार्डद्वारे शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी, किसान क्रेडिट कार्ड आणि पीकविक्रीसारख्या सुविधांचा लाभ घेता येईल.



कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने २८ नोव्हेंबर रोजी सर्व राज्यांना पत्र पाठवून शेतकरी ओळखपत्र तयार करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित निर्देश दिले आहेत. वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये ६ कोटी, २०२५-२६ मध्ये ३ कोटी, तर २०२६-२७ मध्ये २ कोटी शेतकऱ्यांना या योजनेत समाविष्ट करण्यात येईल.

हे ओळखपत्र आधारशी लिंक केलेले असेल, जे शेतकऱ्यांच्या जमीन नोंदींशी जोडले जाईल. या कार्डमध्ये शेतकऱ्यांच्या वैयक्तिक माहितीबरोबरच पेरणी केलेल्या पिकांची माहिती आणि जमिनीचा तपशील नोंदवला आहे. या कार्डमुळे शेतकऱ्यांना हमीभाव योजनांसाठी अर्ज करताना आवश्यक असलेल्या तपासण्या सुलभ होतील. ◂(वृत्तसंस्था)

> **शेतकरी आयडीवरून तयार करणार शेतकरी रजिस्ट्री**
>
> कृषी मंत्रालय शेतकरी आयडी कार्डच्या मदतीने शेतकरी नोंदणी तयार करणार आहे, जे केंद्र सरकारच्या डिजिटल कृषी मिशनच्या अंतर्गत 'ॲग्री स्टॅक'चा भाग होईल. यासाठी यावर्षीच्या सुरुवातीस केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी होती. या योजनेसह शेतकऱ्यांना त्यांच्या डिजिटल ओळखीचा वेगाने लाभ मिळेल आणि कृषी क्षेत्रातील डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये मजबुती येईल.

# व्लादिमिर पुतिन भारत दौऱ्यावर येणार

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून निमंत्रण

◆ **मॉस्को, २ डिसेंबर**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून भारत भेटीचे आमंत्रण देण्यात आले आहे. त्यांच्या भारत दौऱ्याच्या तारखा २०२५ च्या सुरुवातीला निश्चित केल्या जातील, अशी माहिती क्रेमलिनचे सहकारी युरी उशाकोव्ह यांनी दिली. आम्हाला भारताकडून नरेंद्र मोदींचे आमंत्रण मिळाले आहे. आम्ही त्याचा निश्चितच सकारात्मक विचार करू. पुढील वर्षीच्या सुरुवातीला आम्ही तात्पुरत्या तारखा ठरवू, असे उशाकोव्ह यांनी म्हटले.

२०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. व्लादिमिर पुतिन यांनी ६ डिसेंबर २०२१ रोजी नवी दिल्ली येथे नरेंद्र मोदी यांच्यासोबत २१ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी शेवटचा भारत दौरा केला होता. पुतिन यांच्या दौऱ्याबाबत भारताने अद्याप अधिकृतपणे प्रतिक्रिया दिलेली नाही.

२२-२३ ऑक्टोबर रोजी नरेंद्र मोदींनी रशियाला भेट दिली होती. त्यानंतर पुतिन यांच्या बहुप्रतीक्षित भारत भेटीची चर्चा सुरू झाली होती. मोदी रशियन फेडरेशनच्या अध्यक्षतेखाली कझान येथे झालेल्या १६ व्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी रशियाला गेले. पंतप्रधान मोदींनी या वर्षी जुलैमध्ये मॉस्कोलाही भेट दिली होती, २०२४ मधील त्यांची पहिलीच भेट होती. २२ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेच्या पृष्ठभूमीवर ही भेट झाली होती.

युक्रेनमधील कथित युद्ध गुन्ह्यासाठी आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने पुतिन यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. ◂(वृत्तसंस्था)



# सूर्याची रहस्ये इस्रो उलगडणार!

### प्रोबा-३ मोहिमेसाठी सज्ज

◆ **बंगळुरू, २ डिसेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) पुन्हा एकदा इतिहास रचण्याच्या तयारीत आहे. सूर्याची रहस्ये उलगडण्यासाठी प्रक्षेपित करण्यात येणारी मोहीम प्रोबा-३ साठी इस्रो सज्ज आहे. या संदर्भातील माहिती इस्रोने त्यांच्या अधिकृत 'एक्स' अकाऊंटवरून दिली आहे.

सूर्याचे रहस्य उलगडण्यात अनेक देश गुंतले आहेत. इस्रोदेखील या शर्यतीत पीएसएलव्ही-एक्सएल प्रोबा-३ प्रक्षेपित करून महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. बुधवारी पीएसएलव्ही-एक्सएलमधून प्रोबा-३ या मोहिमेचे प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या मोहिमेत अनेक देशांतील शास्त्रज्ञ सामील आहेत आणि त्यांचे ध्येय साध्य करण्याची संपूर्ण जबाबदारी इस्रोच्या सर्वांत विश्वासार्ह ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहनावर म्हणजेच पीएसएलव्हीवर आहे.

इस्रोने या मोहिमेविषयी म्हटले की, युरोपियन स्पेस एजन्सीच्या (ईएसए) प्रोबा-३ मिशनचे प्रक्षेपण बुधवारी सायंकाळी ४:०८ वाजता आंध्रप्रदेशातील श्रीहरिकोटा अंतराळ केंद्रावरून केले जाईल. प्रोबा-३ ची व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लि. च्या (एनएसआयएल) सहकार्याने ही मोहीम प्रक्षेपित होणार आहे. यासोबतच इस्रोने समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, या मोहिमेद्वारे ५५० किलो वजनाचे उपग्रह एका अद्वितीय उच्च लंबवर्तुळाकार कक्षेत ठेवले जातील. जे जटिल कक्षेत अचूक प्रक्षेपण करण्यासाठी ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन पीएसएलव्ही-एक्सएलची विश्वासार्हता मजबूत करेल. या मोहिमेअंतर्गत, युरोपियन एजन्सीला सूर्याच्या वातावरणातील सर्वांत बाहेरील आणि सर्वांत उष्ण थर असलेल्या सौर कोरोनाचा अभ्यास करायचा आहे.

**कृत्रिम सूर्यग्रहणाचा प्रयोग**


प्रोबा-३ मिशनमध्ये प्रक्षेपित करण्यात आलेले उपग्रह कृत्रिम सूर्यग्रहणासाठी परिस्थिती निर्माण करतील जेणेकरून सूर्याच्या बाह्य थराचा म्हणजेच कोरोनाचा अभ्यास करता येईल. या दुहेरी उपग्रहांपैकी एका उपग्रहामध्ये कोरोनग्राफ असेल तर दुसऱ्या उपग्रहामध्ये बदल असेल. यापैकी एक उपग्रह सूर्य लपवेल, तर दुसऱ्याच्या मदतीने कोरोनाचे निरीक्षण केले जाईल, असेही इस्रोने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

> **प्रोबा-३ ची वैशिष्ट्ये**
>
> प्रोबा-३ हे मिशन इस्रो आणि युरोपियन अंतराळ संस्था यांच्यातील महत्त्वपूर्ण सहकार्य चिन्हांकित करते. ज्याचा उद्देश सौर वातावरणाचा बाह्य स्तर म्हणजे कोरोनाचा अभ्यास करणे. हा सौर गतिशीलता आणि अवकाशातील हवामान घटना समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. हा उपग्रह अवकाशात अत्यंत लंबवर्तुळाकार कक्षेत अंदाजे १५० मीटरने वेगळा होईल. ज्याठिकाणी उपग्रह सूर्यप्रकाश रोखू शकेल. प्रक्षेपित झाल्यानंतर सेटअप सहा तासांनंतर सतत निरीक्षणे नोंदवण्यात येतील, असे इस्रोने म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### काँग्रेसची ईव्हीएम विरोधात सह्याची मोहीम ५ डिसेंबरपासून


**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचे निकाल राज्यातील जनतेसाठी अतिशय धक्कादायक, अविश्वसनीय व अकल्पनीय आहेत. लोकसभा निवडणुकीतील निकालाच्या एकदम उलट निकाल कसे काय लागू असतात असा प्रश्न राज्यकीय नेते कार्यकर्ते यांच्यासह पत्रकार, राजकीय विश्लेषक, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनाही पडला आहे. ईव्हीएम संदर्भातही अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन यांनी इथून पुढच्या निवडणुका मतपत्रिकेवर (बॅलेट पेपरवर) घेतल्या जाव्यात अशी मागणी केली आहे. समाजातील मोठ्या वर्गाचीही हीच मागणी आहे. यासाठी काँगेस पक्षाच्या माध्यमातून सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात यासाठी दि. ५ ते २० डिसेंबर या कालावधीत सह्यांची मोहिम राबविण्यात येणार आहे.

### उमा महाविद्यालयात आविष्कार महोत्सवाचे आयोजन

**पंढरपूर,दि.२ डिसेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत उमा महाविद्यालयामध्ये आविष्कार महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ, उमा महाविद्यालयाचे विश्वस्त अ‍ॅड. प्रणव परिचारक यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास परिक्षक म्हणून प्रा. डॉ. डांगे डी. एफ. व डॉ. अनंतकवळस उपस्थित होते.आविष्कार महोत्सव २०२४ मध्ये महाविद्यालयातील विविध विभागतील विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादरीकरण केले. या संशोधन पेपर मध्ये कृषि, वाणिज्य, साहित्य, अर्थ आणि सामाजिकशास्त्रे या विविध क्षेत्रातील संशोधन पेपर समाविष्ट होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आप्पासाहेब चौगुले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ. गोविंद भोसले यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते




### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्याध्यक्षपदी स्वामीनाथ हेगडे यांची निवड

**अक्कलकोट दि २ डिसेंबर**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ या संघटनेच्या अक्कलकोट तालुका कार्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते स्वामीनाथ हेगडे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले आहे. सदरची निवड ही दिनांक एक डिसेंबर २०२४ ते पुढील तीन वर्षापर्यंत राहणार आहे. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे तालुका कार्याध्यक्ष स्वामीनाथ हेगडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक राजकीय क्षेत्रात काम करत आहेत. सध्या ते शिवसेना कामगार सेनेचे तालुकाप्रमुख म्हणून काम करत आहेत. स्वामीनाथ हेगडे यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. यावेळी बोलताना स्वामीनाथ हेगडे यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्यांवर आवाज उठविणार असल्याचे सांगितले.





### भारतीय जैन संघटना राज्याध्यक्षपदी केतन शहा यांची निवड

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

भारतीय जैन संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशन पुणे येथील वर्धमान सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आले होते. देशभरातून ३००० जैन बांधव ह्या अधिवेशन मध्ये उपस्थित होते,उदघाटन प्रसंगी देवेंद्र फडवणीस,शरद पवार,उड्डायन मंत्री मुरलीधर मोहोळ, विजयबाबू दर्डा, सिनेअभिनेता अमीर खान, प्रकाश धारिवाल आदी मान्यवर उपस्थित होते. अधिवेशन च्या दुसऱ्या दिवशी सोलापूरचे समाज सेवक व सोलापूर रत्न केतनभाई शहा यांची महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी नेमणूक बि जे एस चे संस्थापक शांतीलाजी मुथा यानी केली व राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रजी लुंकड यांनी नेमणुकीचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले. तसेच राज्याचे महासचिव म्हणून प्रवीण पारख,छत्रपती संभाजीनगर याची नेमणूक करण्यात आली. राज्यभरात भारतीय जैन संघटनेचे १२ विभागात १२ विभागीय अध्यक्ष व ३६ जिल्हा अध्यक्षा ची नेमणूक करण्यात आली असून शेकडो पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते कार्यरत आहेत, ४८५ शाखा शहर व ग्रामीण भागात असून सर्व शाखेतून अनेक सामाजिक कार्य समाज बांधव करत आहेत. नूतन राज्याध्यक्ष केतन शहा हे अनेक सामाजिक संस्थे मध्ये आपली सेवा देत असून प्रामुख्याने महाराष्ट्र चेंबर, विकास मंच, इलेक्ट्रॉनिक्स डीलर्स असोशिएशन, प्रणिक्लेश समिती, रेल्वे व विमानतळ सल्लागार समिती, पार्क रोड शोरूम्स असोशिएशन, जैन सोशल ग्रुप आदींनी नूतन राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला व सचिव दीपक चोपडा,माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रफ्फुल पारख यांनी त्याचे अभिनंदन केले.

# शहरातील मुख्य रस्त्यांच्या विशेष स्वच्छता मोहिमेस प्रारंभ

## महापालिकेच्या विविध विभागांचा सक्रिय सहभाग

## रस्ते, दुभाजकासह फुटपाथही केला चकाचक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपलिकेच्या वतीने दि. २ ते १२ डिसेंबर २०२४ दरम्यान राबविण्यात येत असलेल्या शहरातील मुख्य रस्त्यांच्या विशेष स्वच्छता मोहिमेस आज प्रारंभ करण्यात आला. रस्ते, दुभाजकासह फुटपाथही चकाचक करण्यात आले.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून त्याची सुरुवात आज विभागीय कार्यालय क्रमांक एक मधील छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान मोहिमेची सुरुवात करण्यात आली. नियंत्रण अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते या विशेष मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.




या वेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी उपस्थित असलेले सर्व स्वच्छता कर्मचारी यांना मोहिमेबद्दल मार्गदर्शन केले. विभागीय कार्यालय क्रमांक तीन मध्ये अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या नियंत्रणाखाली बलिदान चौक ते विश्रांती चौक, विभागीय कार्यालय क्रमांक चार मध्ये उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या नियंत्रणाखाली सत्तर फूट रोड चौक ते आकाशवाणी केंद्र, विभागीय कार्यालय क्रमांक पाच मध्ये उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली नई जिंदगी चौक ते रुद्रमणी चौक, सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील यांच्या नियंत्रणाखाली विभागीय कार्यालय क्रमांक दोन मधील विश्रांती चौक ते रूपाभवानी चौक, विभागीय कार्यलय सहा मध्ये सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांच्या नियंत्रणाखाली अशोक नगर ते आरटीओ ऑफिस, विभागीय कर्यालय सात मधील सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली भगवान महावीर चौक ते पत्रकार भवन व विभागीय कार्यालय आठ मध्ये सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्या नियंत्रणाखाली रंगभवन चौक ते सात रस्ता दरम्यान स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेत मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, विभागीय अधिकारी नंदकुमार जागधनी, विभागीय अधिकारी नागनाथ बाबर, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर, उपअभियंता तपन डंके, उपअभियंता किशोर सातपुते, सहाय्यक अभियंता विद्युत महादेव इंगळे, सहाय्यक अभियंता अविनाश वाघमारे, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक व सर्व स्वच्छता कामगार आदी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### महापालिकेतील या विभागांचा होता सहभाग

या मोहिमेमध्ये महापालिकेच्या नगर अभियंता विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग, उद्यान विभाग, संगणक विभाग, सर्व विभागीय कार्यालय या विभागांनी मोहिमेमध्ये सहभागी होऊन आपल्या आपल्या विभागाशी निगडीत असलेले कामकाज पार पाडले.

### अशी केली नेटकी स्वच्छता

या मोहिमेमध्ये शहरातील मुख्य रस्ते निवडण्यात आले आहेत. त्या मधील दुभाजकाकडील माती काढणे, फुटपाथ वरील अनावश्यक गवत, झाडी तसेच कचरा, डिव्हाईडर मधील लाईट पोल वरील कुजलेले बोर्ड व स्टिकर, डिव्हाईडर मधील झाडांची छाटणी करणे तसेच फुटपाथ वरील दोन्ही बाजूची स्वच्छता करण्यात आली. ही मोहीम १२ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येणार असून नेमलेले नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यावरील स्वच्छता मोहीम घेण्यात येणार आहे.

# अक्कलकोट शहरात कुत्र्यांवर विषप्रयोग

## शहरात खळबळ; प्राणीमित्र संघटनेकडून गंभीर दखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.२ डिसेंबर -**

अक्कलकोट शहरात दिनांक २९ व ३० नोव्हेंबर रोजी मोकाट वावरणाऱ्या जवळपास शंभर कुत्र्यांवर विष प्रयोग झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात कुत्रे मृत्यू पावल्याने शहरात खळबळ उडाली आहे. याची गंभीर दखल आता पाल निमल वेल्फेअर फाउंडेशन या प्राणी मित्र संघटनेने घेतली असून शहरातील प्राणीप्रेमी ही आक्रमक झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

या प्रकरणाची संपूर्ण सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे. यातील काही कुत्र्यांनी जरी चावा घेतलेला असला तरी त्याचा बंदोबस्त अन्य मार्गाने करण्याची सोय सरकारने केली असताना अशा पद्धतीने प्राण्यांना मारणे हे अत्यंत चुकीचे असल्याची प्रतिक्रिया शहरवासीयातून व्यक्त होत आहे. दि.२९ नोव्हेंबर तारखेपासून शहरात वेगवेगळ्या चौकांमध्ये आणि गल्लीमध्ये कुत्रे हे मोठ्या प्रमाणात तडफडून मरत आहेत. त्यांच्या तोंडातून काळी लाळ बाहेर येत आहे. ही घटना शहरात सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर प्राणीमात्रावर प्रेम करणाऱ्या युवकांनी एकत्र येत नगरपालिका आणि पशुवैद्यकीय विभाग गाठले. त्याची चौकशी केली.मात्र या दोन्ही विभागाकडून आम्हाला याबाबत काहीच कल्पना नसल्याचे सांगण्यात आल्याने तरुण चांगलेच आक्रमक झाले.याबाबत चौकशी करू, अशी उत्तरे मिळाल्याचे या तरुणांनी सांगितले. यानंतर त्यांनी थेट मुंबईच्या पाल निमल वेल्फेअर फाउंडेशन या संघटनेकडे तक्रार करत या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणी केली आहे. दरम्यान या प्रकरणातील आरोपींचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे. त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे. या संदर्भात अज्ञात व्यक्तीवर गुन्हा देखील दाखल झाला असून हे प्रकरण अद्याप तरी संशयास्पद स्थितीमध्ये आहे.या घटनेची जबाबदारी अद्याप कोणीही घेतलेली नाही त्यामुळे हे कुत्रे नेमकी कशामुळे मेली याबाबतचा तपास अद्याप होऊ शकला नाही. माणुसकीच्या नात्याने काही कुत्र्यांवर आतिश कटारे, शीतल फुटाणे, महेश धोंगडे, समर्थ हत्ते, समर्थ घाटगे,राहुल मोरे, अनिल पाटील, राकेश कानडे, रोहित मोरे, आकाश जमादार या तरुणांनी एकत्र येत अंत्यसंस्कार केले.यातील काही कुत्र्यांचा पोस्टमार्टम झाला असून त्याचा तपासणीसाठी नमुने प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले आहेत.आता हा अहवाल आल्यानंतरच आपल्याला हे कुत्रे इतके मोठ्या प्रमाणात का मेले याचा तपास लागू शकेल, असे तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दिनेश मुरूमकर यांनी सांगितले. दरम्यान जे कुत्रे मरून पडले ते कुत्रे शहराच्या आजूबाजूला जेसीबीने खड्डा खोदून पुरले असल्याची माहिती या तरुणांनी दिली आहे.त्यामुळे हा प्रकार नक्कीच संशयास्पद आणि धक्कादायक असल्याने या प्रकरणाच्या तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### नगरपरिषदेकडून माहिती मागवली

यासंदर्भात आम्ही नगरपरिषदेकडे विचारणा केली आहे. उद्या पर्यंत ते माहिती देणार आहेत. जर त्यांची माहिती आम्हाला चुकीची आणि नियमबाह्य वाटली तर त्यांना आम्ही लीगल नोटीस देणार आहोत. त्याशिवाय या प्रकरणाचा तपास त्वरित न लागल्यास आंदोलन करू आणि शहरामध्ये कॅण्डल मार्च काढून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करू.

**- रोशन पाठक, पाल निमल वेल्फेअर फाउंडेशन, मुंबई**

### प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे

कुठल्याही प्राण्यांना अशा पद्धतीने मारता येत नाही. त्याला सरकारकडूनच बंदी आहे. पण एकाच वेळी शहरात अशा पद्धतीने कुत्रे मरून पडणे नक्कीच संशयास्पद आणि धक्कादायक प्रकार आहे त्यामुळे आम्ही सर्वजण मिळून ही तक्रार केली आहे. झालेला संपूर्ण प्रकार चुकीचा आणि नियमबाह्य आहे.

**- अतिष कटारे, प्राणीमित्र संघटना**



### पन्नासहून अधिक श्वानांचा संशयास्पद मृत्यू; निषेध करत नागरिकांचे नगरपालिकेला निवेदन

**अक्कलकोट दि. २ डिसेंबर-**

शहरातील ५० हून अधिक श्वानांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे निदर्शनास आल्याने नगरपालिका कडे नागरिकाच्या वतीने निवेदन देण्यात आले . घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला . नगरपालिका गेटसमोरच श्वानांच्या प्रतित्मातक प्रतीमसेस श्रध्दांजली वाहण्यात आली.

अक्कलकोट शहरात २९ व ३० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत शहरातील कारंजा चौक, जुना अडत बाजार, विजय कामगार चौक, एसटी स्थानक व विविध इतर भागात ५०च्या हून अधिक श्वानांचा अज्ञात व्यक्तीने चिकन व इतर खाद्य पदार्थ द्वारे विष देऊन अत्यंत निर्दयीपणे जीवे मारण्यात आला याबाबत शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सोलापूर जिल्हासंपर्कप्रमुख अनीलजी कोकीळ, जिल्हाप्रमुख अमर अण्णा पाटील व तालुका प्रमुख आनंद . बुक्कानुरे यांच्या सूचनेनुसार शिवसेना अक्कलकोट शहर यांच्याकडून संभाजीराजे चौक सामजिक मित्र मंडळ, श्रीमंत नवश्या गणपती मित्र परिवार,जय हनुमान मित्र मंडळ व इतर सामाजिक संघटनेने अक्कलकोट नगरपालिकाकडे निवेदन दिले.

यावेळी शिवसेना अक्कलकोट शहरप्रमूख सिध्दाराम गुब्याड, संभाजीराजे चौक सामजिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप बनसोडे, शिवशरण चौगुले, अमृत सरवदे,विश्वनाथ सोलंकर, पुंडलीक लाळसंगी, सागर राठोड, राहूल मधूरकर, शरणु किणीकर, समर्थ गवंडी, स्वामिनाथ माळी, अर्जुन ऐवाळे, तिम्मन्ना आळविकर, नितीन चौगुले, शैलेश टोणपे, सिद्राम आळविकर, मारुती पवार, दीपक चौगुले, प्राणी प्रेमी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनसेच्या अविनाश जाधव यांचा २४ तासांत यु-टर्न

## राजीनामा घेतला मागे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.२ डिसेंबर -**

विधानसभा निवडणुकीतील दारू पराभवाची जबाबदारी स्वीकारत ठाणे जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देणाऱ्या मनसेच्या अविनाश जाधव यांनी यु टर्न घेतला आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या सूचनेनुसार आपण पूर्वीप्रमाणेच पक्षासाठी कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी एक्स वर म्हटले आहे.

जाधव यांनी ठाणे , पालघरमधील पराभवाची जबाबदारी स्वीकारत राजीनामा देत असल्याचे रविवारी राज ठाकरेंना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. जाधव यांनी स्वतः ठाणे विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र त्यात ते तिसऱ्या स्थानावर राहिले. पक्षप्रमुखाला पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, ठाणे आणि पालघर येथे पराभवाची जबाबदारी घेऊन राजीनामा दिलेल्या जाधव यांना राज ठाकरे यांनी कार्यरत राहण्याचे सांगितले आहे .त्यामुळे त्यांनी पक्षासाठी कार्यरत राहणार असल्याचे म्हटले आहे.




**सोलापूर : जागतिक एड्स दिन निमित्त शहरात सोमवारी सकाळी समाज प्रबोधन रॅली काढण्यात आली. त्याप्रसंगी व्ही.एम. मेडीकल कॉलेज प्रांगणात आरोग्य चांगले ठेवण्याची शपथ देण्यात आली.**

# सर्वसामान्यांच्या प्रश्नांची तळमळ असलेल्या राणादादांना मंत्रीमंडळात घ्यावे

## भाजपा नेते यशवंत लोंढे, माजी सरपंच वडणे यांची मागणी; प्रदेश भाजपाकडेही मागणीचा केला पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे राणाजगजितसिंह पाटील यांनी दुसऱ्यांदा दणदणीत विजय संपादन करुन भाजपाचे कमळ फुलवले आहे. यापूर्वीही कळंब-धाराशिव मतदारसंघातून त्यांनी आमदारकीमध्ये विजय मिळविला होता. इतकेच नाहीतर त्यांनी कृषी राज्यमंत्री म्हणूनही काही वर्षे काम पाहिल्याने त्यांना सर्वसामान्य नागरिक, विशेषतः शेतकरी बांधवांबाबत मोठी तळमळ असल्याने आ. पाटील यांना राज्याच्या मंत्रीमंडळात स्थान द्यावे आणि कृषी खाते त्यांच्याकडेच द्यावे, अशी आग्रही मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा तामलवाडी ग्रामपंचायत सदस्य यशवंत लोंढे, माजी सरपंच दत्तात्रय वडणे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २) केली. दरम्यान, याबाबत भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षांकडेही पाठपुरावा केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



विधानसभा निवडणुकीत आ. पाटील यांनी तुळजापूर तालुक्यात मोठे मताधिक्य घेतले होते. या विजयाचा तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची मुक्तपणे उधळण करीत मोठा जल्लोषही केला होता. इतकेच नाहीतर आमदार पाटील यांची यावेळी डीजे लावून विजयी मिरवणुकही काढली. तुळजापूर तालुक्यातील विविध प्रश्न आमदार पाटील यांनी मागील टर्ममध्ये सोडविले आहेत. यामध्ये सोलापूर-धाराशिव रेल्वेमार्ग, शेतकरी पीकविमा योजनेतील त्यांचा सक्रीय सहभाग, अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे, कौडगाव-तामलवाडी आदी ठिकाणच्या एमआयडीसी आणण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न सर्वांना माहीत आहेतच. याच धर्तीवर तुळजापूर शहरातील अंतर्गत विकासकामांसाठीही त्यांचे योगदान महत्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्यासाठीही त्यांची सध्या धडपड सुरूच आहे. इतकेच नाहीतर या मतदारसंघात विविध ठिकाणी रस्ते निर्मिती, विविध गावांना सभागृहांचीही त्यांनी निर्मिती केली आहे. एकंदरीत, तुळजापूर तालुक्याप्रमाणेच जिल्हास्तरीय प्रश्नांकडेही त्यांचे सातत्याने लक्ष असल्याने यावेळी आमदार पाटील यांना मंत्रीमंडळात स्थान देवून त्यांना धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री करावे, अशीही अपेक्षा लोंढे-वडणे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्यात महायुतीने जोरदार मुसंडी मारत एकहाती सत्ता घेतली आहे. या निवडणुकीत अनेक ठिकाणी अटीतटीच्या लढती पहावयास मिळाल्या व काहींनी सहज विजय मिळवला, अशाच पध्दतीने तुळजापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे राणाजगजितसिंह पाटील विरुद्ध महाविकास आघाडीचे धिरज पाटील यांच्यात प्रमुख लढत झाली. या लढतींमध्ये महायुतीचे राणाजगजितसिंह पाटील यांनी गेल्या वेळेपेक्षा जास्तीची मते मिळवित महाविकास आघाडीचे उमेदवार धिरज पाटील यांचा पराभव केला होता. या मतदारसंघाच्या विकासासाठीच नाहीतर अवघ्या जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आ. पाटील यांची गरज असल्याने या पंचक्रोशीतील भाजपच्या अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही आ.पाटील यांना मंत्री करून धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री करावे म्हणून जोर लावल्याचेही चित्र सध्या दिसत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## सोलापूर जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. ०१ डिसेंबर २०२४ सकाळी ०८ वा.पासुन ते १५ डिसेंबर २०२४ रात्री ०८ वा.पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) (अ ते फ) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जम ातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## ऑपरेशन मुस्कान ३० डिसेंबरपर्यंत चालणार; पोलिस आयुक्तालयाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

राज्यात हरविलेल्या बालकांच्या व महिलांच्या संदर्भात ऑपरेशन मुस्कान १३ ही विशेष शोध मोहिम १ डिसेंबर पासून सुरु करण्यात आली असून ही मोहिम ३० डिसेंबरपर्यंत चालणार असल्याची माहिती पोलिस आयुक्तालयाच्यावतीने देण्यात आली आहे.

राज्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक महिला व बालक अपराध प्रतिबंध विभाग यांच्या आदेशानुसार ही ऑपरेशन मुस्कान मोहिम राबविण्यात येत आहे. सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील अनैतिक म ानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष आणि पोलिस ठाणेनिहाय विशेष पथक तयार करून सोलापूर शहरातील




बेपत्ता १८ वर्षाखालील बालके व १८ वर्षावरील महिलांचा शोध घेण्यात येणार आहे. शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्याकडून या मोहिमेसाठी एक अधिकारी व तीन पोलिस अमंलदार देण्यात आलेला आहे. संशयित, बेवारस बालकांबाबत नागरीकांना काही माहिती असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधून तसेच चाईल्ड लाईन १०९८ तसेच पोलिस नियत्रंण कक्षाशी संपर्क साधून माहिती देण्याचे आवाहन पोलिस आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## कोर्टातील केस काढून घेण्यासाठी तलवार, वीटाने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

कोर्टातील केस काढून घेण्यासाठी तलवार, वीटाने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाले.

जमिल अ.म.शरीफ गोट्यालकर (वय ५३) आणि फरिदा जमिल गोट्यालकर (वय ५२, रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमींची नावे आहेत. २ डिसेंबर रोजी एकच्या सुमारास डॉ. अन्सारी चौकात कल्याणी मेंबरच्या घरासमोर कोर्टात दखाल केलेल्या केस काढून घ्या म्हणून सादिक कुरेशी, युनूस नदाफ व इतर ८ जणांनी मिळून तलवार, विटा, फायटरने गोट्यालकर यांना मारहाण करून जखमी केले. त्यामुळे गोट्यालकर यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## दोन कारची धडक; तीन ठार, तीन गंभीर

**दर्यापूर, २ डिसेंबर**

येथून दर्यापूरकडे जाणाऱ्या मार्गावर दोन कारची समोरासमोर जोरदार टक्कर होऊन भीषण अपघात झाला. या घटनेत तीन तरुणांचा जागीच मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर-अकोला मार्गावर हा भीषण अपघात झाला. काही जखमींना उपचारासाठी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामध्ये एका कारमधील आनंद बाहकर, बंटी बिजवे आणि प्रतीक बोचे या तिघांचा मृत्यू झाला, तर कारमधील चौथा पप्पू घाणीवाले जखमी झाला आहे. दुसऱ्या कारमधील आकाश अग्रवाल आणि रमेश अग्रवाल हे दोघे जखमी झाले आहेत. प्रतीक, आनंद, बंटी आणि पप्पू हे चौघे कारने अकोल्याला जात असताना विरुद्ध दिशेने आकाश आणि रमेश अकोल्यावरून दर्यापूरकडे जात होते.

# विष्णुपद उत्सव २०२४ : विष्णुपद मंदिर येथे समितीमार्फत पुरेशा सोई-सुविधा उपलब्ध

### गहिनीनाथ महाराज औसेकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ डिसेंबर -**

मार्गशिर्ष शुध्द ०१ ते मार्गशिर्ष वद्य ३० या कालावधीत श्री विठ्ठलाचे वास्तव्य विष्णूपदावर असते, अशी धारणा आहे. त्यामुळे महिनाभर विष्णूपद येथे दर्शनास भाविकांची गर्दी असते. यावर्षी दिनांक ०२ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान विष्णूपद उत्सव संपन्न होत असून, या उत्सवास दिनांक ०२ डिसेंबर पासून सुरवात झाली असून, गोपाळपूर रोडवरील विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा सोई सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

मंदिर समितीने पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता सन २०१५ मध्ये ताब्यात घेतल्या असून, त्याचे व्यवस्थापन मंदिर समिती मार्फत चालविण्यात येते. त्यामध्ये गोपाळूपर रोडवरील चंद्रभागा नदीपात्रातील विष्णूपद मंदिराचा समावेश असून, या ठिकाणी दर्शनरांगेसाठी बॅरीकेटींग, सुरक्षा व्यवस्थेकामी कमांडोज, पिण्याच्या पाण्याची सोय, चांगली स्वच्छता व्यवस्था, अभिषेक पुजा भाविकांना उपलब्ध करून देणे, विद्युत रोषणाई व इतर अनुषंगीक व्यवस्था करण्यात आली असून, सदर ठिकाणी वन भोजनाची प्रथा असल्याने स्वच्छतेसाठी जादा कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पंढरपूर नगरपरिषद प्रशासन व पोलीस प्रशासन यांना देखील पत्रव्यवहार करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

विष्णूपद मंदिर येथे एका मोठ्या शिळेवर मध्यभागी देवाचे समचरण आणि देहुडाचरण पावलं उमटलेली आहेत. त्यासोबत काठी ठेवल्याची आणि काल्याच्या वाडग्याची खूण दिसते. या शिळेवर दगडी मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपाच्या खांबावर चतुर्भुज सम चरण विष्णुमूर्ती आणि देहुडाचरण मुरलीधराची मूर्ती कोरण्यात आली असून, विठ्ठलाने आपल्या











सवंगड्यासह व गाईसह क्रीडा केल्या व भोजन केलं. तेव्हा इथं देवाची आणि गाईची पावलं उमटली. विठ्ठल हे विष्णूचे अवतार असल्यानं इथं उमटलेल्या पावलांमुळे या ठिकाणाला विष्णुपद असं नाव मिळालं. मार्गशीर्ष महिन्यात विठुराया या ठिकाणी निवासाला येतो, असं मानलं जातं. त्यामुळे मार्गशीर्ष महिन्यात या ठिकाणी भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. याशिवाय, भाविक नौकानयनाचा आनंद घेतात व दर्शन घेऊन वनभोजनाचा आनंद लुटतात. येथे येणाऱ्या सर्व भाविकांना मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देऊन तेथील सर्व प्रथा व परंपरेचे पालन करण्याची दक्षता मंदिर समितीने घेतल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

## मी काम करणारा कार्यकर्ता...

### देवेंद्र फडणवीस जो निर्णय घेतील तो मला मान्य

### आमदार सुभाष देशमुख यांची प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

मला मंत्रीपदाची कोणतीही अपेक्षा नाही, मी काम करणारा कार्यकर्ता आहे; असे सांगत देवेंद्र फडणवीस हे जो निर्णय घेतील तो मान्य आहे अशी प्रतिक्रिया आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.

दक्षिण सोलापूर पत्रकार संघाच्या वतीने तिसऱ्यांदा विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल आमदार देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ.



देशमुख म्हणाले, पत्रकारांची विकासामध्ये भूमिका महत्त्वाची असते, दक्षिण सोलापूर मतदार संघाच्या विकासाचे विविध मुद्दे समोर आणावेत, या मतदारसंघात आणखी काय नव्याने करता येईल त्याची कल्पना द्यावी असे सांगतानाच पत्रकारांनी सुचवलेल्या विकासाच्या विषयावर त्यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली.

दरम्यान, नव्या सरकारचा शपथविधी दोन दिवसात होणार आहे. जिल्ह्यातून आपले नाव मंत्रिपदासाठी येत आहे. यावर विचारले असता ते म्हणाले, मला कोणतीही अपेक्षा नाही मी काम करणारा कार्यकर्ता आहे. आमचे नेते देवेंद्र फडणवीस हे जो निर्णय घेतील तो आम्हा सर्वांनाच मान्य राहील. २०१४ ते १९च्या दरम्यान सुभाष देशमुख हे देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात आ. देशमुख हे सहकार मंत्री होते. त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले त्यापैकी एक म्हणजे बाजार समि तीच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना त्यांनी मतदानाचा अधिकार दिला होता. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून त्यावर प्रशासक आणला. आता या मंत्री मंडळात त्यांना स्थान मिळेल का? हे येणारा काळच सांगणार आहे.


## जिल्हा परिषदेच्या अभियंत्याचे बंद घर फोडले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

जिल्हा परिषदेच्या अभियंत्याच्या घरासह तीन बंद घराचा कुलूप कोयंडा कापून चोरट्याने रोख रकमेची चोरी केल्याने उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे घबराट उडाली आहे.

जिल्हा परिषदेच्या दक्षिण सोलापूर तालुका पाणीपुरवठा विभागातील उप अभियंता सुनील कटकधोंड सोलापूर येथे राहतात. नान्नज येथे त्यांची शेती असल्याने गावातील घरात ते सुट्टीदिवशी राहावयास जातात. सध्या शेतीत गावाची लागवड करायची असल्याने शेती कामासाठी त्यांनी गावातील घरात कपाटात पैसे ठेवले होते. शुक्रवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीनंतर चोरट्याने त्यांच्या बंद घराचा कुलूप कोयंडा कापून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाट पडून त्यातील पंधरा हजाराची रोकड व सुटकेस मधील पन्नास हजाराची रोकड अशी ६५ हजाराची रोकड चोरून नेली.

दुसऱ्या दिवशी पहाटे शेजाऱ्यांनी त्यांना घर फोडल्याची माहिती दिली. त्याचबरोबर त्यांच्या शेजारी राहणारे मारुती टोम्पे हे पत्नीसह देवदर्शनासाठी घर बंद करून गेले होते. त्यांच्याही घराचा कुलूप कोंडा कापून चोरट्याने घरातील १५



हजाराची रोकड चोरून नेली. तसेच बाजूला राहणारे संदलगी मुलाणी हे घर बंद करून परगावी गेले होते. त्यांचेही बंद घर फोडून चोरट्याने घरातील ६० हजाराची रोकड चोरून नेली. पोलीस पाटील ऋषिकेश तोडकर यांनी दिलेल्या माहितीवरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास हवालदार मोरे करीत आहेत.

नान्नजमध्ये एकाच रात्री तीन घरे फोडण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे. चोरट्याने प्रभाकर गवळी यांची मोटरसायकल चोरून नेली होती. ही मोटारसायकल मार्डी रस्त्यालगत सोडून त्यांनी पोबारा केल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे नान्नजमध्ये आदल्या दिवशीही चोऱ्या झाल्या होत्या. वडाळा गावामध्येही अशाच पद्धतीने बंद घरे फोडण्यात आली आहेत. बार्शी रस्त्यावर असलेल्या नान्नज व वडाळा या दोन गावांमध्ये चोरट्यांनी अशा पद्धतीने बंद घरे फोडून दहशत माजवली आहे. या चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सिलिकॉन कंपनीत मशिनमध्ये हाताचे बोट जाऊन कामगार जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

चिंचोळी एमआयडीसीमधील सिलिकॉन कंपनीत काम करताना मशिनमध्ये हाताचे बोट जाऊन कामगार जखमी झाला.

संकेतकुमार सिंग (वय २४, रा. बिहार सध्या रा. चंद्रकला नगर, नई जिंदगी, सोलापूर) असे जखमी कामगाराचे नाव आहे. चिंचोळी एमआयडीसीमधील सिलिकॉन कंपनीत २ डिसेंबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास काम करीत असताना संकेतकुम ार सिंग याच्या उजव्या हाताच्या करंगळीजवळील बोट मशिनम ध्ये जाऊन तो जखमी झाला. त्यामुळे त्यास कंपनीचे मालक जाकिर पठाण यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घर जागेच्या कारणावरून माय-लेकास मारहाण

तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथे घर जागेच्या कारणावरून माय-लेकास मारहाण करण्यात आली. सिध्दाराम भिमशा पुजारी (वय २४) आणि पार्वती भिमशा पुजारी (वय ६५, दोघे रा. तीर्थ) अशी जखमी माय-लेकांची नावे आहेत. १ डिसेंबर रोजी रात्री




दहाच्या सुमारा तीर्थ गावातील स्टॅन्डवर घर जागेच्या वादातून संतोष पुजारी व प्रेम वाघमारे यांनी सिध्दाराम व त्याची आई पार्वती यांना लाथाबुक्क्यांनी म ारहाण केली. यामध्ये सिध्दाराम व पार्वती यांच्या डोक्यास व हातापायस जबर जखमा झाल्याने त्यांना उपचरासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम

**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

गुंतवणूकीमध्ये मालमत्ता वर्गांम धून निवड करण्याच्या दुविधेचा सामना करावा लागतो, ज्या उच्च जोखीम इक्विटी, कमी जोखमीचे कर्ज आणि कमोडिटीज सारख्या चलनवाढीपासून संरक्षण यांच्याशी संबंधित असतात. पण,तुम्ही वाढ व स्थिरतामध्ये संतुलन राखत दोन्ही बाबींचा फायदा घेऊ शकता का? एसबीआय म्युच्युअल फंडकडून स्मार्ट पद्धतीने गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम लाँच करण्यात आला आहे. हायब्रिड फंड्सना प्राधान्य द्या.या वैविध्यपूर्ण गुंतवणूक पर्यायामध्ये यापैकी दोन किंवा अधिक मालमत्ता वर्ग एकाच फंडात आणत जोखीम व परताव्यामध्ये संतुलन राखले जाते.

# निवडणुकीच्या मैदानात असतो तर सगळ्यांचा सुपडासाफ केला असता

### मनोज जरांगे पाटील यांचा मोठा दावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ डिसेंबर -**

राज्यातील निवडणूक निकालानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मोठा राजकीय दावा केला.मी आणि मराठा समाज विधानसभा निवडणुकीच्या मैदानात असतो आणि समीकरण जुळले असते तर सगळ्यांचा सुपडासाफ केला असता असा अप्रत्यक्ष टोला मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे.

मराठा समाज कोणाच्या दावणीला बांधणार नाही. समाज स्वतःचा मालक आहे. मी सम ाजावर मनमानी केली नाही आणि करणार ही नाही असे ही जरांगे यांनी स्पष्ट केले. मनोज जरांगे



पाटील यांनी रविवारी रात्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना विधानसभा निवडणुक निकालावर भाष्य केले. गोरगरीबांना शक्ती मिळावी, मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागावा असे आपण विठ्ठलाला साकडे घातल्याचे ही जरांगे यांनी सांगितले.जरांगे म्हणाले की,राज्यात सरकार स्थापन झाल्यानंतर अंतरवाली सराटीमध्ये मराठा समाजाची बैठक बोलावली जाईल. त्यामध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाईल.मी आरक्षण घेणार आणि ओबीसी मधूनच घेणार. यासाठी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंतरवालीच्या घराघरात उपोषण केले जाणार आहे. समाजातल्या अनेकांची इच्छा आहे की मुंबईत जाऊन उपोषण करावे तसे सुद्धा होऊ शकते.मात्र सरकार स्थापन झाल्यानंतर याबाबत दिशा ठरवली जाईल. विधानसभेचा निकाल जाहीर झाल्यानंतर ३० ते ३२ नवनिर्वाचित आमदारांनी आपली भेट घेतली आहे. सरकार स्थापन झाल्यावर अजून अनेक आमदार आपली भेट घेतील असा दावा ही त्यांनीं केला. विधानसभा निवडणुकीच्या मैदानात मी आणि माझा मराठा समाज नव्हता. आमचं समीकरण जुळलं असतं तर सगळ्यांचा सुपडा साफ केला असता, मी समाजाला कोणाच्या दावणीला बांधलं नाही , त्याला विकले नाही.समाज त्याच्या म ताचा मालक आहे. समाजाला जे वाटलं ते त्यांनी केले आहे. समाजावर कुठेही मनमानी केली नाही. असे स्पष्टीकरण ही जरांगे यांनी दिले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तर आपण त्यांचे स्वागत करणार का असा प्रश्न जरांगे यांना विचारला असता त्यांनी जर तर च्या प्रश्नांना मी उत्तर देत नाही असे म्हणत त्यांच्या आधी तुम्हालाच घाई झाली का असा प्रति प्रश्न करत अधिक बोलणं टाळले. तर छगन भुजबळ यांच्या विरोधात आपण भूमिका घेतली होती असे विचारले असता यावरही त्यांनी थातूरमातूर उत्तर देत घुमजाव केले. यावेळी मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांच्यावर जेसीबी मधून पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

# बेशिस्त वाहतुकीचा दंड जागेवरच

- ई-चलनाच्या दंडाच्या थकीत रकमेवर पोलिस आयुक्तांचा उपाय
- वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यां ७ हजार जणांना समन्स
- ३५० जणांवर न्यायालयाकडून अटक वॉरंट; ११५ जणांनी भरला न्यायालयात दंड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

सोलापूर शहरातील वाहतूक शाखेकडून ई चलनाच्या माध्यम ातून बेशिस्त वाहन चालकांना करण्यात आलेल्या दंडाची रक्कम ही वरचेवर वाढतच आहे. विशेष मोहिमा राबवूनदेखील ही दंडाची रक्कम वसुल होण्याचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे काही कालावधीसाठी सोलापूर शहरात वाहतूक शाखेकडून बेशिस्त वाहनचालकांवर करण्यात येणाऱ्या कारवाईवेळी ई चलन करून तो दंड थकीत न ठेवता दंडाची रक्कम जागेवरच घेण्यात येणार असल्याचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सांगितले.

डिसेंबर महिन्यात लोकअदालतीची आयोजन करण्यात आलेले आहे. या पार्श्वभूमीवर शहर वाहतुक नियंत्रण विभागाने वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या ७ हजार वाहन चालकांना समन्स बजावले आहेत. समन्स मिळालेल्या वाहन



चालकांनी दंड भरला नाही तर त्यांना थेट जेलची हवा खावी लागणार आहे. सात हजार वाहतुकीच्या केसेसचे समन्स मिळताच न्यायालयात जावून दंड भरल्यास वाहन चालक न्यायालयाच्या कारवाईपासून वाचू शकतील.

लोकअदलातीच्या अगोदर शहर वाहतुक विभागाकडून समन्स येऊनसुध्दा न्यायालयात वाहतूक दंडाची रक्कम न भरलेल्या ३५० वाहनचालकांविरुध्द नोव्हेंबर महिन्यात अटक वारंट काढलेले आहे. त्यापैकी ११५ जणांना ताब्यात घेऊन त्यांना न्यायालयात पाठविण्यात आल्यानंतर त्यांनी दंड भरून अटक वारंट रद्द करून घेतले आहे.

उर्वरीत वाहन चालकांना वारंट पोहोचवण्यात आले आहेत. तरी वाहन चालकांना वाहतुक केसेसच्या कायदेशीर दंडाची भरणा करून जिल्हा न्यायालयाकडून वारंट रद्द करून घेता येईल. जर समजा दंड भरला नाही तर अटकेची कारवाई होणार आहे. त्यामुळे शहर पोलिस आयुक्त कार्यालयाकडून वाहतुकीच्या नियम मोडणाऱ्यांना जागेवरच दंड आकारण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे चालू बरोबर प्रलंबित दंड ही वसूल केला जात आहे. वाहतूक केसेस असलेल्या सात हजार जणांना समन्स बजावलेले आहेत, त्या समन्स बजावलेल्या वाहन चालकांना लोक अदालत जावून दंड नाही भरला तर जिल्हा न्यायालयाकडून अटक वारंट काढले जाणार आहे. त्यामुळे वाहन चालकांना जेलची हवा खावी लागणार आहे.

## अग्रलेख...

# ज्याचा त्याचा आत्मक्लेश

योगायोग-चमत्कार आदी बाबी म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा असतात, याबाबत बहुधा कोणाचेच दुमतच नसले, तरी कधी कधी सामान्य समजुतींना अचंबित करावयास ज्या काही घटना घडून जातात, त्यांना नेमके काय नाव द्यायचे, असा प्रश्न योगायोग किंवा चमत्कारांस न मानणाऱ्यांनाही पडतो. त्यास चमत्कार वगैरे संबोधून अंधश्रद्धांच्या समजुतीस खतपाणी घालणे जमतही नाही आणि तो चमत्कार नाही हे मान्य करणेही जमत नाही, अशी अवघड स्थिती होऊन बसते. धूर्त माणसांनी अशा घटनांकरिता एक पर्यायी व निरुपद्रवी शब्द शोधून काढला आहे. हा शब्द वापरल्यास त्यांच्यावर अंधश्रद्ध असा शिक्का बसत नाही; असा हा सरळमार्गी शब्द म्हणजे, अनाकलनीय! कोणत्याही अनपेक्षित घटनेचे विश्लेषण करण्यासाठी हा शब्द अशा लोकांस पुरेसा असतो. त्यामध्ये चमत्काराचा अंश असतो, निव्वळ योगायोगाची शंकाही असते; अंधश्रद्धेचा मात्र लवलेश नसतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रचंड धुव्वा उडून महायुतीस प्रचंड बहुमत मिळाले. विश्लेषणाची नेमकी आफत टाळण्यासाठी काही धूर्त राजकारणी नेत्यांनी निकालाचे विश्लेषण करताना 'अनाकलनीय' अशा एकाच शब्दाचा वापर केला. पण सगळेच राजकीय पक्ष तसे नसतात. त्यांना निकालाचे विश्लेषणही करावयाचे असते आणि आपल्या वाट्याला जे काही आले आहे, त्याच्या नामुष्कीला स्पर्श न करता दुसऱ्याच्या वाट्यास आलेले खोटे आहे हेदेखील दाखवायचे असते. म्हणूनच निवडणुकीच्या निकालानंतर वेगवेगळ्या कारणांचे खापर वेगवेगळ्या व्यवस्थांच्या, नेत्यांच्या व पक्षांच्या माथ्यावर फोडण्याची जणू चढाओढ लागली आहे. या चढाओढीत आपल्या वाट्याला आलेल्या परिणामांची प्रामाणिक मीमांसा करण्याचे धाडस अजून कोणी उघडपणे दाखविलेले नाही. आपल्या पराभवास अन्य बाबी कशा कारणीभूत आहेत, हे दाखविण्याची स्पर्धा मात्र सुरू झाली आहे. म्हणूनच मुख्यत्वेकरून आजपर्यंतच्या जवळपास सर्व निवडणुकांच्या निकालानंतर घेतल्या जाणाऱ्या मतदान यंत्रांवरील आक्षेपाचाच आधार यावेळीदेखील घेतला जात आहे. साहजिकच महायुतीच्या महाविजयास मतदान यंत्रांतील संशयास्पद फेरफार हेच कारण असल्याचा निराधार आक्षेप घेऊन त्या मुद्यावर रान उठविण्याचा विरोधकांचा विचार असतानाच आता निवडणूक आयोगाने त्याबाबत ठोस भूमिका घेतली हे योग्य झाले. 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' अशी एक म्हण आहे. ती आठवावी अशी स्थिती आयोगाच्या नव्या भूमिकेमुळे विरोधकांच्या वाट्याला येईल, तेव्हा या आक्षेपाची आक्रमक धार कदाचित कमी होईल, पण पराभवाची प्रामाणिक मीमांसा करण्याची गरज मात्र अजूनही कोणाच्या फारशी लक्षात आली नाही. या निवडणुकीने नेमका कोणता धडा शिकविला आणि त्यापासून आपण नेमका कोणता बोध घ्यावा, हे गोंधळलेल्या विरोधकांनी अजूनही लक्षातच घेतलेले नाही.

लोकशाही राज्यव्यवस्थेत प्रबळ विरोधक हा सत्ताधाऱ्यांवरील अंकुश मानला जातो. आपली अवस्था अधिकाधिक क्षीण करून घेणाऱ्या विरोधकांनी लोकशाहीची ही अपेक्षा पूर्ण करण्याकरिता किमान आवश्यक कार्यक्रम राबविला पाहिजे. त्यासाठी भूतकाळातील असंख्य चुका शोधण्याकरिता आत्मपरीक्षण करण्याची त्यांना गरज आहे. पण तसे न होता, महाविकास आघाडीने किंवा भाजपाने विजयाच्या वारूवर आपली मांड कशी ठोकली, याचा शोध घेण्यातच सारे विरोधक अजूनही चाचपडत आहेत असे दिसते. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक हानी काँग्रेसची झाली आहे. राष्ट्रीय स्तरावरील या पक्षाची महाराष्ट्रातील कामगिरी मात्र ऐतिहासिक नीचांकी ठरावी एवढी खाली घसरली आहे. त्यामुळे पराजितांच्या रांगेतील अन्य पक्षांच्या सुरात सूर मिसळून केवळ मतदान यंत्रांवर खापर फोडणारी रडगाणी गाण्याऐवजी आत्मपरीक्षणाचा प्रामाणिक प्रयत्न करावयास हवा. तो तसा होणे सद्य:स्थितीत तरी फारसे शक्य दिसत नाही. मतदान यंत्रांच्या नावाने सुरू असलेली मोहीम कायम ठेवण्याचा कटु व आत्मवंचना करणारा निर्णय काँग्रेसला नाईलाजाने घ्यावा लागला असावा. महाराष्ट्रातील कराड मतदारसंघातून पराभूत झालेले माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे काँग्रेसमधील संयमी व प्रामाणिक नेते म्हणून ओळखले जातात. मतदान यंत्रांच्या नावाने घेतले जाणारे आक्षेप योग्य नाहीत, असा सुरुवातीस लावलेला सूर आता त्यांनाही बदलावा लागेल व श्रेष्ठींच्या सुरात सूर मिसळावा लागेल, असे दिसत आहे. दुसरीकडे ठोस पुरावे असल्याखेरीज मतदान यंत्रांवर आक्षेप घेता येणार नाही, असा सावध सूर लावणाऱ्या शरद पवारांच्या पक्षात मात्र सर्व स्तरांतून मतदान यंत्राविरोधाचे आवाज सातत्याने उमटत आहेत. नव्वदीच्या घरातील ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव यांनीही मतदान यंत्रावर प्रश्नचिन्हे उमटवत सुरू केलेल्या आत्मक्लेश आंदोलनामुळे जणू विरोधकांना मोठेच बळ मिळाल्याचे चित्र महाराष्ट्रात उभे करण्याचा विरोधकांचा प्रयत्न सुरू झाला आहे. ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या आश्वासनानंतर बाबा आढाव यांनी आपले आत्मक्लेश आंदोलन समाप्त केले. त्याआधी शरद पवारांनी जातीने बाबा आढाव यांची भेट घेऊन या वयातही त्यांनी स्वीकारलेला आत्मक्लेशाचा मार्ग योग्य असल्याचा निर्वाळा दिला. राज्यातील विरोधकांची उरलीसुरली शक्ती मतदान यंत्रांच्या विरोधाकरिता एकवटत असताना निवडणूक आयोगाने आता कठोर पावले उचलून संभ्रमाचे वातावरण पसरविण्याच्या प्रयत्नांस पूर्णविराम देण्याची भूमिका घेतली हे योग्यच ठरले आहे. या यंत्रात कोणत्याही रीतीने आणि तंत्रज्ञानाने छेडछाड केली जात नाही, असा ठाम दावा आयोगाने वेळोवेळी केला आहे. हे यंत्र वायफाय किंवा ब्लूटूथ नेटवर्कला जोडले जाऊ शकत नाही. ते एक स्वतंत्र यंत्र असल्याने त्यामध्ये कोणतेही फेरफार करणे अशक्य असून देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही या यंत्राच्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब केले आहे. मतदान यंत्राबाबत कोणतीही शंका असल्यास त्याचे निवारण करण्याचे असंख्य मुद्दे आयोगाने आपल्या संकेतस्थळावर प्रसृत केले आहेत. त्याशिवाय यंत्रात छेडछाड केली जाऊ शकते हे सप्रमाण सिद्ध करून दाखविण्याचे आव्हानही आयोगाने वारंवार दिले आहे. तथापि, ते आव्हान न स्वीकारता, दोरीला साप समजून भुई थोपटण्याचा सोपा मार्ग स्वीकारून जनतेची दिशाभूल करण्याचे विरोधकांनी ठरविलेले दिसते.

थोडक्यात, मतदारांनी सजगपणा दाखवून आपल्यास स्पष्टपणे नाकारले हे वास्तव स्वीकारण्याची विरोधकांची तयारी नाही, हेच सध्याच्या निराधार आक्रस्ताळेपणावरून स्पष्ट होते. त्याखेरीज जनादेशाची मोडतोड करून सत्तासंपादनाच्या गणितात छेडछाड करण्याची संधी यावेळी विरोधकांस मिळणार नाही, याची सावध खबरदारीही मतदारांनी घेतली आहे. हा या निकालांचा अर्थ समजून घेण्याची विरोधकांची तयारी नसावी. पाच वर्षांपूर्वी २०१९ च्या निवडणुकीत मतदारांना राजकारणाचे अज्ञात असलेले डावपेच लढवून जनादेश डावलून सत्ता संपादन करता येते हे महाविकास आघाडीच्या राजकारणाने दाखवून दिले होते. मतदारांच्या भावना खुंटीवर टांगता येणे शक्य आहे, असाच त्या कृतीचा अर्थ होता. मतदारांस ती चूक पुढच्या पाच वर्षांतील राजकारणावरून उमगली आणि त्या चुकीची पुनरावृत्ती होणार नाही किंवा तशी पुसटशी संधी विरोधकांस मिळणार नाही, याची पुरेपूर खबरदारी घेऊनच मतदार मतदान केंद्रांवर पोहोचला, हे वास्तव समजून घेण्याची विरोधकांना इच्छा नसेल, तर केवळ मतदान यंत्रांच्या नावाने भुई थोपटून मतदार संभ्रमात पडेल हा समज असमंजसपणाचा ठरेल. ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असा स्पष्ट दावा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी शुक्रवारी पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत बोलताना केला. पण तसे निर्णय घेतल्यास ज्या काही नेत्यांवर कठोरपणे पराभवाचे खापर फोडावेच लागेल, त्यांचे नाव घेण्याची तरी पक्षाची हिंमत आहे का, याचे उत्तर शोधावेच लागेल. ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे हे अजूनही महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख असल्याच्या समजुतीतच मश्गूल आहेत. या निकालाने शिकविलेला धडा पचविणे सोपे नाही, हे महाराष्ट्रास ठावूक आहे. त्यामुळे केवळ आक्रस्ताळेपणा करणाऱ्यांस काही काळ तशी संधी देऊन आत्मक्लेशाचे दुःख हलके होऊ द्यावे, हेच योग्य!

## आंतरराष्ट्रीय

# कॅनडात खलिस्तान्यांची एवढी वरवर का?

(उत्तरार्ध)

**वसंत गणेश काणे**

कॅनडामध्ये चार भारतीय नागरिकांवर हरदीप सिंग निज्जरच्या हत्येशी संबंध असल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. करण ब्रार, आमंदीप सिंग, कमलप्रीत सिंग आणि करणप्रीत सिंग अशी या चार आरोपींची नावे आहेत. अशा प्रकरणी काही प्राथमिक स्वरूपाचे टप्पे पार पाडायचे असतात. यामुळे आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप ज्या साक्षीदारांच्या कथनावर आधारित असतात, त्यांची उलटतपासणी करण्याची संधी आरोपींच्या वकिलांना मिळत असते. ही संधी न देता एकदम वरिष्ठ न्यायालयातच खटल्याला प्रारंभ केला जाणार आहे. हे सर्व खलिस्तान्यांना खूश करण्यासाठी केले जात आहे.

कॅनडामध्ये खलिस्तान्यांची एवढी वरवर का केली जाते, हा प्रश्न भारतात सर्वसाधारण नागरिकाला पडणे साहजिक आहे. याबाबत कॅनेडियन राजकारण्यांचे म्हणणे असे आहे की, 'वैशाखी'सारख्या सणासुदीच्या दिवशी जेव्हा आम्ही लाखांवर लोक एकत्र आलेले पाहतो तेव्हा त्यांची मते आपल्याला मिळावी म्हणून त्यांच्याशी जवळीक साधावी, असाच विचार कोणताही राजकारणी करील. त्यांना दुखावणे व त्यांची मते गमावणे आमच्यासाठी शहाणपणाचे ठरणार नाही. काही शिखांच्या अतिरेकी विचारसरणीची आणि खलिस्तानप्रश्नी त्यांनी केलेल्या कारवायांची माहिती कॅनडा प्रशासनाला नव्हती, असे नाही. सुरुवातीच्या शासकीय अहवालात शिखांचा अतिरेकी व्यवहार, खलिस्तानी कारवाया, असे शब्दप्रयोग असतसुद्धा! पुढे पुढे मात्र हे शब्द वगळले जाऊ लागले. त्यावेळचे पंजाबचे मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी या अनुल्लेखावर टीका केली होती, याची आठवण अनेकांना असेलही. याशिवाय अमरिंदर सिंग यांनी स्वत: कॅनडाच्या पंतप्रधानांच्या हाती, म्हणजे खुद्द ट्रुडो यांच्या हाती, कॅनडातील शीख अतिरेक्यांची तपशीलवार यादी सोपविली होती. मुख्य असे की, या यादीत हरदीप सिंग निज्जर याचेही नाव होते. कॅनेडियन शासनाच्या आजकालच्या प्रकटनांमध्ये अतिरेक (एक्स्ट्रिमिझम) हा शब्दप्रयोग एखाद्या समुदायाच्या बाबतीत करणे योग्य ठरणार नाही. ती एक वृत्ती आहे, ते एक तत्त्वज्ञान (आयडिऑलॉजी) आहे. त्या तत्त्वज्ञानाचा विरोध व्हावा, एखाद्या समुदायाचा नाही, अशी भूमिका घेतली जाताना का दिसते, या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही. कॅनडात १३ एप्रिल २०२४ ला खालसा दिन (खालसा पंथाचा स्थापना दिवस) साजरा झाला. त्याला पंतप्रधान ट्रुडो आणि विरोधी पक्ष नेतेही उपस्थित होते. याबाबत आक्षेप असण्याचे कारण नाही; पण यावेळी त्यांच्या उपस्थितीत खलिस्तानचे समर्थन करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या होत्या. म्हणून भारतातील कॅनडाच्या डेप्युटी हायकमिश्नरांना बोलावून भारताने याबाबतचा आपला निषेध नोंदविला होता.

२०२५ मध्ये कॅनडात सार्वत्रिक निवडणुका आहेत. मात्र, परिस्थिती ट्रुडो यांना अनुकूल नाही. महागाई, बेरोजगारी, आरोग्य यंत्रणेची दुरवस्था आदी अनेक कारणांमुळे मतदार नाराज आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी आणि हुजूर पक्षाचे नेते पियर पॉलिव्हर यांनी कल चाचण्यांत ट्रुडो यांच्यावर आघाडी घेतली आहे. ट्रुडो यांच्या नेतृत्वाखाली लिबरल पक्षाने निवडणूक लढविल्यास सत्ता मिळणार नाही, असा आरोप करून त्यांच्याच पक्षातील नेते त्यांचा राजीनामा मागत आहेत. या पृष्ठभूमीवर ट्रुडो वेगवेगळ्या समाजघटकांना आपल्या बाजूने वळवण्याच्या खटपटीत आहेत. कॅनडात साडेसात लाखांहून अधिक असलेल्या शीख समाजाची एकगठ्ठा मते टिकून राहावीत, यासाठी ट्रुडो यांची धडपड सुरू आहे. त्यातच जगमित सिंग धालीवाल यांच्या 'न्यू डेमोक्रेटिक' पक्षाने ट्रुडो यांच्या लिबरल पक्षाचा पाठिंबा काढून घेतला आहे. भारतात खलिस्तान्यांविरुद्ध सरकारने सुरू केलेल्या मोहिमेनंतर अनेक खलिस्तान्यांनी कॅनडात आश्रय घेतला आहे. त्यातले अनेक जगमितचे मतदार आहेत. खुद्द ट्रुडो यांच्या मतदारसंघातही अनेक शीख मतदार आहेत. त्यांची मर्जी राखण्यासाठी ट्रुडोंनी त्यांच्या देशात खलिस्तान्यांना मोकाट तर सोडले आहेच; पण ते त्यांच्या वतीने भारतावर आरोप करीत असतात. त्यातूनच निज्जर प्रकरणात ते भारतावर आरोप करीत आहेत. निज्जर हत्या प्रकरणाचा संबंध भारताशी जोडून ट्रुडो यांनी खलिस्तानवाद्यांना चुचकारण्याचा प्रयत्न चालविला आहे. ट्रुडो यांचे वडील पियर ट्रुडो यांनीही आपल्या कार्यकाळात हेच राजकारण केले होते. खलिस्तानींचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी भारताशी वितुष्ट घेतले. त्यानंतर आता पुन्हा दोन्ही देशांतील संबंध ताणले गेले आहेत. ट्रुडो यांना 'जशास तसे' उत्तर तर द्यायलाच हवे. ट्रुडो म्हणजे कॅनडा नाही, हे विसरून चालणार नाही.

कॅनडात मारल्या गेलेल्या मूळच्या भारतीय नागरिक असलेल्या हरदीपसिंग निज्जरवर भारतामध्ये ९ खटले प्रलंबित आहेत. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीने कॅनडा शासनाकडे त्याच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत पाठविण्याची विनंती केली होती. हे प्रमाणपत्र भारतातील खटल्यातील पुढील कारवाईसाठी आवश्यक होते. पण ही विनंती मान्य न करता कॅनेडियन अधिकाऱ्यांनी काही प्रतिप्रश्न उपस्थित केले आहेत आणि उलट विचारले आहे की, आमच्या नागरिकाच्या मृत्यूच्या प्रमाणपत्राची प्रत भारताने का मागावी?

प्रत्यार्पणासाठी भारताने पाठविलेल्या २६ पैकी फक्त ५ विनंत्याच कॅनडाने मार्गी लावल्या. बाकीच्या प्रलंबित आहेत. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीने इंटरपोलकडे गुरपतवंत सिंग पन्नू विरुद्ध रेडकॉर्नर नोटीस जारी करण्याची मागणीही केली आहे. गुरपतवंत सिंग पन्नू हा खलिस्तानी दहशतवादी अमेरिकेचा नागरिक आहे. नॅशनल इन्व्हेस्टिगेटिंग एजन्सीला सहा गुन्ह्यांच्या संदर्भात त्याची चौकशी करायची आहे. या प्रश्नीही अजून काहीही घडले नाही. गुरपतवंत सिंग पन्नूला न्यू यॉर्क येथे मारण्याचा प्रयत्न झाला होता. या प्रकरणातही भारतीय अधिकाऱ्याचा संबंध आहे, असे अमेरिकन शासनाचे मत आहे. गेल्या आठवड्यात विकास यादव या भारतीय रिसर्च ॲण्ड ॲनालिसिस विंगच्या माजी अधिकाऱ्याचा हात आहे, असा आरोप अमेरिकेने केला आहे. भारताचे अधिकारी कॅनडामध्ये गुन्हेगारी कारवायात गुंतले आहेत, ही माहिती आम्ही अगोदर जनतेला न सांगता वॉशिंग्टन पोस्टच्या वार्ताहराला दिल्याचे कॅनडाने मान्य केले आहे. दुसऱ्या बाजूकडून (भारताकडून) प्रसारित झालेल्या वृत्ताला उत्तर म्हणून आम्ही असे केले, असेही लंगडे स्पष्टीकरण कॅनडाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

जोपर्यंत थेट पुरावे मिळत नाहीत (आणि ते नसल्यामुळे मिळणारही नाहीत), तोपर्यंत या प्रकरणात फार काही होणार नाही. कॅनडात पुढच्या वर्षी ऑक्टोबरमध्ये संसदीय निवडणुका आहेत. तोपर्यंत ट्रुडो हे प्रकरण लावून धरतील. नंतरचे निवडणूक निकालावर अवलंबून राहील. पन्नू प्रकरणात भारताने चौकशी समिती नेमून अमेरिकेचे काहीसे समाधान केले आहे. अमेरिकेतील निवडणूक झाल्यानंतर नवीन सरकार आले आहे. त्याच्याशी वाटाघाटी करून तोडगा काढण्याचा प्रयत्न होईल. पण एक गोष्ट नक्की की, या प्रकरणांवरून मतपेटीच्या राजकारणासाठी भारताशी संबंध बिघडविणे कॅनडा किंवा अमेरिका यांना परवडणारे नाही. २०१५ पासून ट्रुडो सरकार कॅनडात सत्तेवर आहे. २०२५ मध्ये कॅनडात सार्वत्रिक निवडणुका आहेत. ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीला असलेला जनाधार दिवसेंदिवस घसरत चालला आहे. शिखांची मनधरणी करूनही त्यांच्या पक्षाला पाठिंबा देणाऱ्या शिखांची संख्याही रोडावतच चालली आहे. एवढी वरवर करूनही शिखांचा एकमुखी पाठिंबा मिळविण्याचा मूळ हेतू साध्य होईल का?

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# जगण्याच्या कलेत सामावलाय आनंद!

माणसाचे आयुष्य हे सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा, अचानक येणारी संकटे आणि अनेक अडचणींनी भरलेले असते. जीवनामधील प्रतिकूलतेवर, संकटावर आणि बिकट परिस्थितीवर मात करून आपल्या जगण्यामध्ये आनंद फुलविणे ही एक कला आहे. ती आत्मसात केली तर मनुष्याचे जीवन जगणे सहज सोपे होते. सहजासहजी सुखावह आणि आनंदी जीवन जगणे कोणालाच शक्य नसले, तरी आनंदाने जगणे ही एक कला आहे. ती सहज शक्य होईल असेही नाही. ही कला आत्मसात करणे जर मनुष्याला जमले तर जीवन हे आनंदगाणे होते. जगण्याच्या वाटेवरचा प्रवास सुखकर होतो. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या काळामध्ये प्रत्येक जण आपल्यावर असलेल्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून पायाला चाके लागल्यागत धावपळ करीत असतो. कोणत्याच व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीसाठी वेळ नाही. नात्या-नात्यांमधील हरविलेली आपुलकी सर्वाधिक दुःखाचे कारण असल्याचे अमेरिकेमध्ये झालेल्या एका संशोधनाने सिद्ध केले आहे. एकटेपणा हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू असून त्यामुळे मनुष्य नैराश्याच्या गर्तेमध्ये लोटला जात आहे. जगामधील ही सर्वाधिक गंभीर समस्या आहे. जीवनामध्ये आलेल्या आधुनिकतेने प्रत्येक व्यक्ती भरकटत चालली आहे. अध्यात्म आणि संस्कृतीशी फारकत घेऊन आम्ही आधुनिकतेचा मार्ग स्वीकारल्यास त्याचे परिणामही त्याच स्वरूपामध्ये आमच्या पदरात पडतील याचा आम्ही कधीच विचार करीत नाही. भारतामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला नवीन पिढी मुकली आहे. सदैव आनंदी राहण्यासाठी नेहमी सकारात्मक विचार केला पाहिजे. नकारात्मकतेचा मनावर आणि शरीरावर गंभीर व विपरीत परिणाम होतो. तणाव हा आयुष्याचा शत्रू आहे, हे माहीत असूनही आम्ही तणावापासून मुक्त होत नाही. जगामधील कोणतीच व्यक्ती



परिपूर्ण नाही आणि असे होणे हे कदापिही शक्य नाही. त्यामुळे जे काही आहे, ते सांभाळून जीवनाची वाटचाल सुरू ठेवली तर जीवन जगणे सहज सुकर होते. त्यासाठी स्वतःमधील उणिवा ओळखून होत असलेल्या चुकांना सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी दोष असतातच; त्या दोषांची उजळणी करून त्या आपल्या आयुष्यातून हद्दपार केल्यास तीच व्यक्ती स्वतःला सांभाळून यशाच्या मार्गावर मार्गस्थ होते आणि जीवनामध्ये खऱ्या आनंदाचा संचार होतो. 'आनंद' हा बाजारामध्ये सहज मिळणारी कोणती वस्तू नव्हे; ती मनाला प्रसन्न करणारी एक आल्हाददायक अनुभूती आहे. ही अनुभूती जीवनामध्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यासाठी सदैव सकारात्मक बाबींना जवळ करून दुसऱ्यालाही आनंद वितरित करायला शिकले पाहिजे. लोकांना त्याचे जीवन आनंदाच्या रंगांनी भरण्यास मदत केली पाहिजे. त्यामुळे स्वतःला परमोच्च आनंदाची अनुभूती होईल. या अनुभूतीसमोर जगामधील सर्वच बाबी गौण आहेत. लक्षात ठेवा, तुम्ही जगाला जे काही देता त्याच्या दुप्पट परतावा मिळतो, हा सृष्टीचा अलिखित नियम आहे. त्यासाठी काहीही खर्च करण्याची गरज नाही. चंचल मनाला आवरून भौतिक सुखाच्या नादी लागून मनुष्य स्वतः दुःखाला आमंत्रित करीत असतो. क्षणिक सुख हे अपार दुःखाचे कारण ठरू शकते. क्षणिक सुख हे मृगजळासारखे असते, हे सर्वांनाच समजते. तरीही आपण त्यामागे धावून आयुष्याची राखरांगोळी करतो. आनंदी जीवन जगण्याचा अर्थ असाही नाही की, जीवनामधील सर्व समस्या आपोआप नाहीशा होतील. आपल्या काटेरी मार्गावर येणाऱ्या प्रत्येक आव्हानांना न भिता सामोरे गेल्यास जीवनातील चढ-उतार स्वीकारणे सहज शक्य होते. जीवनामध्ये येणारी प्रत्येक समस्या ही आपल्या सोबत त्याच्याशी लढण्याची ताकद घेऊन येत असते. खरी समस्या आहे त्यास सकारात्मकतेने ओळखण्याची. एक मनुष्य म्हणून आपण वेदना, दुःख आणि येणाऱ्या अडचणींपासून मुक्त असे जीवन जगण्यास धडपड करीत असतो. आपले अस्तित्व सर्व समस्यामुक्त असावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी आपली सर्व धडपड असते. परंतु, ही मानसिकता म्हणजे जीवनामधील परमोच्च आनंदाचा क्षण आहे का? हा एक गंभीर चिंतनाचा विषय आहे. जीवनामध्ये केलेल्या कर्माचे फळ प्रत्येकाला स्वतः भोगावे लागते, या निसर्गाच्या नियमाला न डावलता शुद्ध मनाने दुसऱ्यास आनंद देणारे कर्म केल्यास हेच कर्म भावी आयुष्यात आपणास नक्कीच सव्याज परत मिळते.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

# उद्योगपूरक प्रगतिशील संशोधन व तंत्रज्ञान

**दत्तात्रेय आंबुलकर**

आजच्या माहिती-तंत्रज्ञान युगात भारतातील जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये संशोधन प्रक्रियेने वेग घेतलेला दिसतो. त्यातच मोदी सरकारच्या 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन'सारख्या नव्या मोहिमेमुळे ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. त्यानिमित्ताने भारतातील विविध क्षेत्रांतील लक्षवेधी तंत्रज्ञानाधारित संशोधनाचा हा घेतलेला आढावा.

प्रत्येक देशाच्या उद्योग-विकासाच्या प्रगतीसह एकूणच अर्थकारणाला गती देण्यासाठी अभियांत्रिकी-तंत्रज्ञानासह उद्योग प्रक्रियेला सातत्याने अधिकाधिक प्रगत व अद्ययावत करण्याची गरज असते. आपला देशही त्याला अपवाद नाही. विशेषत: सद्य:स्थितीत जागतिक स्तरावर वेगाने आपल्या विकासाचा डंका वाजवणाऱ्या भारताच्या आर्थिक-औद्योगिक संदर्भात तर ही बाब विशेष महत्त्वपूर्ण ठरते. या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्यानेच घोषित केलेल्या देशाच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरी व योगदान विशेष गतिमान करण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन' या नव्या मोहिमेचा नव्या संदर्भासह आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. सकृद्दर्शनी या नव्या संशोधनप्रधान मोहिमेसाठी आगामी पाच वर्षांसाठी ५० हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये उद्योग-व्यवसायाची नजीकच्या भविष्यासह आगामी काळातील गरजा लक्षात घेऊन व त्याचा अभ्यास करून भारताला संशोधन-समृद्ध करण्यावर भर दिला जाणार आहे, हे विशेष. योजनेच्या निमित्ताने पंतप्रधानांनी मांडलेली भूमिका म्हणजे आपण संशोधन क्षेत्रात केवळ पाश्चात्त्यांसह परकीयांचे अनुकरण करणेच पुरेसे नसून देशांतर्गतच नव्हे, तर परदेशातील उद्योगांना आवश्यक अशा ज्ञान-तंत्रज्ञानाच्या गरजांची पूर्तता करण्याचे आव्हान यशस्वीपणे स्वीकारणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी आधुनिकता व कल्पकतेच्या आधारे विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोडीलाच अनुसंधान म्हणजेच संशोधनाची कास धरण्यावर भर दिला आहे.

केंद्र सरकारचा संशोधनावर भर देणारा हा धोरणात्मक निर्णय अनेक कार्यांना महत्त्वाचा व दूरगामी स्वरूपात परिणामकारक ठरणारा आहे. यासंदर्भातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आज आपली आर्थिक-औद्योगिक प्रगती व परिस्थिती ही उत्साहवर्धक असली, तरी त्याला अद्याप संशोधनाची पुरेशी साथ मिळालेली नाही. याचाच परिणाम म्हणून भारताला प्रामुख्याने अमेरिकेसारख्या देशावर तंत्रज्ञानापासून अंतराळ संशोधनासारख्या महत्त्वपूर्ण विषयातील संशोधन व प्रगत ज्ञान मिळण्यासाठी अवलंबून राहावे लागते. ही बाब केवळ अडचणीची व परावलंबित्वाचीच नव्हे, तर जोखमीचीसुद्धा ठरू शकते. एरवी जागतिक पातळीवर चर्चेत असणारी 'अमेरिकन संशोधन पद्धती' ही मुख्यत: संशोधन व त्याचे प्रकाशन याच पद्धतीवर भर देते. परिणामी तिकडे संशोधनाची भरमार असली, तरी त्याच्या प्रकाशनावर भर देण्यात येत असल्याने व त्याकामी संशोधक-प्रकाशक मंडळींना भरपूर पैसा-मोबदला मिळत असल्याने या संशोधनाचा उपयोग प्रत्यक्ष तंत्रज्ञान वा त्याच्याशी निगडित उद्योग प्रक्रिया अधिक सुधारित व प्रगत होण्यासाठी होतोच असे नाही. अधिकांश संशोधनाचे संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशन व त्यांचे संकलन इथवरच त्यांची मजल असते. त्यामुळेच इतर प्रगत अथवा प्रगतिशील तुलनेत 'संशोधन' या विषयावर अमेरिका कित्येक पटींनी अधिक खर्च करीत असली, तरी तेथील संशोधनाचा प्रत्यक्ष उपयोग अथवा उपयुक्तता मर्यादित स्वरूपातच राहते.

याउलट आपल्याकडील 'दर्प' म्हणजेच "Defence Advanced Research Projects Agency" सारखे उदाहरण विशेष उल्लेखनीय म्हणून देता येईल. या संशोधन प्रयोगाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, या संशोधनाचा मूळ विषय व मुख्य संगणक पद्धतीच्या माध्यमातून सार्वजनिक स्वरूपात संबंधितांच्या संदर्भ व अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. त्याचा फायदा अभ्यासक-संशोधक या उभयतांना होत असतो. संशोधनाचा गोषवारा संगणकीय पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा हा पायंडा जागतिक संशोधनाच्या संदर्भात मान्यताप्राप्त ठरला आहे. याचेच प्रमुख उदाहरण म्हणजे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मद्रास'द्वारा विशेष जागतिक पुढाकार स्वरूपात भारतीय उद्योग व शैक्षणिक संशोधन संस्थांच्या विशेष सहकार्यातून सुरू केलेल्या 'हेल्थ केअर टेक्नॉलॉजी इनोव्हेशन सेंटर'चे उदाहरण देण्यात येते.

चेन्नई येथे 'आयआयटी'मध्ये प्रस्थापित झालेल्या व जागतिक स्तरावर सक्षमपणे काम करणाऱ्या 'एचटीआयसी' संशोधन केंद्राने अल्पावधीतच उल्लेखनीय काम केले असून त्यामध्ये संशोधनावर आधारित असे विकसित तंत्रज्ञान अद्ययावत पद्धतीने सर्वदूर पोहोचविण्याचा विशेष समावेश करण्यात आला आहे. परिणामी देशांतर्गतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर वैद्यकीय माहिती व त्याच्या उपचार पद्धतीसाठी करता येणारा प्रयोग आणि उपयोग आता ग्रामीण व दूरवरच्या वैद्यक-उपचार केंद्रांप्रमाणेच मोबाईल म्हणजेच चालत्या-फिरत्या वैद्यकीय केंद्रांना होऊ शकतो. 'मद्रास आयआयटी'चे हे संशोधन जागतिक स्तरावर अशाप्रकारे क्रांतिकारी ठरले आहे.

वैद्यक क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण असे दुसरे उदाहरण म्हणून 'सुधा गोपाळकृष्णन् ब्रेन सेंटर'च्या संशोधन कामगिरीचा उल्लेख केला जातो. या केंद्राने मेंदू विकार व त्यावरील विशेष उपचार या संदर्भात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेण्याचे नवे व उल्लेखनीय असे काम केले आहे. मूलभूत सुविधा व इमारत बांधकाम क्षेत्रात 'आयआयटी मद्रास'ने जागतिक स्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या तंत्रज्ञानाच्या नावीन्याला व संशोधनपर तंत्रज्ञानाला पाश्चात्त्य देशांनी आधीच दाद दिली आहे. मुख्य म्हणजे, हे संशोधन पाश्चात्त्य देशांमध्ये अशा प्रकारच्या संशोधनासाठी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कितीतरी पटींनी कमी आहे. याचाच आर्थिक विरोधाभास की काय, पण आज 'जागतिक बँक', 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' व पाश्चात्त्य देशातील आर्थिक गुंतवणूक संस्था भारत आणि भारत सरकारला तंत्रज्ञान-संशोधनावर अधिक खर्चाची गुंतवणूक करण्याचा अनाहूत व फुकाचा सल्ला देत आहेत. या पाश्चिमात्य संस्थांनुसार सद्य:स्थितीत भारताची संशोधन क्षेत्रातील गुंतवणूक भारताच्या सकल घरेलू उत्पादन म्हणजेच जीडीपीच्या ०.६ टक्के आहे तर अमेरिकेची संशोधनावरील गुंतवणूक जीडीपीच्या दोन टक्के आणि चीनची तर तीन टक्के आहे, याचा दाखला दिला जातो. प्रत्यक्षात आज भारतात सेमीकंडक्टरसह कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक तंत्रज्ञान, सेंसर्स, नॅनो-टेक्नॉलॉजी या अधिकांश क्षेत्रात भारताने यापूर्वीच संशोधन केले आहे. याशिवाय अंतराळ तंत्रज्ञान यासारख्या प्रगत व खर्चीक क्षेत्रात भारताने केव्हाच यशस्वी आघाडी घेतली आहे. परिणामी भारताच्या प्रचलित व प्रस्तावित संशोधन गरजा लक्षात घेता, मर्यादित खर्चासह संशोधन करणे भारताला सहज शक्य आहे. पंतप्रधानांच्या नव्यानेच केलेल्या 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन'च्या संकल्पाने या विषयाला अधिक बळकटी लाभली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### माझा पुनर्जन्मावर विश्वास बसला, तुमचाही बसावा

देवेंद्र फडणवीस हा नाना फडणवीसांचा पुनर्जन्म आहे असे मला नक्की वाटते. कारण, महायुतीचा लोकसभेत पराभव झाल्यावरही विधानसभा निवडणूक त्याच महायुती सोबत लढणे वाटते तितके सोपे नव्हते. विरोधी काय स्वकीय पण नाराज दिसत होते. अशा वेळी अत्यंत शांतपणे व मुत्सुद्दीपणे जागावाटपाच्या वेळी त्यांनी मित्रपक्षांना दिलेल्या काही जागांवर भाजपाचे उमेदवार त्या पक्षांच्या चिन्हाखाली लढले पाहिजेत असा आग्रह धरला. त्या जागांसाठी शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे तगडे उमेदवार नाहीत, असा तर्क त्यांनी दिला व तो त्यांच्या पचनी पाडला. जी फारच कठीण गोष्ट होती. उमेदवार भाजपाचे, चिन्ह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे.

जेव्हा तुम्ही चांगली गोष्ट करता तेव्हा सज्जन शक्ती तुम्हाला मदत करतातच. यावेळी देखील संघ, समिती, संत मंडळी, विहिंप, बजरंग दल, जागरूक हिंदू संघटना महायुतीच्या मागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. शत-प्रतिशत मतदान, राष्ट्र हित में मतदान, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, लाडकी बहीण, लाडका भाऊ, वृद्ध निराधार योजना सगळ्यांची अंमलबजावणी सुरू झाली. आता खरे संकट पुढे होते, जसे मागील वेळी भाजप १०६+ व शिवसेना ५६ असे १६१+ बहुमत असूनही शिवसेनेने ऐनवेळी दगा देत भाजपाला विरोधी बाकावर बसवले होते, बाकी इतिहास आपल्याला माहीत आहेच.

भाजपाला लढायला जागा मिळाल्या १५२, भाजपाचे विजयी उमेदवार १३२. शिवसेनेच्या चिन्हावर भाजपाचे ११ उमेदवार विजयी. राष्ट्रवादी अजित पवारांच्या चिन्हावर भाजपाचे ८ उमेदवार विजयी. अशा प्रकारे एकटी भाजपा आधीच १५१ जागांवर आहे. सरकार स्थापनेसाठी १४५ जागा हव्या तो आकडा पार करत भाजपाने पूर्ण बहुमत मिळवले आहे. या दोन्ही मित्रपक्षांपैकी कोणीही काही दगाफटका केला तर... (ते तसे बिलकूल करणार नाही) पण... पण.... राजकारणात केव्हाही काहीही घडू शकते आणि त्यावेळी भाजपचे हे १९ आमदार भाजपला साथ देतील. १३२+१९=१५१.

पण मला तरी वाटते देवेंद्र फडणवीस हेच नाना फडणवीसांचा पुनर्जन्म आहे. हिंदू अंधश्रद्धा म्हणा हवे तर, पण नाना फडणवीसांचा तोच करारीपणा, मुत्सद्दीपणा, शांतपणे करेक्ट कार्यक्रम करणे हे सर्वच गुण या माणसांत कसे?

**रवी वाघमारे**/नागपूर.

## वाचक पत्रे

### हेल्मेटसक्ती नको

सध्या पुण्यासह महाराष्ट्रामध्ये रायडर आणि पिलिअन अशा दोघांनाही हेल्मेटसक्ती करण्याचा प्रयत्न होत आहे. यापूर्वीही अनेकदा हेल्मेटसक्तीचे प्रयोग झाले पण ते जनतेनेच उधळून लावले. बहुतेक शहरांमध्ये रस्त्यांची दुरवस्था आणि प्रचंड वाहतूक, यामुळे वेगात दुचाकी चालवणे अशक्य होते आहे. त्यामुळे दुचाकींचे अपघात अपवादानेच होत आहेत. त्यातही अशा काही अपघातांमध्ये हेल्मेट वापरल्यामुळे जीवाचा धोका टळेल असेही नाही. उलट हेल्मेट वापरल्यामुळे



वाहतुकीमधून दुचाकी चालवणे अवघड होते आणि इतरही अडचणी येतात, हा अनुभव अनेकांनी घेतला आहे. तेव्हा सरकारने असे निर्णय घेण्याऐवजी रस्त्यांची दुरुस्ती, सिग्नलसची कार्यक्षमता, वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यावर भर द्यावा.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### काँग्रेसचे अदानी रडगाणे

काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी सातत्याने संसद अधिवेशनापूर्वी उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर आरोप लावत असतात. नुकतेच अमेरिकेत अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर तेथील न्यायालयाने आरोप केले आहे. यावरून आता विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी परत एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. अदानींना अटक करायला हवी, पण पंतप्रधान मोदी हे करू शकत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींमध्ये अदानींना अटक करण्याची ताकद नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या आधीही उद्योगपती गौतम अदानी यांच्या समूहाबाबत अमेरिकन हिंडेनबर्ग कंपनीद्वारा प्रकाशित झालेल्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेतील एकूणच आरोपाबाबत सत्यता पडताळून पाहण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने या क्षेत्रातील जाणकार तज्ज्ञांची समिती गठित केली होती. या समितीद्वारा तयार करण्यात आलेल्या अहवालानुसार अदानी आणि कंपनी यांनी कोणतेही चुकीचे अथवा गैर काम केले नसल्याचे सांगण्यात आले होते. जर राहुल गांधींना अदानींवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये तथ्य वाटत असेल तर त्यांनी आपल्या पक्षाच्या तेलंगणा, हिमाचल प्रदेशमधील काँग्रेस सरकारला त्यांच्याद्वारा केलेले अदानी समूहाशी केलेले करार रद्द करण्यास का सांगत नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## निधन वृत्त

### दादासाहेब विरकर



**पिलीव, दि. २ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील दादासाहेब अण्णा विरकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते. त्यांनी मुंबई येथे गिरणी कामगार म्हणून अनेक वर्ष कार्यरत होते. सेवानिवृत्त झाल्यावर ते पिलीव येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे.

### ईश्वर वरेकर



**सांगोला, दि. २ डिसेंबर-**

देवकतेवाडी (मांजरी) ता. सांगोला येथील रहिवासी ईश्वर गोविंद वरेकर (वय-७५) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. मेजर नवनाथ वरेकर यांचे ते वडील होत.

### लक्ष्मीबाई जाधव



**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सहयोग नगर येथील लक्ष्मीबाई रामचंद्र जाधव (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानाभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. संतोष जाधव यांच्या मातोश्री आहेत. त्यांच्यामागे पाच मुली, एक मुलगा व नातवंडे असा परिवार आहे. आहे. मेजर नवनाथ वरेकर यांचे ते वडील होत.

### चंद्रकांत डोमनाळे यांचे निधन



**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

नांदणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील चंद्रकांत शरणप्पा डोमनाळे (वय ६५) यांचे सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी आठ वाजता हत्तुरे वस्ती येथील राहत्या घरापासून निघणार आहे. सकाळी नऊ वाजता सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक सिध्दाराम डोम नाळे यांचे ते वडील होत.

विवाहितेच्या छळ प्रकरणी

# सासू सासऱ्यासह नातेवाईकांच्या खटल्यास उच्च न्यायालयाची स्थगिती



**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

एका महत्त्वपूर्ण खटल्यात मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय दंड संहितेचे (आयपीसी) कलम ४९८ अंतर्गत क्रूरता आणि छळ केल्याचा आरोप असलेल्या सासरच्या लोकांविरुद्धच्या खटल्याच्या कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. या प्रकरणामध्ये सासरकडील नातेवाईकांवर केलेल्या आरोपांचा समावेश आहे. न्यायमूर्ती सारंग व्ही. कोतवाल आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी हा आदेश दिला आहे. पतीवर प्राथमिक आरोप असताना, कुटुंबातील इतर सदस्यांचा सहभाग अस्पष्ट असल्याचे दिसून आले. केवळ जास्तीत जास्त लोकांना खटल्यामध्ये गुंतवल्याचे सकृतदर्शनी दिसते असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. याचिकाकर्त्यांमध्ये सासू-सासरे, विवाहित नंदा व त्यांचा पती आणि एक अल्पवयीन नातेवाईक यांचा समावेश आहे. ज्यांच्यावर विशिष्ट असे आरोप नाहीत. पुढील विचारविमर्शाची गरज लक्षात घेऊन न्यायालयाने याचिकाकर्त्यांवरील खटल्याची कार्यवाही ३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थांबवण्याचे निर्देश दिले, तेव्हा या प्रकरणाची पुढील सुनावणी होईल. या प्रकरणात महाराष्ट्र शासनातर्फे ॲड सुकांत कर्माकर यांनी तर याचिकाकर्त्यांवतीने ॲड. रितेश थोबडे, ॲड अभिजीत इटकर यांनी बाजू मांडली.

# शहरातील अन्सारी चौकात तरूणावर तलवारीने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**



शहरातील डॉ. अन्सारी चौकात तरूणावर अज्ञात कारणावरून तलवारीने हल्ला करून जखमी केले. मौलाली बाशा नदाफ (वय ३६, रा. डॉ. अन्सारी चौक, शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. मौलाली नदाफ यांस २ डिसेंबर रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास डॉ. अन्सारी चौकात अज्ञात कारणावरून मुर्तुज जमील गोट्यालकर, जमील गोट्यालकर यांनी पाठीवर व कमरेवर तलवारीने वार करून जखमी केले. मौलाली नदाफ यास युनूस नदाफ यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/१००/२०२४ दि. ०२/१२/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्रीम. सावित्री राजकुमार विजापुरे - अर्जदार**
रा. गुड्डेवाडी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, गुडेवाडी ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील सावित्री राजकुमार विजापुरे रा. गुड्डेवाडी ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा हिराकांत राजकुमार विजापुरे याचा जन्म दि.२९/०३/२००४ रोजी मौजे गुड्डेवाडी ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलांच्या जन्माची नोंद करुन हिराकांत राजकुमार विजापुरे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०२/१२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०२/२/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**

---

**मध्य रेल्वे**
**आरएसपी विशेष दुरुस्तीचे काम**
**खुल्या निविदा सूचना क्र. Mech-KWV-BG-दार-दुरुस्ती-1 दि.30.11.2024**

कामाचे नाव: CW वर्कशॉप, कुर्डुवाडी येथे 24 महिन्यांच्या कालावधीसाठी सर्व इजदछ प्रकारातील Qty.400 वॅगन्स (860 दरवाजा कमी करणे + 860 दरवाजा ब्लॉक करणे) वरील दरवाजांच्या विशेष दुरुस्ती/बदलाचे RSP काम. अंदाजे किंमत: रु. 73,98,284.00/- निविदा फॉर्मची किंमत: शून्य ईएमडी: रु.1,48,000.00/- पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने. वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख 26.12.2024 रोजी 16.00 वाजेपर्यंत असेल. ई-निविदेचे संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे वेबसाइट http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत.

D.CME(WS)/KWW 579

तिकिटांसाठी UTS App डाउनलोड करा

---

**मुदखेड नगर परिषद मुदखेड जि. नांदेड**

**जा.क्र. मुनपा/ताशा/विकास/२०२४-२५/१०८२ दिनांक २९/११/२०२४**

**ई-निविदा सुचना (क्रं. ०२/२०२४-२५) (दुसरी वेळ)**

**स्वच्छता विभाग**

मुदखेड नगर परिषद अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत घनकचरा प्रकल्प येथे Compost Pit With Shed, MRF Shed, Sanitary Landfill, Leachate Tank विषयक बांधकाम करणे करिता ऑनलाइन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. अटी व शर्ती सह सविस्तर ई-निविदा प्रपत्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २४/१२/२०२४ रोजी १६:०० वाजे पर्यंत मागविण्यात येत आहे. तरी सर्व कंत्राटदारानी नोंद घ्यावी.

**(शैलेश फडसे)**
**मुख्याधिकारी**
**न.प.मुदखेड जि.नांदेड**

---

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि. कि. अर्ज नि.नं. १९/२०२४

**बार्शी येथील मे.सि.ज.सि.डि.सो. यांचे कोर्टात**

**बाबू शब्बीर मुजावर, - अर्जदार**
वय ५४ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर
विरूध्द
**कोणी नाही - सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार बाबू शब्बीर मुजावर हे मौजे पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर पत्त्यावर कायम स्वरूपी रहिवासी असुन त्यांचा मजुरी व्यवसाय आहे. प्रल्हाद पांडू जानराव हे अर्जदार बाबू शब्बीर मुजावर यांचे शेजारी राहणारे होते. प्रल्हाद पांडू जानराव यांना जवळचे कोणीही नातेवाईक नव्हते. तसेच त्यांची पत्नी रूपाबाई हि देखील मयत आहे त्यामुळे अनेक वर्षापासून अर्जदार बाबू शब्बीर मुजावर हेच प्रल्हाद पांडू जानराव यांची सेवा सुश्रुषा करत, पालन पोषण करत, आजारी पडल्यावर दवाखाना करत असत. त्यामुळे प्रल्हाद पांडू जानराव यांचा अर्जदार बाबू याचे वर संपूर्ण विश्वास होता. डि. सोलापूर सब. डी. व ता. बार्शी पैकी मौजे पांगरी येथील ग्रामपंचायत मिळकत नं २२४८/२ ही मिळकत प्रल्हाद पांडू जानराव यांच्या खरेदी मालकी वहिवाटीची आहे. त्यामुळे त्यांनी दि. ०७/०७/२०२० रोजी साक्षीदार नं १) सुशील काशिनाथ बाभळे २) ख्वाजा रसूल मुजावर यांचे समक्ष वरील मिळकतीचे मृत्यूपत्र अर्जदाराचे नावे करून ठेवले व वर नमुद मिळकत हि अर्जदारास देणेची इच्छा त्या मृत्यूपत्रात व्यक्त केली व दि. १७/१०/२०२० रोजी यातील प्रल्हाद पांडू जानराव मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदाराने सदरच्या मृत्युपत्रावरून वर नमुद मिळकतीस अर्जदाराचे नाव लावणेत यावे म्हणून ग्रामपंचायत कार्यालय पांगरी यांचेकडे विनंती केली असता त्यांनी सदरच्या मृत्युपत्रावरून कोर्टातून प्रोबेट करून आणणेस दि. ०३/०९/२०२४ रोजी या अर्जदारास सांगीतले. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अर्ज मयत प्रल्हाद पांडू जानराव यांचे मृत्यूपत्राचे प्रोबेट अर्जदाराचे नावे करून मिळणेसाठी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी,

सदर मिळकती मध्ये यातील अर्जदार बाबू शब्बीर मुजावर यांचे व्यतिरिक्त इतर कोणाचा हक्क हित संबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसंह दि. ०१/०१/२०२५ -रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास यातील अर्जदारांना

अर्जाप्रमाणे प्रोबेट देणेत येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले. ता. ३०/११/२०२४.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

---

**जाहीर नोटीस**

सर्वत्रास विशेषतः तालुका व शहर बार्शी येथील सर्व लोकांस, आमचे खरेदीदार अशिल यांनी सांगितलेवरुन, जाहीर नोटीस देण्यात येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील गट नं. ९३९/१ पैकी प्लॉट नं. १९ याचे क्षेत्रफळ १५१.०० चौ.मी. याची पुर्वबाजु १३.४० मी, दक्षिण बाजु- ११.२८ मी, पश्चिम बाजु १३.४०मी, उत्तर बाजु - ११.२८ मी असे. यासी चतुःसिमा पुर्वेस- प्लॉट नं. १८, दक्षिणेस- गट नं. ९३३/२ ची जमीन व रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं. २०, उत्तरेस - ६.१० मी. रुंदीचा रस्ता याचे पाणी व वागणुक उत्तर व दक्षिण बााजुचे रस्त्यांने जाते व आहे असा संपूर्ण खुला प्लॉट् आतील तदंगभुत वस्तु वहिवाटीचे हक्कासह,

वरील प्लॉट हा रमेश उत्तम कारकर रा. जावळा (नि) ता. परंडा जि. धाराशिव यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीतील आहे. त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी, जमीन खरेदीसाठी सदर प्लॉट विक्रीस काढला आहे. आमचे अशिल व त्यांचेमध्ये प्लॉटचे खरेदी विक्री विषयी बोलणी झाली, ठरलेप्रमाणे आमचे अशिलांनी त्यांना इसार दिलेला आहे. त्याअन्वये आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी घेणार आहेत.

तरी, या नोटीसीने कळविण्यात येते की, वरील प्लॉटचे मालकी, कब्जे वहिवाट, बोजा, तारण, पोटगी, लीन, लिज, टाच, भाडेपट्टा, भोगवटा हक्क वगैरे, तत्सम किंवा कोणत्याही स्वरूपाचे कसलेही हक्क, अधिकार कोणाचेही असल्यास अथवा सदर व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात त्यांचे हक्क, अधिकार व हरकत याबद्दल संपूर्ण कागदपत्र पुराव्यानिशी खातरजमा करून द्यावे, नसता वरील प्लॉट हा निर्वेध, निजोखमी, बिनबोजाचा आहे, त्याबद्दल कोणाचेही कसलेही हक्क, अधिकार नाहीत, व्यवहारास हरकत नाही, असल्यास त्यांनी त्यांचे हक्क- अधिकार, हरकत जाणीवपूर्वक स्वतःहून कायमस्वरूपी सोडून दिलेली आहे, असे समजून रजि. खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारत घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली.ता. ०३/१२/२०२४

**सही/-**
**श्री. रमेश कोंडीबा चव्हाण**
**बी.ए. एम.ए.(इंग्लिश), एलएल.बी.,**
**डी.टी.एल., एल.एल.एम. ॲडव्होकेट**
**रा. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

---

**महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/१००२/२०२४ दि. ०२/१२/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. आप्पाशा काशिनाथ जानकर - अर्जदार**
रा. कल्लप्पावाडी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, बादोले बु. ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील आप्पाशा काशिनाथ जानकर रा. कल्लप्पावाडी ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा महादेव आप्पाशा जानकर याचा जन्म दि.०१/१०/२००६ रोजी मौजे बादोले बु. ता.अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद करुन महादेव आप्पाशा जानकर या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.१३/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०२/१२/२०२४ रोजी आमचे बहाने कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**

---

**महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/१००१/२०२४ दि. ०२/१२/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. प्रकाश केरबा धायगोडे - अर्जदार**
रा. बादोले बु. ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय**
**ग्रामपंचायत, बादोले बु. ता अक्कलकोट - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील प्रकाश केरबा धायगोडे रा. बादोले बु. ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची भाची जयश्री विठ्ठल माने हिचा जन्म दि.०५/०५/२०१५ रोजी मौजे बादोले बु. ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या भाच्चीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या भाच्चीच्या जन्माची नोंद करुन जयश्री विठ्ठल माने या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २७/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या भाच्चीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०२/१२/२०२४ रोजी आमचे कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**

---

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३४८/२०२४

**१. मंजु मच्छिद्र सुदामे -- अर्जदार**
रा. शिंदे प्लॉट बार्शी ता. जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एस जी गायकवाड)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी -- गैरअर्जदार**
**तथामुख्याधिकारी न.प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. शिंदे प्लॉट बार्शी ता. बार्शी जि सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील सरकारी हॉस्पिटल बार्शी या ठिकाणी दिनांक ०१ एप्रिल १९८२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ एप्रिल १९८२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील सरकारी हॉस्पिटल बार्शी या ठिकाणी जन्म झालेबाबत कोणाची तक्रार ती त्याने स्वता किवा वकिला मार्फत मे न्यालयाच्या प्रसिध्दीच्या दिनांका पासुन एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन मुदतीत हरकत न अल्यास द्यावी कोणीचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या व शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**कार्यकारी दंडधिकारी**
**बार्शी**

---

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३३३/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. सुहास विश्वास पाटील - अर्जदार**
रा. बोरगाव (खुर्द) ता. बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एन.जी. शिंदे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा ग्रामसेवक, ग्रा. पं. बोरगाव (खुर्द) - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदारचा मुलगा संस्कार सुहास पाटील, रा. बोरगाव (खुर्द) ता. बार्शी जि सोलापूर यांचा मौजे बोरगाव (खुर्द) ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०२ मे २००७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदारचा मुलगा संस्कार सुहास पाटील यांचा दिनांक ०२ मे २००७ रोजी मौजे बोरगाव (खुर्द) ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का
**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

---

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३१५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. नारायण निवृत्ती नवले - अर्जदार**
रा. बारंगुळे प्लॉट बार्शी
(असल्यास, तर्फे वकील एन.जी. शिंदे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी - गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. बारंगुळे प्लॉट बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ में १९५१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोदंणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ में १९५१ रोजी नोदं बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत में. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली,

शिक्का
**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

---

**जाहीर समन्स/नोटीस**

रे. मु. नं.२५३/२०२०
नि.नं. ११

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**सौ. चंद्रकला गंगाराम माळी -- वादी**
**विरूध्द**
**दिलावर शाहू शेख, वगैरे -- प्रतिवादी**

प्रति,
**इन्नूस शाहू शेख,**
रा. मळेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर **-- प्रतिवादी नं. ६**
**......... यांना**

**ज्याअर्थी,**

सदरचा दावा यातील वादीने प्रतिवादीचे विरुध्द डिक्लेरेशन व निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर दाव्यात नमूद केलेल्या वादी यास यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस पाठविले असता सदर समन्स / नोटीसीची बजावणी झालेली नाही, तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर राहत नसल्यामुळे त्याची डकवून बजावणी ही करता आली नाही. तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर सध्या राहत नसून परगावी राहत असलेचा मे. बेलिफ यांचा रिपोर्ट आलेला आहे. त्यामुळे तुम्ही कोठे राहता तो नविन पत्ता मिळून आलेला नाही, त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर दाव्याचे समन्स/नोटीस न बजावता परत आलेली आहे.

त्याअर्थी,

तुम्ही प्रतिवादी नं. ६ यांनी सदर दाव्याचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ५/१/२०२३३ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात या दाव्याचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर दाव्याचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स नोटीस मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली. ता. २९/११/२४

**सही/-**
**लिपीक**

**सही/-**
**मा. सहाय्यक अधिक्षक, मा. दिवाणी न्यायालय, क. स्तर सो., बार्शी**

---

Classifieds

**पाहिजेत**

**डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळः- ९-५/६ फोन नं : ७०२०१४८४२६ ८६५२७५१९०२**

**पाहिजेत**

**अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला संपर्क : ९८९०१४३४३२**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

---

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**

फोन नं. ०२१८१-२२०२५३/२२०२४३ फॅक्स नं. ०२१८१-२२०२५३
टोल फ्री क्र.१८०० २३३२ २३० ई-मेल.comcakkalkot123@gmail.com

जा.क्र. २०२४/अ.न.प./आरोग्य१०/संकलन-१/कावि/१००७ आरआर दिनांक- ०२/१२/२०२४

**आरोग्य विभाग**
**जाहीर नोटीस**
**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम २९३ व कलम २९४ अन्वये नोटीस.**

या नोटीसीद्वारे अक्कलकोट शहरातील नागरिकांना कळविण्यात येते कि,

१) अक्कलकोट शहरामध्ये कुत्रे पाळत असताना कुत्र्याच्या गळ्यात मालकाचे नाव व पत्ता असलेला पट्टा किंवा नंबर असलेला बिल्ला असणे आवश्यक आहे.
२) शहरामध्ये कुत्रे पाळावयाचे असेल तर त्यासाठी नगरपरिषदेची रितसर परवानगी घेणे बंधनकारक राहील.
३) कुत्रा रस्त्यावर असताना किंवा तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत असताना त्यास मुसकी बांधणे आवश्यक आहे.
४) वरील तरतुदींचे पालन न झाल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम २९३ मधील मुद्दा क्र. २,३,४,५,६ अन्वये पुढील कारवाई करण्यात येईल.
५) कलम २९४ अन्वये नगरपरिषदेच्या परवानगी शिवाय कोणतेही डुक्कर/वराह शहरामध्ये पाळता येणार नाही.
६) शहरात विनापरवानगी पाळलेले अथवा भटके डुक्कर/वराह आढळ्यास कलम २९४ (३) अन्वये पुढील कारवाई करण्यात येईल.

**सही/-**
**रमाकांत डाके**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद, अक्कलकोट**

---

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.**
**रजि. ऑफिसः माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**website: www.saswadmalisugar.in**
**CIN-U15424PN1932PLC001904**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, भागधारकांची ९२ वी वार्षिक साधारण सभा कंपनी कायदा २०१३ व रूल्स व मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने (MCA) त्यांच्या ८ व १३ एप्रिल २०२० व दि. ५ मे २०२०, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१ तसेच मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या दि. ५ मे २०२२, २८ डिसेंबर २०२२ आणि २५ सप्टेंबर २०२३, १९ सप्टेंबर २०२४ च्या (एकत्रीतपणे MAC सर्क्युलर संदर्भित) सर्क्युलर अन्वये व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC)/ अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने घेण्यात येणार आहे.

कंपनीची ९२ वी वार्षिक साधारण सभा रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता सभासदांच्या सोयीसाठी सौभाग्य कार्यालय, माळीनगर येथे घेण्यात येणार आहे. नोटीसीत नमूद केलेल्या विषयांसाठी बोलाविण्यात आली आहे. भागधारकांना वार्षिक साधारण सभेत सेंट्रल डिपॉझीटरी सर्व्हिसेस लि. (CDSL) हे देणार असलेल्या सुविधेनुसार VC/ OAVM च्या माध्यमातून कामकाजात सहभागी होता येईल. VC/OAVM च्या माध्यमातून सभेस उपस्थित असलेल्या भागधारकांची कोरमसाठी गणना केली जाईल.

ज्या भागधारकांचे ई-मेल कंपनीकडे रजिस्टर केले आहेत त्यांना मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या वर नमूद सर्क्युलरनुसार कंपनीचा आर्थिक वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल ई-मेलने पाठविण्यात येईल. तसेच वार्षिक अहवाल कंपनीच्या www.saswadmalisugar.in या वेबसाईट वर उपलब्ध केला जाईल.

ज्या भागधारकांनी कंपनीकडे अथवा त्याच्या डिपॉझीटरी पार्टिसिपंटकडे ई-मेल रजिस्टर केले नाहीत त्यांनी त्यांचे नाव व फोलिओ नंबर, डिमॅट अकौंट नंबरसह सदरचे ई-मेल कंपनीच्या saswadmali@yahoo.com व डिपॉझीटरी पार्टिसिपंटच्या मेलवर पाठवावेत. जेणे करून त्यांना वार्षिक अहवाल पाठविता येईल.

नोटीसीत नमूद केलेल्या विषयावर रिमोट ई-व्होटींगने भागधारकांना मतदान करता येईल. ज्या भागधारकांनी रिमोट ई-व्होटींगने मतदान केले नाही त्यांना सभा सुरू असतांना ई-होटींगची सुविधा देण्यात येईल. वार्षिक साधारण सभेच्या नोटीसीतील विषयांवर मतदान करण्याबाबतची नियमावली नोटीसीसोबत जोडण्यात येणार आहे. तसेच मिटींगमध्ये कसे सहभागी व्हावे व मतदान करण्याबाबतच्या सुचना भागधारकांनी वाचाव्यात.

**माळीनगर**
**ता. ०३/१२/२०२४**

दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. करिता
**सही/-**
**राजेंद्र गो. गिरमे**
**चेअरमन**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### सर्वोत्तम पॅरा बॅडमिंटनपटू पुरस्कारासाठी नितेशला नामांकन

**नवी दिल्ली:** भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू नितेश कुमारची सोमवारी जागतिक बॅडमिंटन महासंघाने



बीडब्ल्यूएफ) पॅरा बॅडमिंटन 'प्लेअर ऑफ द इयर' पुरस्कारासाठी नामांकन केले. राजस्थानच्या बास कीर्तन गावातील असलेल्या नितेशने सप्टेंबरमध्ये पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये पुरुष एकेरी एसएल३ गटात सुवर्णपदक जिंकले. त्याने अंतिम फेरीत ग्रेट ब्रिटनच्या डॅनियल बेथेलचा २१-१४, १८-२१, २३-२१ असा पराभव केला. बीडब्ल्यूएफने जाहीर केलेल्या नामांकनांद्वारे नितेशला पुरुषांच्या पॅरा-बॅडमिंटनपटूसाठी नामांकन देण्यात आले. २९ वर्षीय नितेशला चेह लीक हौ (मलेशिया), डायकी काजिवारा (जपान) आणि क्यू झिमो (चीन) आदिंचा सामना करावा लागणार आहे. महिलांच्या पॅरा बॅडमिंटन प्रकारात ली फेंग मेई (चीन), लिऊ युटोंग (चीन), सरिना सातोमी (जपान) आणि लिआनी रातरी ओटकिला यांना नामांकन मिळाले. क्यू, लिऊ, ओक्टिला आणि ली यांना दुहेरीतही मानांकन मिळाले असून त्यांचे भागीदार माई जियान यिन मेंग लू, हिकमत रामदानी आणि लिन यांच्यासह वर्षातील पॅरा बॅडमिंटन जोडीसाठी नामांकन मिळाले आहे. ऑलिम्पिक विजेता व्हिक्टर एक्सेलसेन, एन. से यंग प्लेयर ऑफ द इयर पुरस्कारांसाठी नामांकित आहे.

### मिचेल मार्श ॲडिलेड कसोटीसाठी उपलब्ध

**ॲडिलेड** : आगामी ६ डिसेंबरपासून ॲडिलेडमध्ये सुरू होणाऱ्या भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळण्यासाठी आपण उपलब्ध असल्याचे स्वतः ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू मिचेल मार्चने सोमवारी जाहीर केले. माझ्या दुखापतीची चिंता दूर झाली आहे आणि मी दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळू शकतो, असे त्याने म्हटले आहे. पर्थ येथे झालेल्या सलामीच्या सामन्यात मार्शने अस्वस्थतेची तक्रार केल्यानंतर त्याने माघार घेतली. त्याने उजव्या हाताने १९.३ षटके टाकली होती, परंतु नंतर त्याला कडकपणाचा त्रास झाला. त्यामुळे ॲडिलेड येथे होणाऱ्या दिवस-रात्रीच्या सामन्यात खेळण्याच्या त्याच्या संधींवर शंका निर्माण झाली. मार्शच्या तंदुरुस्तीबद्दल शंका निर्माण झाल्यामुळे ऑस्ट्रेलिया संघात ब्यू वेबस्टरचा संघात समावेश करण्यास भाग पाडले.

### भारतीय महिला हॅण्डबॉल संघाचे नेतृत्व दीक्षा कुमारीकडे

**नवी दिल्ली** : मंगळवारपासून नवी दिल्लीत सुरू होणाऱ्या २० व्या आशियाई महिला हॅण्डबॉल अजिंक्यपद २०२४ स्पर्धेत २५ सदस्यीय भारतीय संघाचे नेतृत्व दीक्षा कुमारी करणार आहे. भारत प्रथमच आशियाई महिला हॅण्डबॉल स्पर्धेचे आयोजन करत आहे. जागतिक हॅण्डबॉल लीगद्वारे सादर केलेल्या व आशियाई हॅण्डबॉल महासंघाने आयोजित केलेल्या स्पर्धेत आशियातील बलाढ्य संघ आमने-सामने येणार आहे. संघांची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली असून प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत जातील. स्पर्धेतील अव्वल चार संघ २०२५ जागतिक महिला हँडबॉल चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरतील. मुख्य प्रशिक्षक सचिन चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने गांधीनगर, गुजरात येथील साई केंद्रात प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला. संघात मनिका पाल, भावना शर्मा, ठाकूर व नीना शिलसारख्या अनुभवी खेळाडूंचा समावेश आहे.

### दुसऱ्या सामन्यात भारताचा यजमान चीनकडून पराभव

**चेंगडू** : आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्वचषक स्पर्धेत सोमवारी यजमान चीनकडून भारताला ८-० ने पराभव स्वीकारावा लागला. स्पर्धेत गट १ च्या सलामीच्या सामन्यात भारतीय संघाला अमेरिकेकडून ३-८ असा पराभूत झाला. सलग दोन पराभव स्वीकारल्यानंतर भारत आता गट क्रमवारीत अव्वल मानांकित चीन, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका संघांच्या मागे आहे. पहिल्या टप्प्याच्या समाप्तीनंतर गटातील अव्वल दोनच संघ स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करतील. सुरुवातीच्या मिश्र दुहेरीत भारताच्या जीत चंद्रा आणि पृथा वर्टीकर यांचा पुरुषांमध्ये जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर कुआई मॅन आणि लिन शिडोंग या जोडीकडून ०-३ (८-११. २-११, २-११)) असा पराभव झाला. जागतिक क्रमवारीत ८८व्या क्रमांकावर असलेल्या यशस्विनी घोरपडेला महिला एकेरीच्या सामन्यात वांग यिदीविरुद्ध ०-३ असा पराभव पत्करावा लागला. विद्यमान विजेता व अव्वल मानांकित चीन, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका यांच्यासोबत स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यासाठी भारताच्या गट १ मध्ये आहे. मंगळवारी भारताचा तिसरा आणि शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. भारतीय संघ मनिका बत्रा, श्रीजा अकुला, शरथ कमल आणि जी. साथियन या अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत खेळत आहे.

## फुटबॉल सामन्यादरम्यान चाहत्यांमध्ये संघर्ष

# १०० हून अधिक लोकांचा मृत्यू

◆ **एन'झेरेकोर, २ डिसेंबर**

रविवारी गिनीच्या एन'झेरेकोर येथे फुटबॉल सामन्यादरम्यान चाहत्यांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षात सुमारे १०० लोक ठार झाले.

एन'झेरेकोर हे गिनीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर आहे. या शहरात गिनीचा लष्करी नेता, मामादी डुम्बौया यांच्या सन्मानार्थ फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मामादी डुम्बौया यांनी २०२१ च्या उठावात सत्ता काबीज केली व स्वतःला अध्यक्ष म्हणून स्थापित केले. त्यांच्या गौरवार्थ ही स्पर्धा होत होती.

एका फुटबॉल सामन्यादरम्यान काही चाहते रेफरीने घेतलेल्या एका निर्णयावर समाधानी नव्हते. रेफरीच्या वादग्रस्त निर्णयामुळे गोंधळ उडाला. त्यानंतर चाहत्यांनी मैदानावर आक्रमण केले व संघर्षाला हिंसक वळण मिळाले, असे अज्ञात साक्षीदाराने वृत्तसंस्थेला सांगितले.

या हिंसक संघर्षात सुमारे १०० लोक मरण पावले आहेत,



फुटबॉल सामन्यादरम्यान चाहत्यांमध्ये हिंसक संघर्षाचे छायाचित्र

असे वृत्त आहे.

स्थानिक रुग्णालयात नजर जाईल तिथपर्यंत रांगेत मृतदेह पडलेले होते. काही मृतदेह जमिनीवर पडलेले होते. संपूर्ण शवगृह मृतदेहांनी भरले आहे. हॉलवेमध्ये मध्येही मृतदेह पडले आहेत, असे एका डॉक्टरांनी नाव न छापण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले.

फुटबॉल सामन्यादरम्यान अशी घटना घडण्याची ही पहिलीच वेळ नाही. येथे फुटबॉल सामन्यादरम्यान चाहत्यांमध्ये भांडणे होतात, तेव्हा खेळाला हिंसाचाराचा इतिहास आहे.

हिल्सबरो आपत्ती ही आजही फुटबॉलमधील सर्वाधिक चर्चेत असलेली घटना आहे. १५ एप्रिल १९८९ शेफिल्डच्या हिल्सबरो स्टेडियमवर नॉटिंगहॅम फॉरेस्ट आणि लिव्हरपूल यांच्यातील एफए कप उपांत्य फेरीदरम्यान ही घटना घडली. ◂(वृत्तसंस्था)

# बरोबरीची कोंडी फोडण्यास गुकेश, लिरेन उत्सुक

## जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद

◆ **सिंगापूर, २ डिसेंबर**



येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत सलग तीन लढती अनिर्णीत राहिल्यानंतर आता मंगळवारी सातव्या फेरीत भारताचा ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश आणि गतविजेता डिंग लिरेन ही कोंडी फोडण्याचे लक्ष्य ठेवणार आहेत. स्पर्धेत सध्या दोघेही प्रतिस्पर्धी प्रत्येकी ३ गुणांसह बरोबरीवर आहेत. सोमवार विश्रांतीचा दिवस आहे.

१८ वर्षीय गुकेश, जो जेतेपदासाठी सर्वात तरुण आव्हानकर्ता असून अनेक बुद्धिबळ पंडित त्याच्याकडे विजेतेपद जिंकण्याचा प्रबळ दावेदार म्हणून बघत आहे, परंतु तो अद्यापही आपला दर्जेदार खेळ दाखवू शकला नाही. सुरक्षित खेळण्यासाठी किंवा खेळण्यासाठी अनेकदा तो प्रतिस्पर्ध्यावर अवलंबून राहिला आहे.

पांढऱ्या सोंगट्यासह पराभूत झाल्यानंतर पहिला गेम गुकेशसाठी एक वेक अप कॉल ठरला, तर दुसरा गेम भारतीयांसाठी आत्मविश्वास वाढवणारा होता कारण लिरेनने काहीही हालचाली केल्या नाही व लढत सहज बरोबरीत होऊ दिली.

गुकेशने तिसरा डाव जिंकला, परंतु लिरेनने चुकीची गणना केल्यामुळे ती आशादायक स्थिती होती. चौथ्या डावामध्ये गुकेशने पुन्हा दमदार खेळ केला व लिरेन फारसा प्रभावीपणे खेळला नाही, परिणामी ही लढत पुन्हा अनिर्णीत राहिली. पाचव्या डावामध्ये गुकेश पुन्हा पुढाकारासाठी लढताना दिसला आणि परिणामी डावाच्या अखेरीस तो धोक्यात आल्याचे लक्षात आले, परंतु लिरेन या संधीचा फायदा घेण्यात पुन्हा अयशस्वी ठरला व आणखी सामना अनिर्णीत राहिला.

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या सहाव्या डावाला मोठा इतिहास आहे. यावेळीही तो निराशाजनक नव्हता. गत जागतिक स्पर्धेत लिरेनने सहाव्या डावांत रशियाच्या इयान नेपोम्नियाचीचा पराभव केला होता व १९७२ मध्ये, बॉबी फिशरने बोरिस स्पास्कीला पराभूत केले होते. बॉबी फिशर हे आजही जगभरातील अनेक बुद्धिबळ चाहत्यांचे आवडते आहे. गुकेशही विजयाची पुनरावृत्ती करून लवकर अनिर्णीत राहण्याची कोंडी फोडेल अशी आशा आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारताचा जपानवर २११ धावांनी विजय

## १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट

◆ **शारजाह, २ डिसेंबर**

कर्णधार मोहम्मद अमनचे (१२२) शतक, सलामीवीर आयुष म्हात्रे (५४) व के.पी. कार्तिकेयच्या (५७) दमदार अर्धशतकांच्या बळावर भारताच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघाने आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सोमवारी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात जपानवर २११ धावांनी दणदणीत विजय नोंदवला.

प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत ६ बाद ३३९ धावा उभारल्या व जपानसमोर विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य ठेवले. परंतु प्रत्युत्तर देताना जपानला मर्यादित षटकांत ८ बाद १२८ धावांपर्यंतच मजल मारता आली.

पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा



शतकवीर मोहम्मद अमन

लागल्यानंतर भारतीय संघाने जपानविरुद्ध उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. भारताचा हा स्पर्धेतील पहिला विजय ठरला असून भारताने दोन गुणांसह अ गटात पाकिस्तान (४) व संयुक्त अरब अमिरात (युएई, २) या संघांनंतर तिसरे स्थान मिळविले आहे. भारताला अजून युएई विरुद्ध सामना खेळावयाचा आहे. ब गटात श्रीलंका व बांगलादेश प्रत्येकी ४ गुणांसह पहिल्या दोन स्थानावर आहेत.

जपानने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताचा सलामीवर आयुष म्हात्रे व वैभव सूर्यवंशीने (२३) पहिल्या गड्यासाठी ६५ धावांची भागीदारी केली. म्हात्रेने सी. आंद्रे सिद्धार्थच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व संघाला शंभर धावांच्या जवळपास आणले. म्हात्रेने २९ चेंडूंत ६ चौकार व ४ षट्कारांसह ५४ धावांची खेळ केली. सिद्धार्त ३५ धावा काढून बाद झाला. पुढे कर्णधार मोहम्मद अमनने संघाचू सूत्रे आपल्या हाती घेत के. पी. कार्तिकेयसोबत चौथ्या गड्यासाठी १२२ धावांची भागीदारी केली. कार्तिकेयने ४९ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ५७ धावांचे योगदान दिले. पुढे अयानने निखील कुमार (१२), हरवंश पंगालिया (१) व हार्दिक राज (नाबाद २५) यांच्या सहकार्याने भारताला ५० षटकांत ६ बाद ३३९ धावांचा टप्पा गाठून दिला. मोहम्मद अयान १२२ धावांवर नाबाद राहिला. त्याने ११८ चेंडंच्या खेळीत ७ चौकार खेचलेत.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना जपानकडून केवळ सलामीवीर हुगो केली व पाचव्या क्रमांकावरील फलंदाज चार्लिस हिंझेने एकाकी झुंज दिली, परंतु त्यांची खेळी संघाला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही. हुगो केलीने १११ चेंडूंचा सामना करत ६ चौकारांसह ५० धावांची खेळी केली, तर चार्लिस हिंझेने ६८ चेंडूंत ३५ धावांची भर घातली. इतर फलंदाज भारतीय गोलंदाजासमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाही, परंतु जपानने ५० षटके खेळून ८ बाद १२८ धावांपर्यंत मजल मारली.

भारताकडून चेतन शर्मा, हार्दिक राज व के. पी. कार्तिकेयने प्रत्येकी २ बळी, तर युधजीत गुहाने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# प्रो-कबड्डी लीग सामने पुण्यात आजपासून

◆ **पुणे, २ डिसेंबर**

अकराव्या प्रो-कबड्डी लीग (पीकेएल) हंगामाचे पहिले दोन टप्पे हैदराबाद व नोएडा येथे पार पडल्यानंतर आता अंतिम टप्प्यातील सामने ३ डिसेंबरपासून पुण्यात सुरू होणार आहे.

हा हंगाम पीकेएलच्या सर्वोत्तम हंगामांपैकी एक आहे, कारण गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेलया हरयाणा स्टीलर्स शिवाय कोणताही संघ पीकेएल ११च्या प्लेऑफसाठी पात्र ठरला नाही.

पुणे येथील अंतिम टप्प्यातील पहिला सामना बंगळुरू बुल्स व गुजरात जायण्ट्स यांच्यात होणार आहे, तर दुसरा सामना गतविजेता पुणेरी पलटण व यु मुम्बा यांच्यादरम्यान होणार आहे. सध्या पुणेरी पलटण पाचव्या स्थानावर आहेत आणि पीकेएलच्या शेवटच्या टप्प्यात घरचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. यु मुम्बा सुद्धा कडवी टक्कर देण्याचा प्रयत्न करेल आणि ते गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहेत. या हंगामात दोन्ही संघांची एकदाच गाठ पडली होती व पुणेरी पलटणने यु मुम्बाला पराभूत केले होते. सध्या पीकेएलच्या बारा संघांच्या गुणतालिकेत हरयाणा स्टीलर्स (६१), पाटणा पायरेट्स (५२), दबंग दिल्ली (४८), तेलुगू टायटन्स (४८), पुणेरी पलटण (४७), जयपूर पिंक पँथर्स (४६), यु मुम्बा (४६), युपी योद्धा (४३), तामिळ थलायव्हास (३३), बंगाल वॉरिओज (२६), गुजरात जायण्ट्स (२६) व बंगळुरू बुल्स (१६) अनुक्रमे पहिल्या ते बाराव्या क्रमांकावर आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# स्वप्निल हुल्लेकडून तेजस दौंडेला पराभवाचा धक्का

## नीता नरेंद्र तांबोळकर चषक बुद्धिबळ स्पर्धा

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

नीता नरेंद्र तांबोळकर चषक बुद्धिबळ स्पर्धेत मागील नऊ स्पर्धांमध्ये विजयी ठरलेला मंगळवेढ्याच्या तेजस दौंडे व स्वप्नील हुल्ले यांच्यात सिसिलियन बचाव पध्दतीने सुरुवात झालेल्या डावात सुरुवातीलाच झालेल्या वजीराच्या चुकीच्या खेळी मुळे तेजसने त्याचा वजीर गमावला व त्यानंतर स्वप्निल यांने तेजस कडून झालेल्या या चुकीचा फायदा उठवत स्वप्नील ने डावात सहज विजय मिळवला

सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे सुरू असलेल्या श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन च्या मान्यतेने सुरू असलेल्या या स्पर्धेत १३ व



३० वर्षा खालील वयोगटातील १८५ खेळाडूंनी भाग घेतला आहे. ही स्पर्धाअचूकपणे संपन्न करण्यासाठी या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रशांत पिसे, इरन्ना जमादार,सम्मेद हुल्ले बिलानीसिद्ध बिराजदार, मंगला हुल्ले वअनिरुद्ध कुलकर्णी हे काम पाहात आहेत

**तिसऱ्या फेरी अखेर काही निकाल : ३० वर्षाखालील:** स्वराली हातवळणे बरोबरी विरुद्ध अथर्व रेड्डी, लिमकर वरद वि वि हर्ष देशपांडे, स्वप्निल हुल्ले वि वि तेजस दौंड, कोरे प्रज्वल विवि गानबोटे ईश्वरी, सागर पवार विवि श्रीनिधी शाबादे,स्वप्निल हदगल विवि शिंदे प्रथमेश, तापकीरे स्वानंद विवि देवनपल्ली श्रावणी, बोबडे श्रेयस वि वि प्रीतम मडके, मुसळे मानव विवि सक्षम गायकवाड.

**तेरा वर्षाखालील :** अनन्या उलभगत बरोबरी विरुद्ध श्रेयस इंगळे, गोरे सांनवी विजयी विरुद्ध आयुष् जानगवळी, अंबरकर शिवम वि वि जमादार शशांक, श्लोक आळंद वि वि कमलीवाले अशाज, कसबे आदित्य वि वि भागवत कार्तिक, कुदळे श्रेयस विवि बिराजदार सुकन्या, बिराजदार यशोदा विवि मोमीन फैज, चौधरी श्लोक विवि विहान पत्की, पवार प्रथमेश विवि दासरी विवान.

# महा थ्रो बॉल असोसिएशनच्या अध्यक्षपदी दर्शील कोटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महा थ्रो बॉल असोसिएशनचे अध्यक्षपदी दर्शील मनोज कोटक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

असोसिएशनची सर्वसाधारण सभा मुलुंड ठाणेतील (मुंबई ) कालिदास क्रीडा संकुल येथील तथास्तु सभागृहामध्ये संपन्न झाली. अध्यक्षपदी असोसिएशनचे उपाध्यक्ष दिनेश अहिरे (नाशिक) यांनी सूचक व अनुमोदन म्हणून डॉ संजय निकम (जळगाव) यांनी दिले. राज्यातील ३२ जिल्ह्यातील जिल्हा सचिव या सभेला उपस्थित होते. फेडरेशनचे कार्यकारी सदस्य चंद्रकांत निरभवणे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. याप्रसंगी संघटनेचे



महासचिव राहुल वाघमारे, उपाध्यक्ष डॉ राकेश तिवारी, कार्यकारणी सदस्य दीपक कदम, खजिनदार प्रियंका धुरी यांच्या उपस्थितीमध्ये सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

या सभेत विविध विषयांवर चर्चा करून शालेय थ्रोबॉल क्रीडा स्पर्धा व सब ज्युनिअर, सीनियर स्पर्धेचे नियोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनेश अहिरे यांनी थ्रोबॉल खेळाचे इतिहास व स्पर्धेचा लेखा जोखा सांगितला. त्याप्रसंगी संघटनेचे महासचिव राहुल वाघमारे (मुंबई), उपाध्यक्ष डॉ. राकेश तिवारी (चंद्रपूर), औरंगाबाद जिल्हा सचिव गोकुळ तांदळे, सोलापूर जिल्हा सचिव राजेंद्र माने, जळगाव जिल्हा सचिव डॉ संजय निकम, परभणी जिल्हा सचिव कैलास माने, रायगड जिल्हा सचिव विलास मोरे, अहिल्यानगर जिल्हा सचिव प्रा बाबा गायकवाड, पुणे जिल्हा सचिव जयदीप तांब्हेकर यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका दुरी यांनी केले. दीपक कदम यांनी आभार मानले.



# आयडीयल स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

आयडीयल इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. यांचे उद्घाटन क्रीडा शिक्षगक प्रा.संतोष खेंडे यांच्या हस्ते झाले. त्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित व मैदानाचे पुजन करून करण्यात आले. याप्रसंगी चारही हाऊसच्या विद्यार्थ्यांनी हाऊस संचलन सादर केले. क्रीडा शपथ राष्ट्रीय खेळाडू सुहानी चव्हाण यांनी सर्व खेळाडूंना दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन चव्हाण, सचिवा ज्योती चव्हाण, मुख्याध्यापिका उर्मिला कटाप, क्रीडा प्रमुख नर्गिस मुजावर, क्रीडा शिक्षक संतोष संगवे, रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा महोत्सवात खेळाडूना धावणे, संगीत खुर्ची, लंगडी, रस्सीखेच, कबड्डी, व्हॉलिबॉल, थ्रोबॉल, क्रिकेट आणि विविध मनोरंजनात्मक खेळ होणार आहेत.

### विविध खेळात सहभाग घ्या

खेळाडूंना मार्गदर्शन करताना प्रा. खेंडे म्हणाले, मन व शरीर कायम निरोगी व उत्साहीत ठेवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी विविध खेळात सहभाग घ्यावा. विशिष्ट क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवून पुढे जाऊन यात करिअर देखील घडविता येते. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी याकडे लक्ष द्यावे.

# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीस ३८ पदके



**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

बिनोरीयो कराटे इंडिया व ओकिनावा मार्शल आर्ट्स अकॅडमीच्या वतीने श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बालेवाडी पुणे येथे झालेल्या २७व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या खेळाडूंनी ६ सुवर्ण, ७ रौप्य व २५ कांस्य अशी ३८ पदकांची कमाई केली.

सर्व विजेत्या खेळाडूंना संस्थेचे मुख्य प्रशिक्षक सेन्साई शिवशरण वाणी परीट व सहाय्यक प्रशिक्षिका स्मिता वाणी परीट यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या खेळाडूंचे आमदार देवेंद्र कोठे, संतोष पवार, सचिन स्वामी आदींनी अभिनंदन केले.

**पदकप्राप्त कराटेपटू : सुवर्ण :** यशराज नवले, धनराज नवले, अनन्या यावलकर, प्रसाद सलगर, वैदही नवले (कुमेते), अक्षता स्वामी (काता).

**रौप्य :** शंतनू कुलकर्णी, अशोक वाघमोडे, अपूर्वा घुले, कबीर भोसले (कुमेते), स्वराज भोसले, अनन्या यावलकर, समृद्धी वाणीपरीट (काता).

**कांस्य :** अक्षता स्वामी, आदित्य कदम, शौर्या शेलार, स्वराज भोसले, युग भोसले, रणवीर बरगंडे, समृद्धी वाणीपरीट, काव्या जगताप, जयराज नवले, प्रज्वल माने, प्रथमेश कदम, सोहम पवार, जयश्री कौडकी, हर्ष कौडकी, सार्थक पवार, मल्लिकार्जुन मुंदडगी, धनश्री मुंदडगी, समर्थ लोकरे, पियुष भोसले (कुमेते). प्रसाद सलगर, आदित्य कदम, रणवीर बरगंडे, काव्या जगताप, अपूर्वा घुले, प्रज्वल माने (काता).



# राज्य योंगमुडो स्पर्धेमध्ये रुद्रशक्ती गुरुकुलची २० पदकांची कमाई

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

मुंबई (साइन) येथे झालेल्या ९व्या राज्य योंगमुडो स्पर्धेमध्ये पूमसे आणि क्योरूगी या प्रकारात रुद्रशक्ती गुरुकुलच्या खेळाडूंनी १८ सुवर्ण, १ रौप्य व १ कास्य अशी २0 पदकांची कमाई केली.

या सर्व विद्यार्थ्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो असोसिएशन महाराष्ट्र सचिव नागेश शेट्टीकर, योंगमुडो असोसिएशन इंडिया अध्यक्ष रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी : १0 वर्षाखालील :** भविष्या सिद्दम (१ सुवर्ण, १ कांस्य), दुर्वा रोहिटे (२ सुवर्ण).

**१४ वर्षाखालील :** भावेश खुणे (२ सुवर्ण), विराज लोला (१ सुवर्ण, १ रौप्य), हार्दिक चिलका (२ सुवर्ण), बिंदूप्रिया खुणे (२ सुवर्ण), दिव्या मिस्कीन (२ सुवर्ण), आदिती नल्ला (२ सुवर्ण).

**१७ वर्षाखालील :** योगिता सरवदे (२ सुवर्ण).

**१९ वर्षाखालील :** अनुषा मिस्कीन (२ सुवर्ण).

## संक्षिप्त वृत्त



### खंडोबा यात्रेनिमित्त कट्टा ग्रुपतर्फे महाप्रसादाचे वाटप

**अणदूर, दि. २ डिसेंबर-**

ग्रामदैवत खंडोबा यात्रेनिमित्त येथील कट्टा ग्रुपच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. नवसाला पावणारा मल्हार मार्तंड, अणदूरचे ग्रामदैवत श्री खंडोबाची आज यात्रा होती. या यात्रेसाठी दूरदूरच्या गावावरून भाविक आपले नवस फेडण्यासाठी व दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येतात त्यांना येथील कट्टा ग्रुपच्या वतीने भव्य महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अन्नदान महाप्रसादाचे उदघाटन तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळणगे व नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पी.आय. गजेंद्र सरोदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. महाप्रसादाचे वाटप कट्टा ग्रुप चेविकास करपे, गोटू मुळे, लक्ष्मण मुळे, बाबा गोवे, अण्णासाहेब आलुरे, सुभाष कोळी, बसवेश्वर पाटील, रोहन दुधाळकर, राहुल घोडके, संदीप धुमाळ, प्रज्योत कर्पे, रवी तडकसे, गणेश मंगळवेढे, बाबुराव मुळे,अण्णाराव चव्हाण, डॉ. हरिदास मुंडे, विक्रांत आलुरे, बसवराज भंडारकठे, अक्षय चव्हाण, सागर व्हड्डें, सचिन आलुरे, राजाभाऊ साखरे, प्रविण जाधव आदी अनेक युवकांनी योगदान दिले.



### कडलास ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुमन अनुसे यांची निवड

**सांगोला,दि.२ डिसेंबर-**

सांगोला तालुक्यातील कडलास ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शेकापच्या सुमन दादासो अनुसे यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल अनुसे यांचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सीमा केदार यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त पदासाठी सोमवारी निवड प्रक्रिया पार पडली. उपसरपंच पदासाठी दोन अर्ज दाखल झाल्याने निवड सदस्य मतदानातून झाली. यामध्ये सुमन अनुसे यांच्या बाजूने ११ तर विरोधी उमेदवार यांच्या बाजूने ६ मते पडली. अध्यासी अधिकारी दिगंबर भजनावळे व ग्रामसेवक राजकुमार ताटे यांनी सुमन अनुसे यांना विजयी घोषित केले. सदर निवडीप्रसंगी मारूती लवटे, बाबुराव गायकवाड, शिवाजीराव गायकवाड, समाधान पवार, डॉ.यशोदिप गायकवाड, अरूण वाघमोडे, नारायण वाघमोडे, रामहरी ननवरे, अंकुश ननवरे, निलेश माने, दत्तात्रय जाधव, प्रशांत साळुंखे, पांडूरंग काशिद, बंडू सातपुते, शिवाजी ठोकळे उपस्थित होते.



### गवई रिपाइंच्या शहर-जिल्हा अध्यक्षपदी महिलांची वर्णी

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

गवई गटाच्या रिपाइं या पक्षाची नव्याने बांधणी करण्यात येत असून, पक्ष बळकटीसाठी महिलांना संधी देण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षपदी कविता ससाणे, जिल्हाध्यक्षपदी पूनम मोरे, तर शहराध्यक्षपदी आरती महागावकर यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष जक्कप्पा कांबळे होते. मोहोळ तालुका कार्यकारणी सदस्यपदी ननवरे, माळशिरस येथील वैभव दहेंजो यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी देशपांडे व तालुकाध्यक्षपदी रमेश साळवे, तालुका उपाध्यक्षपदी महादेव समिंदर यांची निवड करण्यात आली. तर, गौस पिरजादे यांची महाराष्ट्र अल्पसंख्यांक महासचिवपदी निवड करण्यात आली. यावेळी जक्कप्पा कांबळे, जिल्हाध्यक्ष धर्मा माने, श्रीकांत सावंत, दत्ता सावंत यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष जगताप कांबळे यांनी पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले.यावेळी शहराध्यक्ष संघराज बिराजदार, अल्पसंख्याक युवाध्यक्ष सिकंदर शेख, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष राजू लोंढे, जगदीश ओहोळ, संदीप ससाने, मल्लय्या स्वामी, मारुती सोनवणे यांनी आभार मानले.

### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्याध्यक्षपदी स्वामीनाथ हेगडे

**अक्कलकोट, दि.२ डिसेंबर-**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ या संघटनेच्या अक्कलकोट तालुका कार्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते स्वामीनाथ हेगडे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले आहे. सदरची निवड ही दिनांक एक डिसेंबर २०२४ ते पुढील तीन वर्षापर्यंत राहणार आहे. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे तालुका कार्याध्यक्ष स्वामीनाथ हेगडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक राजकीय क्षेत्रात काम करत आहेत. सध्या ते



शिवसेना कामगार सेनेचे तालुकाप्रमुख म्हणून काम करत आहेत. स्वामीनाथ हेगडे यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. यावेळी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय किणीकर जिल्हाध्यक्ष सुळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना स्वामीनाथ हेगडे यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्यांवर आवाज उठविणार असल्याचे सांगितले.

# भंडारकवठे येथील भीमा नदीच्या पात्रावर मोठा पुल करा

**● ग्रामस्थांची मागणी; राज्यासह कर्नाटकात प्रवाशांचे दळण वळण वाढणार**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २ डिसेंबर-**

भंडारकवठे येथील भीमा नदी पात्रावरून दळण-वळण होण्यासाठी आणि राज्यासह कर्नाटकाला जोडण्यासाठी येथील नदी पात्रावर मोठा पूल व्हावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे.

भंडारकवठे हे महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमेवरील मोठे गाव आहे. येथील भीमा नदी पात्रावर वाहतुकीसाठी मोठे पूल होणे गरजेचे आहे. हा पूल झाल्यास कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, सांगोला हे दोन तालुके जोडणार आहेत. तसेच या पुलामुळे सांगली जिल्ह्याच्या सीमेपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. जत हा तालुकाही दक्षिण सोलापूरला जोडू शकतो. तसेच बेळगाव जिल्ह्यातील अथनीसह अन्य तालुकेही जवळ येणार आहेत.

सध्या दक्षिण सोलपुरातील मंद्रुप, कंदलगाव, औराद, कामती, कुरूल आणि हत्तूरसह मोहोळ तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांना अथनी किंवा बेळगावला जाण्यासाठी विजापूर किंवा मंगळवेढा या मार्गे जावे लागते. येथे पूल झाल्यास या सर्वच गावांना चाळीस ते पन्नास किलोमीटरचा अंतर कमी होऊन ही गावे जवळ येणार आहेत. याशिवाय मंगळवेढा तालुक्यातील भैरवनाथ, फॅक्टरीआणि युरोपियन येथील साखर कारखान्यांना दक्षिण सोलापूरातील भंडारकवठेसह तेलगांव-भीमा, कुसूर, विंचूर, कामती आणि कुरूल आदी गावातील शेतकऱ्यांचा ऊस जातो. तर कर्नाटकातील उमरज, निवरगी, गोविंदपूर, रेवतगाव यासह अन्य गावातील ऊस येथील लोकमंगल साखर कारखाना येथे शेतकरी पाठवतात. तसेच द्राक्ष उत्पादक शेतकरी आपल्या शेतात पिकवलेला बेदाणा हे सध्या मंगळवेढा किंवा चडचण मार्गे तासगावच्या बाजार समितीला विक्रीसाठी पाठवतात. हा पूल झाल्यास बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून जिल्हा प्रशासनाकडून येथे पूल होण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी मागणी दोन्ही राज्यातील शेतकरी आणि प्रवाशांमधून केली जात आहे.




**पूल झाल्यास शेतकऱ्यांचा फायदा**

भंडारकवठे येथील नदी पात्रावर पूल व्हावी अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून आहे. सध्या येथील बंधाऱ्यावरून देखील वाहतुक मोठ्या प्रमाणात होत आहे. पण पावसाळ्यात नदी पात्रातील पाणी बंधाऱ्यावरून वाहू लागल्यास वाहतुकीला ब्रेक लागतो. विविध गावातील प्रवाशांचा विचार करून येथे मोठा पूल होणे गरजेचे आहे.

- **भिमाशंकर बबलेश्वर,** सरपंच भंडारकवठे

**जत तालुका जवळ होणार**

भंडारकवठेत भिमा नदी पात्रावर वाहतुकीसाठी पुलाची गरज आहे. येथे पूल झाल्यास होटगीसह कुंभारी आणि अन्य गावातील नागरिकांना सांगली आणि जत तालुका जवळ होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून पूल होण्यासाठी प्रयत्न करावेत.

- **सचिन व्हनमाने,** कार्याध्यक्ष, दक्षिण तालुका युवक काँग्रेस



## कर्मयोगी कारखान्याच्या साखर पोत्याचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २ डिसेंबर-**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या १ लाख २१ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या उपस्थितीत व संचालक सुदाम बापू मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे आणि संचालक व कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी उपस्थित होते.

यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक कारखान्याचा गळीत हंगाम २०२४ / २५ व्यवस्थित सुरू असून कारखाना नेहमी ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांचे हीत सोपासत आला आहे . यावेळी येणाऱ्या ऊसास चांगला दर देणार आहे. सध्या कारखाना प्रतीदिन सरासरी ८५०० मे.टनाप्रमाणे ऊस गाळप करीत आहे. यामध्ये वाढ होवून तो प्रतिदिन ९००० मे. टनापर्यंत गाळप करील असा विश्वास व्यक्त केला. शासनाने सिरप ते इथेनॉल वरील बंदी उठविल्यामुळे कारखान्याचे सुमारे १२०० ते १५०० मे.टन ऊस गाळप जास्तीचे होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादकांचा ऊस वेळेवर गाळप होईल. या हंगामात कारखान्याचे १२ लाख मे.टन ऊस गाळपाचे उदीष्ट असून कारखाना ते पुर्ण करणार आहे. कारखान्याचा को-जन प्रकल्प, आसवानी प्रकल्प सुरळीत सुरु आहेत. कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी म्हणाले, या हंगामात कारखान्याने १७ दिवसात १ लाख ३३ हजार ६८ मे.टन ऊसाचे गाळप करीत १ लाख २१ हजार १११ साखर पोत्यांचे उत्पादन केले आहे. को-जनरेशनमधून ७५ लाख युनिट विज निर्मीती केली असून आसवानी प्रकल्पामधून ११ लाख बल्क लि. उत्पादन घेतले आह आहे. यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, हणमंत कदम, सुदाम मोरे, विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, सिताराम शिंदे, राणू पाटील, तज्ञ संचालक दाजी पाटील, दिलीप गुरव कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## जागा, जमीन मोजणी महागली

**▸ हेक्टरी २ हजार तर द्रुतगती मोजणीसाठी चारपट दर**
**▸ ई-मोजणीत केले बदल; उपस्थितांचे फोटो होणार अपलोड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

जागा किंवा जमिनीची मोजणी करताना आता १ डिसेंबरपासून सुधारित मोजणी दर आले असून, आता प्रती हेक्टरी मोजणीस २ हजार आणि द्रुतगतीने म्हणजेच अर्जंट मोजणी करायची झाल्यास त्याच्या चारपट म्हणजेच हेक्टरी ८ हजार रूपये मोजावे लागणार आहेत. तर ६ हेक्टरच्या पुढे १ हजाराप्रमाणे दर राहणार आहे. दरम्यान, ई-मोजणीत आता नवनवे बदल झाल्याने कोणाचीही जागा किंवा जमिनीत फसगत होणार नाही; यासाठी 'भूमि अभीलेख'ने ई-मोजणी व्हर्जन-२ आणले आहे आणि जबाब घेताना आधारकार्डचे बंधन केल्याची माहिती भूमि अभिलेखचे जिल्हा अधीक्षक दादासाहेब घोडके यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २) दिली. दरम्यान, या प्रक्रियेमुळे शासनाला जमीन भूसंपादनाचा मावेजा संबंधित व्यक्तीला कोणतीही तक्रार न येता थेट देता येणार आहेत.

मध्यंतरी जिल्ह्यातून विविध महामार्गाची निर्मिती झाली, सोलापूर-धाराशिव रेल्वेमार्गही नव्याने चालू झाला. याचा मावेजा देताना भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी किंवा कोर्टाकडे जमिनी आणि जागेसंबंधी अनेक तक्रारी आल्या आहेत. अनेकांच्या या तक्रारीमुळे अनेक नागरिकांचा भूसंपादन केलेल्या जमिनीचा म ावेजा कोर्टाकडेच प्रलंबित आहे. वर्षानुवर्षे अनेकांची जागा-जमिनीसंबंधी कोर्टातही तडजोड न झाल्याने अनेकजण मयतही झाले मात्र त्यांची दुसरी पिढी हा वाद खेळतच आहे. आता अभीलेख'चे ई-मोजणी व्हर्जन-२ आल्याने अशा तक्रारी भविष्यात निर्माण होणार नाहीत. नागरिकांची जागा-जमिनीची फसगत होणार नाही. कारण, आता ज्यांना जमिनीचे व्यवहार झाल्यावर किंवा इतर कारणामुळे जागा-जमिनीची मोजणी करायची असते तेव्हा संबंधितांचे आधारकार्ड, शेजारच्या लोकांची असलेली उपस्थिती व इतर उपस्थितांचे फोटो आता अपलोड होणार आहेत. इतकेच नाहीतर संबंधित जागा-जमिनीची गुगल इमेज, जीपीएस लोकेशन त्या वेबसाईटवर अपलोड केले जाणार आहे. जेणेकरून भविष्यात कोणाचीही फसगत होणार नाही.

**सांगोला तालुक्यात राबविला पहिला प्रयोग**

'भूमी अभीलेख'चे ई-मोजणी व्हर्जन-२ चा पहिला प्रयोग सांगोला तालुक्यात राबविला असून, यानंतर दुसरा प्रयोग उत्तर सोलापूर आणि मोहोळ तालुक्यात राबविला आणि यानंतर इतर सर्व तालुक्यात गेल्या १ महिन्यापासून हा ई-मोजणी व्हर्जन टु चा प्रयोग सुरू केला आहे. यात काही त्रुटीही निर्माण होत आहेत, त्या त्रुटींचीही पूर्तता करून नवे व्हर्जन, नव्या रूपाने सुरू होवून यातून मोजणीची पारदर्शकता स्पष्ट होवून भविष्यात जागा-जमिनीची कोणाचीही फसगत होणार नाही, याची आम्ही दक्षता घेणार आहोत.

- **दादासाहेब घोडके,** जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख, सोलापूर

## बालकांच्या बदललेल्या वर्तनाकडे लक्ष द्या : आरती पेंडसे

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २ डिसेंबर-**

बालकांच्या वर्तनात अचानक झालेल्या बदलांकडे लक्ष द्या असा सल्ला मानसोपचारतज्ज्ञ आरती पेंडसे यांनी पालकांना दिला. भारतीय स्त्रीशक्ती जागरण संस्थेने आयोजित 'आपल्या मुली सुरक्षित आहेत का?' या विषयीच्या व्याख्यानात त्या बोलत होत्या.



मुलींवरील लैंगिक अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे त्यावरील जनजागृतीसाठी हा चर्चात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. चर्चेचे संचालन ॲड. राजश्री ठकार यांनी केले. सहाय्यक पोलिस उप निरीक्षक अश्विनी कट्टेही चर्चेत सहभागी झाल्या होत्या. लैंगिक आत्याचारांपासून बालकांचे (१८ वर्षांपर्यंतच्या मुली व मुले) संरक्षण करण्यासाठी १९१२ मधे निर्माण केलेल्या पॉस्को या जेन्डर न्यूट्रल कायद्याविषयी ड. राजश्री ठकार यांनी सविस्तर माहिती दिली. पॉस्को कायद्यांतर्गत गुन्ह्याची माहिती असलेले कोणीही देऊ शकते. ज्या आस्थापनात अत्याचार घडतो त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करणे बंधनकारक आहे. तक्रार दाखल न करणे हा अपराध आहे असे त्या म्हणाल्या.

पोलिस उपनिरीक्षक अश्विनी कट्टे म्हणाल्या, दुर्दैवी घटनांतील अगदी लहान मुलींना काय घडलंय हे कळत नाही आणि सांगताही येत नाही. मुली घाबरलेल्या असतात. अशा वेळी पालकांच्या इच्छेनुसार साध्या वेशात घरी जाऊन, व्हिडीओ कॉलवर किंवा पोलिस ठाण्यातील बालक स्नेही कक्षात तक्रार दाखल करून घेतली जाते, जबाब घेतला जातो. हे सर्व अतिशय संवेदनशीलतेने केले जाते. आपल्या मुलांशी संवादाची तसेच त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवण्याची आवश्यकता तिन्ही वक्त्यांनी अधोरेखित केली. पोहण्याच्या पोशाखाने झाकलेल्या अवयवांना स्पर्श करणाऱ्या व्यक्तीला प्रतिकार करणे, बाहेरच्या जगात वावरत असताना घ्यावयाच्या काळजीबद्दल त्यांना समजेल अशा भाषेत सूचना देणे. तसेच पौगंडावस्थेतील मुला मुलींतील आकर्षण व त्यातून कदाचित घडू शकणाऱ्या गुन्ह्यांसंदर्भातही मुलांची मानसिकता समजून घेणे, कौशल्याने त्यांना पुढील परिणामांबद्दल जागरूक करण्याची आवश्यकता आरती पेंडसे यांनी पालकांना व शिक्षकांना समजावून सांगितली. त्या म्हणाल्या पालक घरी शिक्षक असावा आणि शिक्षक शाळेत मुलांचा पालक असावा! 'ओळख स्पर्शाची' सारखे कार्यक्रम उपयुक्त ठरत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. 'ओळख स्पर्शाची', 'कळी उमलताना' असे कार्यक्रम शाळांतून करीत असल्याचे भारतीय स्त्रीशक्ती जागरणच्या अध्यक्ष किर्ती देशपांडे यांनी प्रास्ताविकात सांगितले. सचिव सुनिती पारुंडेकर यांनी आभार मानले तर मेधा वैशंपायन यांनी सूत्रसंचालन केले.

## पशुसंवर्धन विभागामार्फत कुक्कुट पालन प्रशिक्षण

**सोलापूर दि.२ डिसेंबर-**

जिल्ह्यातील पशुपालक, शेतकरी, व सुशिक्षित बेरोजगारांसाठी, जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे १५ दिवसाचे कुक्कुट पालन प्रशिक्षणाचे आयोजन केले असून, इच्छुकांनी दि ७ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन.एल. नरळे यांनी केले आहे.

प्रशिक्षणाचा कालावधी दि. ९ ते २३ डिसेंबर २०२४ पर्यंत असून, प्रशिक्षाणार्थ्यांसाठी शैक्षणिक पात्रता किमान ७ वी पास असणे अपेक्षित आहे. तसेच सदर प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना सुवर्ण संधी आहे. सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश फी सर्व प्रवर्गासाठी १००/- रुपये आकारण्यात येईल सोबत शाळा सोडण्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, फोटो जोडणे आवश्यक आहे. सदर प्रशिक्षणासाठी पशुधन विकास अधिकारी डॉ. एस. एम. बोधनकर, सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, बी.पी.एड. कॉलेज जवळ, सोलापूर, यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे यांनी केले आहे.

# अणदूरच्या खंडोबाची यात्रा उत्साहात

**● येळकोट येळकोटऽऽऽ**
**जय मल्हारच्या जयघोषात**
**भंडारा-खोबऱ्याची उधळण**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २ डिसेंबर-**

येळकोट येळकोटऽऽऽ जय मल्हार च्या जयघोषात भंडारा-खोबऱ्याची मुक्त हस्ते उधळण करीत विविध धार्मिक कार्यक्रम ानंतर सोमवार दिनांक २ मध्यरात्री दोनच्या सुमारास श्री खंडोबाच्या चंपाषष्ठी उत्सवासाठी मैलापूराकडे (नळदुर्ग) प्रस्थान झाले. सोमवार दिवसभर परिसरातील गावातील भाविकांनी आपले नवस फेडून देवाचे दर्शन घेतले. अशा प्रकारे अणदूरच्या खंडोबाची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.





ग्रामदैवत खंडोबाची यात्रा (सटीची जत्रा) सोमवारी झाली पहाटे ४ वाजता काकड आरती नंतर परिसरातील भाविकांनी दंडवत घालून आपापले नवस पूर्ण केले मूर्तीला अभ्यंगस्नान घालून अभिषेक विविध धार्मिक विधी पूर्ण करण्यात आल्या दिवसभर मंदिरात भाविकांनी तळीभंडार उचलणे, ओटी भरणे, भंडारा-खोबरे उधळणे, लहान मुलांचे जावळ काढणे, लंगर तोडणे, नवीन वारूंना दीक्षा देणे आदी कार्यक्रम पार पडले संध्याकाळी मानाची काठी मिरवणूक वाघे मुरळी नृत्य धनगरी ओव्या गायनाच्या कार्यक्रम झाला. श्री खंडोबा देवस्थान मंदिराचे विश्वस्त यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच श्री खंडोबा देवस्थान यात्रा कमिटीकडून मान्यवरांचे स्वागत केले. रात्री १० वाजता 'श्री' च्या अश्वरूपी सवाद्य छबिना मिरवणूक काढून मंदिराला दोन प्रदक्षिणा घालण्यात आल्या. यावेळी हलगीचा कडकडात बेभान होऊन नाचणारे वारू अंगावर चाबकाचे आसूड मारून घेतानाचे दृश्य पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रात्री १२ वाजता नळदुर्ग येथील मानकरी 'श्री' च्या मूर्तीला पावणे दोन महिने मैलारपूर (नळदुर्ग) येथे नेण्यासाठी सवाद्य मिरवणुकीने आले.

यावेळी नळदुर्ग येथील सर्व मानकरींचे स्वागत करून मानसन्मान देऊन दोन गावांमध्ये देव देणे घेण्याचा लेखी करारनामा करण्यात आला. सव्वा दहा महिने अणदूर मंदिरात व पावणेदोन महिने मैलारपूर नळदुर्ग मंदिरात श्री चे वास्तव्य असते, संपूर्ण महाराष्ट्रात चल मूर्ती ही एकमेव आहे, महाआरतीनंतर हेगडे प्रधानासह म्हाळसादेवींच्या मूर्तीचे प्रस्थानानंतर 'श्री' च्या मूर्तीला पालखीतून निरोप देण्यात आला मंगळवारी पहाटे पाच वाजता मैलारपुर येथील मंदिरात 'श्री' मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यात्रेनिमित्त मंदिर मनमोहक विद्युत रोषणाई करण्यात आली.

**ग्रामस्थांच्या वतीने भव्य कुस्त्यांचे आयोजन**

अणदूरचे ग्रामदैवत मल्हार मार्तंड श्री खंडोबाच्या यात्रेनिमित्त अणदूर मध्ये ग्रामस्थांच्या वतीने भव्य कुस्त्या होणार आहेत. मंगळवार दुपारी तीन वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत या कुस्त्या होणार आहेत. या आखाडासाठी दूरवरून नामांकित पैलवान येणार आहेत. त्यासाठी जवाहर कुस्ती आखाड्यात संपूर्ण तयारी करण्यात आली आहे, याचा लाभ कुस्ती प्रेमी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन कुस्ती व यात्रा कमिटीने केले आहे.

लोकसभेच्या आत्मचिंतनानंतर...

# 'उत्तम रणनिती' आखल्यानेच भाजपला अभूतपूर्व यश

## भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळेंचे अथक प्रयत्न; लाडक्या बहिणी, साधुसंतांचेही मोठे योगदान

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

लोकसभा निवडणुकीत अपयश आल्यानंतर त्या अपयशाची कारणे शोधली आणि विधानसभा निवडणुकीत उत्तम रणनिती आखली, प्रत्येक बुथवर सक्षम यंत्रणा लावली; याच कालावधीत मतदारसंघातील लाडक्या बहिणी, साधुसंतांनी या निवडणुकीत मोठे योगदान दिल्यानेच महायुतीच्या उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने अभूतपूर्व विजय झाला, असे मत भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी व्यक्त केले. विधानसभेतील अभूतपूर्व यश' याबाबत काळे म्हणाले की, लोकसभा निकालानंतर निराशेचे वातावरण निर्माण झाले होते. इतकी सारी विकासकामे करून आम्हाला इतके मोठे अपयश आले कसे? याबाबत आम्ही विविध ठिकाणी मेळावे घेतले आणि कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून आत्म चिंतन केले. लोकसभा निवडणूक कालावधीत संविधान बदलण्याबाबत निर्माण केलेला निरेटिव्ह, मराठा, ओबीसी, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत केलेल्या विविध गैरसमजाचा फटका आमच्या पक्षाला बसल्याची बाब समोर आली. याच कालावधीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रघुनाथराव कुलकर्णी, भुपेंद्र यादव, मकरंद देशपांडे व इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर संघटना पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या आणि विस्ताराने मार्गदर्शन केले आणि त्यांनी सांगितलेला पॅटर्न जिल्हाभर राबविण्याच्या सूचना केल्या. याचबरोबर महायुतीतील मित्र पक्ष पदाधिकाऱ्यांना सोबत घेवून कसे काम करायचे याचाही कानमंत्र या नेत्यांनी दिला.

यामुळे शहर-जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी-कार्यकर्ते अंग झटकून कामाला लागलो. जनतेचा कौल आम्हाला मिळाला आहे...आता सोलापूरच्या उमेदवारांना वरिष्ठ नेत्यांनी मंत्री मंडळात स्थान द्यावे आणि पालकमंत्री करावे, अशी अपेक्षा काळे यांनी व्यक्त केली.






### लोकप्रतिनिधी अन् संघटनेचा समन्वय आला कामी

विधानसभा निवडणुकीच्या अगोदर शहरातील लोकप्रतिनिधी आणि संघटना पदाधिकाऱ्यांत समन्वय घडवून आणला. महायुतीच्या इतर मित्र पक्ष पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यानंतरच तीन मतदारसंघातील रणनिती आखली. मतदारसंघातील प्रत्येक बुथवर किमान १०० मतदान कसे वाढेल याबाबत नियोजन केले. इतकेच नाहीतर केंद्र सरकार, राज्य सरकारच्या सर्व योजना घरोघरी जावून सांगण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले. यामुळे एक चांगल्या प्रकारची मतदानाची घडी आमची बसल्याची कबुली काळे यांनी यावेळी दिली.

### साधुसंत अन् लाडक्या बहिणींच्या आशीर्वाद

देव, देश अन् धर्मासाठी या निवडणुकीत भाजपाच्या पाठीशी राहावे, असे आवाहन शहर-जिल्हाच नाहीतर अवघ्या राज्यातील साधुसंतांनी मतदारांना केले होते. तर लाडक्या बहिणींच्या मतदानरूपी आशीर्वादानेच महायुतीला सत्ता मिळाल्याचे शहराध्यक्ष काळे यांनी आवर्जुन नमूद केले.

### विविध समाजबांधवांशी साधला संवाद

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलाबाबत केलेले गैरसमज, मराठा, लिंगायत, धनगर समाज आरक्षणाबाबत विनाकारण वाढविलेले वाद मिटविण्यासाठी विविध समाजबांधवांशी संवाद साधून मेळावे घेतले. या समाज बांधवांचे भाजपाबाबत झालेले गैरसमज दूर करण्यासाठी भाजपा, मित्रपक्ष पदाधिकारी-कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी रात्रंदिन झटले. या सर्वांनी पुन्हा महायुतीवर विश्वास टाकला आणि मताचा टक्का वाढत गेला.

### दिलेल्या शब्दांचे आम्ही पक्के; विकासकामांची होणार पूर्तता

शहर-जिल्ह्यासाठी केंद्र अन् राज्य सरकारने केलेल्या विकासकामांचा अजेंडा घेवून आम्ही जनतेला मतदानाचे दान मागितले आणि त्यांनी भरभरून दान दिले आहे. महायुती उमेदवारांच्या प्रचारात शहरातील विविध विकासकामांचे काही संकल्प सोडले आहेत. ते संकल्प म्हणजेच जनतेला दिलेल्या आश्वासनांची आम्ही या ५ वर्षात पूर्तता करीत राहणार असल्याचा खुलासाही यावेळी काळे यांनी केला अन् आम्ही शब्दाचे पक्के असल्याचे सांगितले.

### सोलापुरात होणार जल्लोष

महायुतीचा शपथविधी येत्या ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता भाजपचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहेत. सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात शपथविधीचा जल्लोष केला जाणार आहे.

---

## संक्षिप्त वृत्त



### वीज कंत्राटी कामगार कायद्याची जनजागृती करणार : भारतीय मजदूर संघ

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

भारतीय मजदूर संघ ७० व्या वर्षात पदार्पण करत असल्याच्या निमित्ताने १ डिसेंबर ते २० डिसेंबर प्रत्येक जिल्ह्यात वीज कंत्राटी कामगारांना भेटून संवाद, चर्चासत्र, मीटिंग मेळाव्याच्या माध्यमातून कांमगारांच्या बारीक सारीक समस्यां जाणून घेत कामगार कायद्याची जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी मंचावर जेष्ठ मार्गदर्शक अण्णा देसाई, सुभाष सावजी, शरद संत, सरचिटणीस सचिन मेंगाळे,पुणे जिल्हा अध्यक्ष अर्जुन चव्हाण, कोषाध्यक्ष सागर पवार, संघटनमंत्री उमेश आनेराव व उपमहामंत्री राहुल बोडके उपस्थित होते. बैठकीसाठी २६ जिल्ह्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती चे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहिले होते. बैठक यशस्वी करण्यासाठी पुणे जिल्हा पदाधिकारी निखिल टेकवडे, सुमीत कांबळे यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

### पद्मावती लॉन्स येथे पैशाच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. २ डिसेंबर**

शहरातील एमआयडीसी येथील पद्मावती लॉन्स येथे पैशाच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरून तरूणास मारहाण करण्यात आली. नितिन लक्ष्मण अलकुंटे (वय २४, रा. साईबाबा चौक, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २९ नोव्हेंबर रोजी एमआयडीसीमधील पद्मावती लॉन्स येथे पैशाच्या देण्या-घेण्याच्या कारणावरून लखन पवार याने नितीन अलकुंटे यास हाताने मारहाण केली. त्यामध्ये नितीन याच्या डोळ्यास जबर मार लागल्यानो त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

WILDFIRE COMING 05 DEC
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
गुरूवार ५ पासुन आयकॉन स्टारचा तेलगू ॲक्शन धमाका
सकाळी.८. दु १२,३॥,९ वा




थियटवर दिवसभर ॲडव्हान्स बुकींग
चालु आहे ग्रृप बुकिंगसाठी कॉल करा
702810756,9970003525
खास प्रेशकांसाठी सेल्फी पाईट ची सोय
शेवटचे २ दिवस -लकि भास्कर

## रस्ता अरुंद असल्याने वाहतुकीची समस्या सोडविण्याची मागणी

▶▶ महिलांनी दिले आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर**

सोलापूर : लेआउट प्रमाणे रस्ता केला नाही अरुंद रस्ता असल्याने ए. जी. पाटील नगर, विराट नगर, परमेश्वर नगर मधील नागरिकांना येथून वाहनावरून ये - जा करणे अडचणीचे ठरत आहे. वाहतुकीची ही समस्या तत्काळ सोडवावी. या मागणीचे निवेदन या नगरातील महिलांनी महापालिका आयुक्तांना दिले.



ए.जी.पाटील नगर, विराट नगर, परमेश्वर नगर हे झोन क्रमांक ५ मध्ये असून महानगरपालिकन मंजूर लेआऊट आहे. ए.जी. पाटील नगरच्या लेआउट प्रमाणे प्लॉट क्रमांक एक समोरुन जय महालक्ष्मी नगर ते विराट नगर ते ए.जी. पाटील नगर असा रस्ता आहे. हा रस्ता लेआउट नकाशात दर्शवल्याप्रमाणे नसून प्रत्यक्षदर्शनी रस्ता जवळ जवळ फक्त टू व्हीलर्स जाण्याएवढाच आहे. बांधकामानंतर उर्वरित रस्त्यामधून चार चाकी वाहने जाणे अश्यक्य आहे. वस्तुस्थती नेमकी काय आहे हे नागरिकांना कळत नाही. परमेश्वर नगर, विराट नगर, ए. जी. पाटील नगर, कोरे वस्ती, राऊत वस्ती नागरीकाना वाहतुकीसाठी हा एकमेव रस्ता आहे. लेआउट प्रमाणे रस्ता उपलब्ध करण्यात यावा. वाहतुकीच्या निर्माण झालेल्या समस्येचे लवकरात लवकर निराकरण करावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान, संबंधित ठिकाणाची महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकारी पाहणी करतील, असे आश्वासन महापालिका आयुक्तांनी यावेळी दिले असल्याचे सांगण्यात आले.

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी संदीप कोहिनकर!

२१ दिवसांसाठी घेतला पदभार; पहिल्याच दिवशी घेतली आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर**

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम २१ दिवसांसाठी रजेवर गेले आहेत. रजेवर जाण्यापूर्वी त्यांनी आपला पदभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी दुसऱ्यांदा २१ दिवसांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार घेतला आहे.



दरम्यान, सोमवारी कोहिनकर यांनी सीईओ पदाचा पदभार स्वीकारला, त्याचक्षणी त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन निधी खर्चाचा आढावा घेतला. यापूर्वी देखील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी हे प्रशिक्षणासाठी मसूरी येथे गेले, सोलापूर जिल्हापरिषदेत रुजू होताच त्यांच्याकडे असता २४ दिवसासाठी केवळ दीड महिन्यातच सीईओ पदाचा पदभार आला होता. त्यावेळी कोहिनकर यांना जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली. लोकाभिमुख अर्थसंकल्प सादर केले होते.

### सर्व विभागांचा आढावा घेतला

मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्व विभागाची बैठक घेऊन विभगातील सद्य स्थितीची संपूर्ण माहिती घेतली. त्यानुसार पुढील कामकाज करू.

**- संदीप कोहिनकर,**
मुख्यकार्यकारी अधिकारी सोलापूर जिल्हा परिषद

## गर्दी टाळण्यासाठी प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती बंदी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

मुंबईतील आगामी म हापरिनिर्वाण दिनानिमित्त होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर मध्य रेल्वेकडून तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. प्लॅटफॉर्मवर होणारी गर्दी नियंत्रित करणे आणि स्थानक परिसरात प्रवाशांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे रेल्वेकडून सांगण्यात आले. प्रवास सुलभ व्हावा यासाठी ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे.

२ डिसेंबर ते ९ डिसेंबर या कालावधीत प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील निर्बंध असणार आहेत. मध्य रेल्वेच्या खालील स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री बंदी असणार आहे :

* **मुंबई विभाग :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, ठाणे आणि कल्याण
* **भुसावळ विभाग :** बडनेरा, अकोला, नांदुरा, मूर्तिजापूर, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड आणि नाशिक.
* **नागपूर विभाग :** नागपूर आणि वर्धा
* **पुणे विभाग :** पुणे
* **सोलापूर विभाग :** सोलापूर

दरम्यान सुरळीत आणि सुरक्षित प्रवास अनुभवण्यासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे अशी विनंती रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

## शहरातील तीन ठिकाणच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

▶▶ लोखंडी खोके, चार चाकी गाड्यासह इतर साहित्य केले जप्त

▶▶ महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील तीन ठिकाणच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले.रस्त्यावरील व फूटपाथ वरील अतिक्रमण हटण्यात आले. मोठ्या प्रमाणात ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत खोके , हात गाड्यासह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. आज सकाळच्या सत्रात डॉ. आंबेडकर चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक



रस्त्यावरील व फूटपाथ वरील असलेले अतिक्रमण काढण्यात आले. कर्णिक नगर येथील फूटपाथ वरील खाद्यपदार्थ गाड्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत ५ लोखंडी खोके, दोन हातगाडी व इतर सामान जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात कंबर तलाव ते अशोक नगर तसेच चैतन्य मार्केट समोर रस्त्यावरील ,फूटपाथ वरील अतिक्रमण हटावण्यात आले. या कारवाईत पोरगी तीन लोखंडी खोके, एक चाकी हात गाडी , स्पीकर आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

# पठाण शहावली बाबा दर्ग्याचा उरूस उत्साहात

## इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या स्नेहभोजनास सर्वच राजकीय पक्ष, नेता व कार्यकर्त्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सलगर वस्ती येथील श्री पठाण शहावली बाबा दर्गा उरूस रविवारी उत्साहात पार पडला. इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील बाबांच्या समाधीचे पूजन करून नवीन कपड्यांची आणि फुलांची चादर चढवून इच्छा भगवंताची परिवाराचे संस्थापक आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, मार्गदर्शक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव, कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड तसेच गायकवाड परिवार आणि जाधव परिवाराच्या वतीनं हजारो हिंदू मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या भक्ती भावात अमाप उत्साही



वातावरणात संपन्न झाले.

दरम्यान इच्छा भगवंताची मित्र परिवाराचे मार्गदर्शक अनिल जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच पठाण शावली बाबा उरूस निमित्त इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं यंदाच्या वर्षी देखील इच्छा भगवंताची फार्म हाऊस येथे स्नेह भोजनाचे आयोजन केले होते.

या स्नेहभोजन कार्यक्रमास सोलापूर शहर जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षाच्या नेते मंडळांनी उपस्थिती लावून स्नेह भोजनाचे आस्वाद घेतला. आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, मोनिका कोठे, माजी आमदार दिलीप माने, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपा युवा नेते मनीष देशमुख, युवा उद्योजक यशराज नागेश करजगी,माजी नगरसेवक शिवानंद पाटील, माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड, माजी नगरसेवक संजय कोळी, गुरुशांत धुत्तरगावकर, मकबुल मोहोळकर, माजी नगरसेवक काशीद, रियाज हुंडेकरी, समीर हुंडेकरी, सामाजिक कार्यकर्ते शौकत पठाण, एआर ग्रुपचे अप्पा रोडगे, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नु, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, प्रांतिक सदस्य महेश निकंबे, सामाजिक कार्यकर्ते किरण चव्हाण, राष्ट्रवादी सोशल मीडिया सेलचे वैभव गंगणे, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, टकारी समाजाचे सरपंच गैबू जाधव, टकारी समाज युवक अध्यक्ष विनोद जाधव, अनिल बनसोडे,गुरु कावडे, किरण पवार, माजी नगरसेविका संगीता जाधव, राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर, शिवाजी गायकवाड, अंबादास गायकवाड,राजू जाधव, चंद्रकांत ब्रदर जाधव, मोहन जाधव, शहानगर शिरीष गायकवाड, शोभा गायकवाड,विशाल गायकवाड, विद्या शिंदे, कांचन पवार, सायरा शेख, अनिता गवळी, शशिकला कस्पटे, जयश्री पवार, लक्ष्मी आठवले, लक्ष्मी आठवले, संगीता गायकवाड, प्रमिला बिराजदार, प्रमिला स्वामी, रुक्मिणी जाधव, अंबु जाधव, सरोजनी गायकवाड, वरिष्ठ पत्रकार प्रमोद बोडके, विजयकुमार बाबर,दीपक शेळके, विक्रांत कालेकर, प्रशांत कटारे, यशवंत गुरव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांचे स्वागत परिवाराचे संस्थापक आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, मार्गदर्शक किसन जाधव, नागेश गायकवाड, चेतन नागेश गायकवाड यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी इच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक अनिल जाधव यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




**सोलापूर : दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मताधिक्क्याने विजयी झालेले भाजपाचे लोकप्रिय आमदार सुभाष देशमुख यांना दैनिक तरुण भारतच्या वतीने शुभेच्छा देताना कार्यकारी संचालक तथा मुख्य समूह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने. याप्रसंगी उपस्थित डॉ. चनगोंडा हवीनाळे.**



## ▶▶ क्राईम वृत्त...

### थुंकल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात थुंकल्याच्या कारणावरून तरूणास मारहाण करण्यात आली.याप्रकरणी संभाजी आप्पाजी कोडगे (वय ३१, रा. हांडे प्लॉट, संभाजी महाराज चौक, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन गणेश सुधाकर शिंदे (वय ५०, रा. अभिमान श्री नगर, मुरारजी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास संभाजी कोडगे हा मोटारसायकलवरून जात असताना जुना पूना नाका येथे गणेश शिंदे यांनी कोडगे यास अडविले. तु माझ्याकडे बघून का थुंकला या कारणावरून कोडगे यास शिंदे यांनी शिवीगाळ करत चाकूने वार केला. तो वार कोडगे याने चुकविला. यावेळी कोडगे यास मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक भद्रशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

### मुलाला धडक देणाऱ्या दुचाकीस्वाराविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

मुलाला धडक देऊन जखमी करणाऱ्या दुचाकीस्वाराविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चांदणी विकास सरवदे (वय २२, रा. जोशी गल्ली, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन वाहना क्र. एमएच १३ एडी ५८९२ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारा चांदणी सरवदे या गोळी आणण्यासाइी राजेंद्र चौकातील सिटी हॉस्पीटल येथे पायी गेल्या होत्या. तेथील मेडीकलमध्ये गोळी न मिळाल्याने चांदणी सरवदे यास त्यांचा मुलगा रूद्र याच्यासह पायी घराकडे जात होत्या. त्यावेळी राजेंद्र चौकात एमएच १३ एडी ५८९२ च्या चालकाने वाहन भरधाव चालवून सरवदे यांचा मुलगा रूद्र यास धडक दिली. यामध्ये रूद्र हा जखमी झाल्याने याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक सोनार पुढील तपास करीत आहेत.

### होटगी स्टेशन गावात ७ ते ८ जणांकडून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

होटगी स्टेशन गावात ७ ते ८ जणांकडून तरूणास मारहाण करण्यात आली. धनंजय म ल्लिकार्जुन चाबुकस्वार (वय २५, रा. होटगी स्टेशन) असे जखमीचे नाव आहे. २ डिसेंबर रोजी दुपारी धनंजय चाबुकस्वार यास अज्ञात कारणावरून होटगी स्टेशन परिसरातील ७ ते ८ जणांनी घरात येऊन लाथाबुक्क्याने व कोणत्या तरी हत्याराने डोक्यात मारून जखमी केले. धनंजय यास उपचारासाइी सचिन चाबुकस्वार यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेतीच्या वादातून एकास मारहाण

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

शेतीच्या वादातून एकास मारहाण करून जखमी करण्यात आले. शिवाजी किसन चव्हाण (वय ४३, रा. तांबेवाडी, ता. बार्शी आश्रमशाळा तांडा, जि. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शिवाजी चव्हाण यांस २ डिसेंबर रोजी ७ च्या सुमारास राहत्या घराजवळ शेतीच्या वादातून राजूदास किसन चव्हाण व सविता राजूदास चव्हाण यांनी मिळून दगडाने व काठीने मारहाण करून जखमी केले. त्यामध्ये शिवाजी चव्हाण हे जखमी झाल्याने त्यांना सुनिता चव्हाण यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### टमटमच्या धडकेत गरोदर महिला जखमी

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

घरासमोर बसलेल्या गरोदर महिलेला टमटम ने धडक देऊन जखमी केले. सिमा संतोष कोरे (वय २५, रा. वागदरी, ता. अक्कलकोट) असे जखमी महिलेचे नाव आहे. १ डिसेंबर रोजी रात्री सिमा कोरे या घरासमोर बसल्या होत्या. त्यावेळी गावाच्या दिशने येणाऱ्या तीन चाकी टमटमने सिमा कोरे यांना जोरदार धडक दिली. कोरे या आठ महिन्याच्या गरोदर असून यामध्ये जखमी झाल्याने त्यांना सिध्दार्थ वामने यांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.





# नव्या कोऱ्या 'शिवाई'ला एसटी स्टँडमधील खड्ड्यांचे विघ्न

## एसटी आगाराचे खड्ड्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष; प्रवासी त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

सोलापूर बस स्थानक आगारासह आऊट गेटवर खड्ड्यांचे साम्राज्य पडल्याने, नव्या कोऱ्या शिवाई इलेक्ट्रिक बसेसना खड्ड्यांचे विघ्न आडवे येत आहेत. बारा महिने खड्डे आणि खड्ड्यात साचलेले पाणी यामुळे एसटी बसेसचे मेंटेनन्स वाढत चाललेले आहे. याकडे मात्र एसटी महामंडळाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

प्रवाशांच्या सेवेसाठी नेहमी तत्पर असणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसेसना खड्ड्यांची घरघर लागलेली आहे. एसटी स्टँड तसेच एसटी आऊट गेट आणि आता सोलापूर आगारात पडलेले खड्ड्यांचे साम्राज्य एसटी बसेसचे आयुष्यमान कमी करण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत.

वाढते खड्डे आणि खड्ड्यांमुळे एसटी बसेसची होणारी झीज याकडे महामंडळाचे दुर्लक्ष होत आहे. नव्याकोऱ्या शिवाई बसला याखड्ड्यांतून प्रवास करावा लागत आहे. चार्जिंग स्टेशन मधून या बसेस जेव्हा बाहेर पडतात, तेव्हा त्यांना खड्ड्यातून आणि साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे.

सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील खड्ड्यांच्या समस्यांची मालिका सुरू झालेली आहे. याकडे महामंडळासह महापालिकेने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी हे ब्रीदवाक्य घेऊन एसटी धावते आहे. परंतु हीच धावणारी शिवाई एसटी खड्ड्यांच्या समस्येत अडकून गेली आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे त्यात साचलेले पाणी यामुळे एसटी चालकाला खड्ड्याचा अंदाज न येता अप्रिय घटना सांगून येणार नाही अशी अवस्था बनलेली आहे. एसटी बसम धून इतरत्र प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नेहमीच विविध प्रकारच्या अडचणीचा सामना करावा लागतो. मात्र सोलापूर बस स्थानकातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक एसटी बसमधील प्रवाशांना या मोठ मोठ्या खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे.

**पावसाविना पाण्याचे तळे, रोगाराईला आमंत्रण**

सोलापूर आगारात सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य असून, त्या खड्ड्यात एखाद्या तळ्याप्रमाणे पाणी साचलेले आहे. पावसाविना बारा महिने येथे पाणी साचत आहे. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या मेकॅनिक आणि इतर कर्मचाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. अस्वच्छता आणि दुर्गंधी सर्वत्र पसरत असल्याने रोगराईला आमंत्रण मिळत आहे. याकडे एस टी महामंडळाने लक्ष द्यावे अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे.

# घरावर बुलडोजर चालवून घर उध्दवस्त करण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

घरावर बुलडोजर चालवून घर उध्दवस्त करण्याची धमकी देणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत चाँदबादशाह अब्दुल शेख (वय ३५, रा. प्लॉट नं. २३, समता नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उदय घाडगे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाँदबादशाह शेख यांच्या घराच्या जागेसंदर्भात शेख व महादेव घाडगे यांच्यात वाद असून त्यांबाबत दिवाणी न्यायालयात केस चालू आहे. पाच ते सहा दिवसापूर्वी महादेव घाडगे यांचा पुतण्या उदय घाडगे याने शेख यांच्या घराचे फोटो काढून येथे रिनोवेशन करू नका म्हणून शेख यांना दमदाटी केली होती.

१ डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारा उदय घाडगे याने शेख यांना घरासमोर रोडवर येऊन ही जागा माझ्या काकाची आहे असे म्हणून शेख यांच्याशी वाद घातला. शेख यांच्या घरावर बुलडोझर घालून घर पाडीन अशी दमदाटी केली. म्हणून एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

# गोळ्या खाऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर -**

गोळ्या खाऊन तिऱ्हे तांड्यावरील तरूणाने आत्म हत्येचा प्रयत्न केला. आनंद धोडींराम चव्हाण (वय ३०, रा. तिऱ्हे तांडा) असे उपचारासाठी दाखल असलेल्या तरूणाचे नाव आहे. २ डिसेंबर मध्यरात्रीच्या सुम ारास आनंद चव्हाण यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून घरातील कोणत्यातरी गोळ्या खाल्या. त्यामुळे चव्हाण यास त्रास होऊ लागल्याने त्यास उपचारासाठी पत्नी श्रध्दा चव्हाण यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# बागवान व ठेंगील यांना दुबई ट्रिपचे बक्षीस

## तिवाडी यांच्या अन्नपूर्णा मिठाई नमकीनचे लकी ड्रॉ चे निकाल जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

अन्नपूर्णा मिठाई नमकीन हे मागील ४२ वर्षांपासून हायजेनिक आणि दर्जेदार मिठाई, नमकीन देण्यामध्ये अग्रेसर असून या लकी ड्रॉ द्वारे एका सामान्य कुटुंबातील व्यक्तीला दुबई टूरला पाठविण्यात येत असल्याचे मत या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चिल्ड्रन स्पेशालिस्ट डॉ. लक्ष्मीनारायण राठी यांनी व्यक्त केले.

विजापूर रोड येथील मयूर मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आम्रपाली ब्युटीशियनचे प्रमुख श्यामजी सोनी व नंदकिशोर तिवाडी यांची प्रमुख उपस्थिती होती. अन्नपूर्णा मिठाई नमकीनचे रक्षाबंधन ते दिवाळी पाडवा पर्यंत बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉ चे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख करून रुपये ५० हजार खरेदीवर दुबई ट्रिपचे दोन कुपन, २० हजार रुपयाच्या खरेदीवर दोन पाच ग्रॅमच्या सोन्याच्या नाणी आणि पाच हजार रुपयांच्या खरेदीवर दहा ग्रॅम चांदीचे शंभर नाणी अशी योजना आखलेली होती. त्याला सोलापूर शहर व परिसरातील ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



**सोलापूर : दुबई ट्रिपचे भाग्यवंत विजेते निलोफर बागवान यांना रिसीट देताना अन्नपूर्णा नमकीनचे नंदकुमार तिवारी, प्रमुख पाहुणे डॉक्टर लक्ष्मीनारायण राठी, श्याम सोनी, सचिन खानापुरे.**

दुबई ट्रिप लकी ड्रॉ मध्ये निलोफर बागवान आणि सनी ठेंगील हे भाग्यवान विजेते ठरले. तर दोन सोन्याच्या नाणी नागार्जुन कोर्माकुल आणि सौरभ माने या भाग्यवान विजेत्यांना देण्यात आल्या तसेच शंभर चांदीचे दहा ग्रॅमचे नाणी देखील यावेळी वितरित करण्यात आले. रक्षाबंधन ते दिवाळी पाडवा अशा या लकी ड्रॉ योजनेला सोलापूर शहर व परिसरातील ग्राहकांनी नेहमीप्रमाणे प्रचंड प्रतिसाद दिला असल्याने नंदकिशोर तिवाडी यांनी मनापासून आभार मानले. ही योजना यशस्वी व्हावी म्हणून तिवाडी यांच्या अन्नपूर्णा मिठाई नमकीनचे मॅनेजर शैलेश बजाज, सचिन खानापुरे, नागेश पुला, योगेश उपासे तसेच सर्व स्टाफने प्रयत्न केले.

# इफ्को टोकियो इन्शुरन्स कंपनीकडून पालिकेला मिळणार २३ लाख रुपये

### अखेर नियमित पाठपुराव्याला मिळाले यश



IFFCO TOKIO

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महापालिकेतील कर्मचाऱ्यांना यापूर्वी इफ्को टोकियो इन्शुरन्स कंपनीकडून आरोग्य विमाची सुविधा मिळत होती. दरम्यानच्या काळात ती बंद झाल्याने या कंपनीकडे डिपॉझिट रक्कम येणे बाकी होते. अखेर नियमित पाठपुराव्यामुळे या कंपनीकडून म हापालिकेला २२ लाख ७५ हजार रुपये मिळणार आहेत.

सोलापूर महापालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम (आरोग्य विमा) अंतर्गत उपचार सुविधा मिळत होती. विविध आजारावर हॉस्पिटल मधील उपचार या मेडिक्लेम योजनेअंतर्गत दिला जात होता. थेट उपचार आणि वैद्यकीय प्रतिपूर्तीही मिळत होती. इफ्को टोकियो इन्शुरन्स कंपनीला या आरोग्य सुविधेचा मक्ता देण्यात आला होता. म हापालिकेतील लिपिक श्रीकांत घोलप हे या योजनेचे काम पहात होते. काळात शासनानेही आरोग्य विमा योजना राबविल्याने सोलापूर महापालिकेने या खाजगी कंपनीची मेडिक्लेम सुविधा बंद केली. दि. २ जुलै २०२२ ते २ जुलै २०२३ दरम्यान इफ्को टोकियो इन्शुरन्स या कंपनीने महापालिकेतील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा देण्याची मुदत होती. मक्ता देतेवेळी महापालिकेची संबंधित कंपनीकडे १० लाख रुपयाची डिपॉझिट (ठेव) रक्कम होती. या विमा कंपनीकडे असलेली म हापालिकेची डिपॉझिट रक्कम परत मिळविण्यासाठी महापालिकेचे लिपिक श्रीकांत घोलप यांनी फोनवरून तसेच ईमेल द्वारे कंपनीकडे नियमित पाठपुरावा केला. अखेर या पाठपुरावाला यश आले. संबंधित कंपनीकडील १० लाख रुपयांची डिपॉझिट रक्कम तसेच इतर असे एकूण २२ लाख ७५ हजार रुपयाची रक्कम सोलापूर महापालिकेला मिळणार आहे. तसे संबंधित कंपनीने महापालिकेला कळविले आहे. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली ही रक्कम आता महापालिकेला मिळणार आहे.

# सोलापूरच्या भुवनेश्वरी जाधव, आर्या यादवला सुवर्ण

**▶▶ अकरावी कॉमनवेल्थ कराटे स्पर्धा: अक्षिता, समिहान कुलकर्णी, संकेत धन्नाईक व आदित्य पालिया कांस्यचे मानकरी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

डर्बन (दक्षिण आफ्रिका) येथे २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबरपर्यंत झालेल्या ''अकराव्या कॉमनवेल्थ कराटे चँपियनशीप'' मध्ये भारतीय कराटे संघाने २१ सुवर्ण, ८ रौप्य व २१ कास्य पदके जिंकून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.त्यात भारतीय संघात असलेल्या सोलापूरच्या रुद्र ॲकॅडमी ऑफ मार्शल आर्ट व योग संस्थेच्या भुवनेश्वरी जाधव या सिनिअर ॲथलिटसह आर्या यादव, अक्षिता कुलकर्णी, समिहान कुलकर्णी, संकेत धन्नाईक व आदित्य पालिया या ज्युनिअर व कॅडेट गटातील सहा खेळाडूंनी साधारण सोळा देशांच्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत चार पूल्समधून सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली आहे.

पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाच्या योग विभागाची विद्यार्थिनी भुवनेश्वरी जाधवने कुमिते प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक व सांघिक कास्य पदकांची कमाई केली. सलग तिस-या कॉमनवेल्थमध्ये तिने पदके पटकावली आहेत. कराटे इंडिया ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय कोच कीर्तन कोंडू यांचे मार्गदर्शन तिला लाभले आहे.

ज्युनिअर गटात संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजमधे अकरावीत शिकणा-या आर्या यादव हिने एलाईट गटात रौप्य तर क्लब गटात सुवर्णपदक पटकावले. तर अक्षिता कुलकर्णी (एम पी एस), समिहान कुलकर्णी व संकेत धन्नाईक (ए.डी.जोशी ज्युनियर कॉलेज) आणि आदित्य पालिया (के.एल.ई. स्कूल ) यांनी आपापल्या वजनगटात वैयक्तिक व सांघिक प्रकारात कांस्य पदके जिंकली. शिवस्मारक येथे भुवनेश्वरी व मिहिर संगीता सुरेश जाधव यांचेकडे गत पाच वर्षे




दिवसातून पाच सहा तास नियमित स्पोर्ट्स कराटेचा सराव करणा-या पाचही ॲथलिट पैकी आर्या, संकेत व आदित्य हे प्रथमच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले आहे.

अक्षिताने यापूर्वी मलेशिया ओपन व ज्युनिअर एशियन्स (फिलिपिन्स) मधे आणि समिहानने मलेशिया ओपन मधे सुवर्णपदके जिंकली आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार , विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानर, प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, सीईओ डॉ. श्रीकांत अंधारे, क्रीडा संचालक अतुल लकडे व सिनेट सदस्य सचिन गायकवाड तसेच शिवस्मारकचे संचालक रंगनाथ बंकापुर, गंगाधर गवसने, आय. एम. एस. चे अमोल व सायली जोशी, संगमेश्वरचे धर्मराज काडादी यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.



# टकारी समाज संघातर्फे गुरुवारपासून कुमार कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

टकारी समाज संघ सोलापूरच्या वतीने ५ ते ७ डिसेंबर दरम्यान सोलापूर जिल्हा कुमार व कुमारी निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या स्पर्धा शंकर भवन मंगल कार्यालय येथे आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेत खेळाडूंचे वय दि. १ जानेवारी २००५च्या नंतर व वजन कुमार गट ७० किलो आणि कुमारी गट ६५ किलो अशी अट आहे. ही स्पर्धा मॅटवर खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण ३५ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमधून दि. ११ ते १५ डिसेंबर रोजी पुणे येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी जिल्ह्यातील कुमार व कुमारी कबड्डी संघ सहभागी होणार आहेत. तालुक्यातून येणाऱ्या खेळाडूंसाठी राहण्याची व भोजनाची मोफत सोय करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस सुनील जाधव, रमेश जाधव, नागेश जाधव, बालाजी जाधव, अनिल जाधव, विलास गायकवाड, अनिश जाधव आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६२

**ऐशी माझी वाचा मज उपदेशी ।**
**आणीक लोकांसी हेंचि सांगे ।।**

स्वत:च स्वत:ला शिकवणे अत्यंत आवश्यक असले तरीही प्रत्येकाला हे जमेलच असे नाही. ज्याला हे जमले तो खरोखर भाग्यवान समजला पाहिजे. समाजात आपण पाहतो की अनेक लोक इतरांना मार्गदर्शन करीत असतात, पण स्वत: मात्र योग्य त्या पध्दतीने वागत नाहीत. इतरांना सांगण्यात यांना आनंद वाटतो, पण स्वत: तसे वागणे त्यांना जड जाते. म्हणूनच समाजात आधी केले। मग सांगीतले ।।, या संतोक्तीप्रमाणे वागणाऱ्यांची संख्या अत्यंत नगण्य असल्याचे आपणाला पाहायला मिळते. संसाराच्या मयाजाळात अडकलेल्या जीवाच्या बाबतीत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की हा जीव इतरांना भरपूर सांगतो पण स्वत: मात्र त्याप्रमाणे वागतोच असे नाही. संत महात्म्यांच्या बाबतीत मात्र तसे होत नाही. संत महात्मे प्रथम स्वत: वागतात आणि आपल्या वर्तनातून इतरांना उपदेश करतात. यांची वाचा लोकांना बरे वाटावे म्हणून वदत नाही तर खरे वाटावे म्हणून वदते. अर्थात जे खरे आहे, तेच सांगते. आपण कोण आहोत ?आपण काय करायला हवे ? काय करावे ? या सर्व प्रश्नावर माझी वाचा मला उपदेश करते. हाच उपदेश माझी वाचा इतरांनाही करते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**ऐसी माझी वाचा मज उपदेशी।**
**आणीक लोकांशी हेंचि सांगे ।।**

तुकाराम महाराजांची वाचा तुकोबांना आई-वडीलांच्या सेवेतच परमेश्वर असल्याचे सांगते. रंजल्या गांजल्यांना अडीअडचणीच्या वेळी मदत करावयास सांगते. प्रत्येक जीव हाच ईश्वराचा अंश असल्याचे सांगते. कर्तव्य, निस्वार्थ प्रेम हेच भगवंताचे खरे स्वरुप असल्याचे त्यांची वाचा त्यांना सांगते. त्यांच्या वाचेने त्यांना हे जे कांही सांगीतले किंवा हा जो कांही उपदेश केला, तोच उपदेश त्यांची वाचा आपणालाही करीत आहे. तुकाराम महाराजांना सद्गुरु, मार्गदर्शक मानणारे किती शिष्य त्यांच्या या वाचेचा मान सन्मान करतात, हे ज्याने-त्याने स्वत:ला विचारलेले बरे. महाराजांना शिरोधार्य मानणे सोपे आहे. पण त्यांच्या वाणीप्रमाणे वागणे अवघड आहे. संसारात अडकलेला जीव स्वार्थ, अहंकारात जखडला जात असल्याने तो आई-वडीलांना मानायला तयार नाही. जो जीव आई-वडीलांचा मान सन्मान करीत नाही तो इतरांचा मान सन्मान करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कोणतीही गोष्ट इतरांना सांगण्यासाठी ती प्रथमत: स्वत:ला योग्य वाटली पाहिजे. मुखाने वाचाळ बडबड करण्यापेक्षा वर्तनातून सांगणे जास्त योग्य असते. ज्ञानोबा-तुकोबांचा तोच शिष्य होऊ शकतो, जो त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे पूर्णत: आपल्या जीवनात आचरण करतो. आचरणातून ज्ञानोबा-तुकोबांचा ज्याला शिष्य होता आले, त्याच्या सारखा दुसरा कोणी भाग्यवान नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - |
| दि. ३ डिसेंबर २०२४ | जागतिक दिव्यांग दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया (१३.०९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मूळ (१६.४१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शूल (१५.०७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२५.१२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# चिप्पा मार्केट बनला तळीरामांचा अड्डा!

## दिवसाढवळ्या होतेय दारुड्यांच्या संख्येत वाढ ; महापालिका प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

एकीकडे शहर स्मार्ट होत असताना, दुसरीकडे अशोक चौक येथील चिप्पा मार्केटची अवस्था दयनीय बनली आहे. स्मार्टसिटीत चिप्पा मार्केटमध्ये राजरोसपणे दारुड्यांचा अड्डा बनत आहे. दारू पिल्यानंतर रिकाम्या बाटल्यांचा ढीग पडलेला दिसत आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होताना दिसत आहे. सोलापूर शहरात सार्वजनिक भाजी मार्केटसाठी अशोक चौक येथील चिप्पा यांची जागा मार्केटसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी येथे मार्केट भरवले जात असे, कालांतराने मात्र मार्केट ७० फूटरोड येथे स्थलांतरित झाले. वास्तविक पाहता मार्केटसाठी जागा असताना, अनधिकृतपणे ७० फूटरोड येथे भरवला जात आहे. सदरच्या भाजी मार्केटमुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे अपघात देखील वाढत आहेत.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने काही महिन्यांपूर्वीच येथील मार्केटची अवस्था बदलण्यासाठी अनेक नूतनीकरणाची कामे केली. फरशीकरण केले, नव्या पद्धतीचे ओटे बांधण्यात आले, पत्रा शेड करण्यात आले, व्यवसाय व्हावा यासाठी सर्व सुविधा निर्माण करण्यात आली. असे असताना देखील येथे भाजी मार्केट सुरू होत नसल्याने महापालिका प्रशासनाने केलेला लाखोचा खर्चाचा चुरडा झाल्याचे दिसून येत आहे. यावर प्रशासनाने उपाय निर्माण करत, भावनाऋषी येथे चिप्पा मार्केट वसवले, परंतु तेथे ग्राहक येत नसल्याचे कारण देत विक्रेत्यांनी जाण्यास विरोध केला. काही काळ हे मार्केट चालवले गेले. परंतु कालांतराने येथे पुन्हा तेच पहिलेपाढे पंचावन्न सुरू झालेले दिसत आहे.

महापालिका प्रशासनाने नूतनीकरण केलेल्या मार्केटमध्ये ७० फूट भाजी मार्केट स्थलांतरित केले परंतु, विक्रेत्यांनी पुन्हा एकदा रस्त्यावर भाजी विक्री करणे सुरू केले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. त्याचपद्धतीने खराब झालेले भाजीपाला येथेच टाकून देण्यात येत असल्याने, सर्वत्र कचरा अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरत आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.



**सोलापूर : अशोक चौकातील चिप्पा मार्केट येथे अस्वच्छता व दुर्गंधी झाली आहे. दारूच्या बाटल्यांचा ढीगही साचला आहे. त्याचे छायाचित्र.**

### लाखोंच्या निधीचा चुराडा

नूतनीकरण करण्यासाठी चिपा मार्केट येथे लाखोंचा निधी खर्च करण्यात आला. परंतु या पैशाचा विनियोग योग्य पद्धतीने न झाल्याचे दिसत आहे. येथे विक्रेते भाजी विक्री करण्यास तयार होत नसल्याने सदरचा निधी वायपट गेला आहे. तसेच दारुड्यांचा वावर दिवसाढवळ्या वाढत आहे. याकडे महापालिका व पोलीस प्रशासनाने लक्ष द्यावे

**-गुल्लापल्ली, स्थानिक नागरिक.**

### चिप्पा मार्केट येथे ग्राहक खरेदीसाठी येत नाहीत

७० फूट येथे रस्त्यावर भाजी खरेदी करण्यासाठी ग्राहक थांबतात. परंतु चिप्पा मार्केट हे प्रमुख रस्त्यापासून आतल्या बाजूस असल्याने ग्राहक येथे भाजी खरेदीसाठी येत नाही. त्यामुळे पुन्हा रस्त्यावर भाजी विक्री करावी लागत आहे. महापालिका प्रशासनाने यामध्ये सुवर्ण मध्य साधावा.

**-रफीक बागवान, विक्रेते**



## गरीबांच्या कल्याणासाठी आपणच मुख्यमंत्री व्हा : रुग्णसेवक आनंद गोसकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

देशाचं लक्ष वेधलेल्या महाराष्ट्र राज्याच्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर येथील देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय तसेच रुग्णसेवक आनंद गोसकी यांनी मुंबईत सागर निवासस्थानी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सोलापूरचे टॉवेल व देवेंद्र फडणवीस यांचं फ्रेम देऊन सत्कार करून अभिनंदन केले.

मुख्यमंत्रीपदाचा पाच वर्षांचा व उपमुख्यमंत्री अडीच वर्षांचा कार्यकाळ नेतृत्वात महाराष्ट्राने विविध क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात ही अनेक कामे करण्याची संधी मिळेल व आणखीन ताकदीने काम करणार आहे. केवळ देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने अनेकांची कधी आयुष्यात न होणारे कामे वा प्रश्न सहजगत्या निकाली निघाली आहेत. फडणवीस यांच्या पाठीशी अनेक गोरगरीबांचे आर्शिवाद आहेत. ते राज्याच्या मुख्यमंत्री झाल्यास महाराष्ट्राच्या नव निर्मितीचा संकल्प सिद्धीस गेल्याशिवाय राहणार नाही, असंही आनंद गोसकी यांनी त्या भेटीत म्हटले.

## लोकसभा, विधानसभा निवडणूक रद्द करण्याची राष्ट्रपतींकडे मागणी : प्याटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

नुकतीच झालेली लोकसभा आणि विधानसभा निवडणूक रद्द करावी या मागणीसाठी पाठविलेल्या निवेदनाची राष्ट्रपती कार्यालयाने दखल घेतली असून संबंधित विभागाकडे तो अर्ज वर्ग करण्यात आला आहे. याचा निर्णय न झाल्यास प्रत्येक मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयासमोर शिट्टी बजाव आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जय बसव जय विजय भीमसेनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष प्राचार्य राजू प्याटी यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये संवैधानिक पद असलेल्या पंतप्रधान, गृहमंत्री आणि इतर राज्यातील मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांनी आपल्या पदाचा मतदारांवर प्रभाव टाकला. ईव्हीएम मशीन चीपमध्ये मॅनिक्युलेट करून बहुमत प्राप्त करून घेतले असल्याचा आरोप करत या सर्व निवडणुका रद्द करून संपूर्ण देशात राष्ट्रपती राजवट लागू करावी या मागणीचे निवेदन ईमेलद्वारे राष्ट्रपती कार्यालयाला पाठविण्यात आले आहे, असे प्याटी यांनी सांगितले.



## तिरूपतीमधील पद्मावतीदेवीला सोलापूरची साडी अर्पण

### पद्मशाली बांधवांनी श्री पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवात केली विधिवत पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

तिरुपतीनजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात सालाबादप्रमाणे ब्रह्मोत्सवात सोलापूरच्या पद्मशाली बांधवांनी साडी अर्पण केली. पद्मशाली बांधवांतर्फे श्री पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात ही साडी अर्पण करण्यात आली. या संस्थेचे संस्थापक जनार्दन कारमपुरी, अध्यक्ष अंबादास बिंगी, सचिव अजय पोन्नम, खजिनदार नागेश सरगम यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम झाला. भगवान व्यंकटेश्वर अर्थात बालाजी यांच्या पत्नी श्री पद्मावतीदेवी या पद्मशाली समाजाच्या कन्या आहेत.

तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात दरवर्षी ब्रह्मोत्सव साजरा केला जातो. या उत्सवात गत १५ वर्षांपासून सोलापूरच्या पद्मशाली बांधवांना पद्मावतीदेवीला माहेरची साडी अर्पण करण्याचा बहुमान मिळत आहे. यंदा हा उत्सव ३० नोव्हेंबरला झाला. यामध्ये देशभरातील अनेक पद्मशाली समाजबांधवांसह सोलापुरातील १५ जोडपी सहभागी झाली होती.

यावेळी दत्तात्रय पोसा, बालाजी वडलाकोंडा ब्रह्मोत्सवम संस्थेच्या महिला विभागप्रमुख स्वाती चिटकेन, चंद्रशेखर सरगम, शेखर बिंगी, जयंत कोंडा, श्रीनिवास करली श्रीनिवास बिरू, श्रीनिवास गुर्रम, मनोहर गुर्रम, नरेंद्र आडम,गोवर्धन कुरी, दामोदर पासकंटी, संजय चाटला, श्रीनिवास कांचन आदी उपस्थित होते.

## चंडक प्रशालेत स्काऊट गाईडस् प्रशिक्षणार्थींचे शिबीर सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

महाराष्ट्र भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्य, मुंबई व सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक तसेच सोलापूर भारत स्काऊटस् आणि गाईडस् शहर जिल्हा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बाळे (ता. उत्तर सोलापूर) येथील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे या शिक्षण संकुलातील ज. रा. चंडक प्रशालेत दि.२७ नोव्हेंबरपासून ७ दिवसांचे शिक्षकांसाठी निवासी प्राथमिक व प्रगत प्रशिक्षण शिबिर सुरू झाले.

जिल्ह्यातील स्काऊट गाईड या विषयाचे नव्याने युनिट नोंदणी केलेल्या अप्रशिक्षित शिक्षक शिक्षिका यांचेसाठी प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन व प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आश्रम शाळा, इंग्लिश मिडियम स्कूल,जिल्हा परिषद शाळा ,खासगी प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षक -शिक्षिकांसाठी कब मास्टर, स्काऊट मास्टर,फ्लॉक लीडर व गाईड कॅप्टन यांचेसाठी प्रगत-डव्हान्स प्रशिक्षणाचे आयोजन केले असल्याचे माध्यमिक उप शिक्षणाधिकारी स्वाती हवेले यांनी सांगितले. यावेळी सोलापूर जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे व जिल्हा संघटक गाईड अनुसया सिरसाट उपस्थित होते. हे शिबिर प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या आदेशान्वये होत आहे. या शिबिरास शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सचिन ठोकळ यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थीना असणाऱ्या भौतिक सुविधेची पाहणी करून प्रशिक्षणार्थींचे कौतुक केले.

### ४०० हून अधिक स्काऊट गाईड प्रशिक्षणार्थी

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना शासनाने शालेय गणवेशासोबत स्काऊट गाईडचा गणवेश ही मोफत दिलेला असून त्यांची युनिट नोंदणी जिल्हा संस्थेकडे झालेली आहे. स्काऊट गाईडच्या तासिकेला कोणते उपक्रम व अभ्यासक्रम घ्यावा याविषयी सखोल मार्गदर्शन या प्रशिक्षण शिबिरातून सर्व प्रशिक्षणार्थींना मिळत आहे. या प्रशिक्षणासाठी ४०० हून अधिक स्काऊट गाईड प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

## स्वाधार योजनेत अर्ज भरण्यासाठी१६ डिसेंबरपर्यंत मुदत

**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यासाठी http://hmas.mahait.org या पोर्टल वरती दि.१६ डिसेंबर पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली असून, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षात सोलापूर शहरातील व सोलापूर महानगरपालिका हद्दीपासून ५ किमी परिसरात असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील पात्र नवीन व नुतनीकरण झालेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी http://hmas.mahait.org या पोर्टलवर दि. १६ डिसेंबरपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा, असे आवाहनही केले आहे

# नाट्य स्पर्धेतून घडतात अनेक कलावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाद्वारे घेण्यात येणाऱ्या हौशी राज्य नाट्य स्पर्धा राज्यात सध्या सर्वत्र चालू आहेत एकूण पंचवीस ठिकाणी या स्पर्धा संस्कृती कार्य संचालनायाद्वारे आयोजित केल्या जातात. या स्पर्धेतून अनेक कलावंत घडलेले आहेत. नवनवीन कलावंतांची प्रयोगशाळा म्हणून या स्पर्धेकडे पाहिले जाते. अनेक वेगवेगळे प्रयोग करून पाहिले जातात असे प्रयोग नाट्यप्रयोगाला कधी उठावदार ठरतात तर कधी फसतात आणि हीच नक्की गंमत प्रेक्षकांना आणि कलाकारांना आहे म्हणूनच या अशा स्पर्धांना प्रयोगशाळा म्हणून पाहिले जाते. अशा स्पर्धेतून फक्त रंगमंचावरील कलाकारच तयार होत नाहीत तर तंत्रज्ञान आणि लेखक हे सुद्धा नवी उर्मी घेऊन काम करत असतात. यावर्षी सोलापूर केंद्रावर सोलापूर शहरात सोबत कुर्डवाडी लउळ आणि जेऊरवाडी या ठिकाणाहून स्पर्धक आलेले आहेत. आत्तापर्यंत एकूण सहा नाट्यप्रयोग स्पर्धेतील झालेले असले तरी आठ नाट्यप्रयोग होणे बाकी आहे. ३ डिसेंबर रोजी दुभंगून जाता जाता, ४ रोजी शरदातले चांदणे, ५ रोजी ती रात्र, ७ रोजी बेकरार, ८ रोजी विक्रमाचा घातांक क्ष, ९ रोजी छदम्, १० रोजी मोनालिसा या सर्व नाटकांना प्रेक्षकांनी उपस्थित राहून आपल्या कलाकारांना शुभेच्छा देणे गरजेचे आहे.



६३ वी राज्य नाट्य स्पर्धा सोलापुरात सुरू असून या स्पर्धेमुळे हौशी कलावंतांना एक हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे तर रसिक प्रेक्षकांनाही जवळजवळ १४ नाटके पाहण्याची मेजवानी मिळत आहे. वेगवेगळ्या चौदा संघाने विविध विषयावरची आशय असलेली नाटके सादर करीत आहेत. नाट्यतंत्र, प्रकाश योजना, नेपथ्य, याबाबत अनेक प्रयोगही या निमित्ताने केले जात आहेत. अनेक नवीन युवा कलावंत तसेच बालकलावंत ही यात सहभागी झाले असून या सर्वच नाटकांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. स्पर्धा समन्वयक अमोल धाबळे गेली दोन वर्षे स्पर्धेचे आयोजन विषयक जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडत आहेत. त्यामुळे सोलापूर केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धा खूप सकारात्मक वातावरणात पार पडत आहे. सोलापूर केंद्रातून एकूण दोन नाटके अंतिम फेरीसाठी निवडली जाणार असून एक मोठी संधी हौशी कलावंतांना त्यानिमित्त मिळणार आहे. एकूण ३०० कलावंत या स्पर्धेची जोडले गेलेले आहेत.

**- डॉ. मिरा शेंडगे, नाट्य समीक्षक**



राज्य नाट्य स्पर्धा म्हणजे हौशी कलाकारांसाठी आणि प्रेक्षकांसाठी एक पर्वणीच असते. दरवर्षी भरणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेत प्रत्येक वेळेस नावीन्य दिसतं. तंत्रज्ञानाचा योग्य वापर काही ठिकाणी प्रकाशयोजना किंवा नेपथ्याचा अतिरेक हे जरी असलं तरी सर्वच कलाकार आपापल्या परीने अत्यंत मेहनतीने प्रयोग सादर करतात या वर्षीच्या नाट्य स्पर्धेमध्ये अनेक नवीन नवीन तांत्रिक प्रयोग पाहायला मिळाले पण काही नाटकांच्या बाबतीत तंत्रज्ञान चा अती वापर करता करता अभिनयाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत होते. त्याच्याकडे सुद्धा दिग्दर्शकाने विशेष लक्ष द्यायची गरज आहे असं मला वाटतं. स्पर्धेचा लागणारा निकाल हा देखील खेळीमेळीने सर्वांनी स्वीकारावा अशीच नटेश्वराचरणी प्रार्थना.

**-सुहास मार्डीकर, नाट्य समीक्षक**



सध्या सोलापुरात राज्य नाट्य स्पर्धा चालू आहेत. रोज नाटके रंगतदार होत आहेत प्रेक्षकांचा प्रतिसाद सुद्धा चांगला आहे. नाट्य स्पर्धा म्हणजे आनंदाची पर्वणीच आसते. या स्पर्धेतील सर्वच नाटके उत्कृष्ठ होताना दिसत आहेत. सर्व संस्थांच्या कलाकारांना शुभेच्छा.

**- गितेश चुळभुरे, नाट्य रसिक**



राज्य नाट्य स्पर्धेमध्ये सोलापूर केंद्राचे वेगळे वैशिष्ट्य कायम प्रस्थापित झालेले आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव आणि त्याचा सर्वसामान्यांच्या जीवनावर झालेला प्रभाव त्याचे सुरेख चित्रण कायम सोलापूर केंद्रावरती विविध संहितांच्या सादरीकरणांमधून दिसते. राज्य नाट्य अंतिम फेरीत देखील सोलापूरचा दबदबा दिसून आलेला आहे. सोलापूर मध्ये लेखक, दिग्दर्शक, उत्तम अभिनेते,अभिनेत्री, तंत्रज्ञ यांचे कार्य देखील राज्यस्तरावरती वाखाणले गेले आहे. बहुभाषिक सोलापूर कायम प्रयोगशील राहिले आहे. भविष्यात देखील रंगभूमी समृद्ध करण्याची ही परंपरा अशीच कायम राहू ही श्री.नटेश्वर चरणी प्रार्थना.

**- प्रा. डॉ. गणेश मुडेगावकर**
**नाट्य लेखक, समीक्षक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ढगाळ वातावरणाचा द्राक्षबागांना फटका

## बदलत्या वातावरणाच्या लहरीपणामुळे वैराग परिसरातील द्राक्ष बागायतदार चिंतेत

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २ डिसेंबर-**

आधीच अतिवृष्टीने पिकांचे नुकसान होऊन शेतकरी राजा डबघाईला आलेला असताना बार्शी तालुक्यात दोन तीन दिवसा पासून ढगाळ वातावरणाचा फटका द्राक्षबागेला बसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. वैराग परिसरामध्ये हिंगणी, पिंपरी, साकत , तडवळे, लाडोळे हळदुगे, काळेगाव, दहिटणे ढोराळे, सुर्डी, इर्ले या गावामध्ये द्राक्षबागेचे प्रमाण जास्त आहे. सध्या द्राक्षेबांगांची छाटणी झालेली असून बागांना माल ही चांगला लागलेला आहे कांही बागां फ्लॉरींग स्टेजमध्ये आहेत तर कांही बागांचे घड सेटिंग झाले आहे. उशिरा शेतकरी निसर्गाच्या दृष्टचक्रात सापडला आहे. ढगाळ वातावरण व पावसामुळे लहान द्राक्ष घडांचे नुकसान होत असून डावणी, घडकूज, करपा, बुरशीजन्य रोगाचा प्रार्दुभाव होत आहे.


झाटणी झालेल्या बागांचा माल बाहेर पडत असून पाऊस व ढगाळ वातावरणामूळे

> माझी दीड एकर द्राक्षांची बाग असून मालही चांगला लागलेला असून ढगाळ वातावरणामुळे तसेच पाऊस पडण्याची शक्यता असल्याने फवारणीचा खर्च वाढत असून माल बाजारपेठेत जाईपर्यंत आमचा जीवात जीव नाही. -
>
> **- सोमनाथ गायकवाड, द्राक्षबागायतदार, तडवळे.**

अशा वातावरणामूळे द्राक्ष उत्पादनामध्ये घट होणार आहे. द्राक्ष बागायतदारांना दररोज सकाळी व संध्याकाळी वातावरण बदलानुसार जास्तीच्या फवारण्या कराव्या लागत आहे. आधीच मजूरांची टंचाई, वाढलेली मजूरी, वाढलेल्या औषधांच्या व खतांच्या किंमती यामूळे शेतकरी मेटाकूटीला आलेला असून पाऊस व ढगाळ वातावरणामूळे शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडून पडले आहे. एक एकर द्राक्षबागेसाठी छाटणीपासून , खते , औषध फवारणी , मजूरी यासह माल बाजारपेठेत जाण्यापर्यंत अंदाजे दोन लाख रूपये खर्च येतो पण सध्याचे पावसाचे व ढगाळ वातावरणामुळे जास्तीच्या फवारणीसाठी द्राक्षबागायतरांच्या खिशाला ५० हजारांची कात्री लागणार आहे . ऐवढा खर्च करून देखील द्राक्षे बाजारपेठेत जाण्यापर्यंत शेतकऱ्यांचा जीवात जीव नसतो. कोरोना काळामध्ये कंपन्या बंद झाल्याने अनेक बेरोजगार तरुण गावकडे येऊन शेती करू लागले अनेक तरुणांनी बँकेची कर्जे काढून द्राक्षे बागा लावल्या आहेत पण अशा वातावरणामूळे बागांचा खर्च वाढू लागला त्यामूळे आर्थिक फटका बसत असून बजेट कोलमडले आहे.

सतत बदलणाऱ्या वातावरणामूळे शेतकऱ्यांपुढे कोणती पिके कधी घ्यावीत हा यक्षप्रश्न उभा आहे. या निसर्गाच्या लहरीपणामूळे शेतकरी राजा दृष्टचक्रात भरडला जात आहे.

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी समर्थांच्या नाम चिंतनाने उत्तम आरोग्याचे फलित प्राप्त : आ. श्रीकांत भारतीय

**अक्कलकोट दि.२ डिसेंबर**

मी व माझे संपूर्ण कुटुंब हे श्री स्वामी समर्थांचे निस्सीम भक्त आहोत. स्वामी समर्थांच्या भक्ती चिंतनामुळे माझ्या व माझ्या कुटुंबियांना उत्तम आरोग्य व मनःशांतीचे फलित प्राप्त झाले आहे. समर्थांची कृपादृष्टी माझ्यासह नेहमीच कुटुंबियांच्या पाठीशी राहावी याकरिता आज आपण संपूर्ण कुटुंब येथे येऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले असल्याचे मनोगत महाराष्ट्र शासनाचे माजी विशेष कार्यकारी अधिकारी व भारतीय जनता पार्टीच्या विधान परिषदेवरील आमदार श्रीकांत भारतीय यांनी या प्रसंगी व्यक्त केले. आमदार श्रीकांत भारतीय यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी श्रीकांत भारतीय यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी बोलताना भारतीय यांनी यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगरसेवक महेश हिंडोळे भारतीय जनता पार्टी पंचायत राजचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र वाघमोडे, युवा नेते उदय पाटील, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, बालाजी पाटील, चंद्रकांत दसले, प्रसाद सोनार, महादेव तेली, संजय पवार, विपुल जाधव, गिरीश पवार, इत्यादी उपस्थित होते.

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या विजयामध्ये रिपाईंची मोलाची साथ

**अक्कलकोट, दि.१ डिसेंबर -**



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची अनमोल साथ मिळाल्याने अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी हे पन्नास हजार इतक्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळाला असल्याचे मत तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केले आहे. गेल्या आणि चालू पंचवार्षिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मित्रपक्ष म्हणून खांद्याला खांदा लावून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाने खंबीर साथ दिली आहे. दुधनी विभागात भागात रिपाईंचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, संतोष जन्ना, मैंदिमय्या जिडगी, तडवळ विभागात सिद्धार्थ गायकवाड, उमेश शिवशरण राजू बोरगावकर, राजू गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, दिलीप माळी, उत्तम वाघमारे, बापू वाघमारे, करण शिंदे, जेऊर विभागात युवक अध्यक्ष आप्पा भालेराव,अंबादास गायकवाड, श्रावण भालेराव, सचिन बनसोडे, मैंदर्गी शहरात युवक जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,शाणप्पा मनिकडे,सुनिल मनिकडे,किरण दुबेकर, भिमशा आरेनवरु, हणमंत शिंगे, शिवचलप्पा किरगल, शिवनिंगप्पा आरेनवरु, बसवराज पोतेनवरु, सलगर विभागात राजू भगळे,बसवराज निम्मे, जयभिम भगळे, मलकण्णा सोनकांबळे, मल्लू नडगेरी, दादा चव्हाण, अक्कलकोट शहरात शहराध्यक्ष अजय मुकणार, युवा नेते राहुल रुही, सरचिटणीस शुभम मडिखांबे, उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे, रोमीत मडिखांबे,वरपक्ष माने, नितेश मडिखांबे, प्रणेश बनसोडे, सुरेश गायकवाड, अंबादास शिंगे, ताजुद्दीन शेख, दत्ता मामा मडिखांबे, भारत सोनकांबळे, विजयकुमार बाळशंकर, सिध्दाराम मडिखांबे, विजय मडिखांबे, नागेश मडिखांबे,प्रकाश मडिखांबे, लखन वेसकर, बंटी मडिखांबे, अजय मडिखांबे, आकाश मडिखांबे नागणसुर विभागात तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, चंद्रकांत गायकवाड,यमनप्पा शिंदे, बाबू निरगुडी, राजू कांबळे, शरणू गायछोडे, बसवराज गजधाने, सलगर विभागात जयकुमार सोनकांबळे, विकास टोणगे, परमेश्वर ऐवळे, सायबण्णा गायकवाड, शिवानंद दोडमनी, रमेश बनसोडे, सिध्दू पैलवान, रमेश दोडमनी, बाबू कांबळे, उत्तम गायकवाड, भिमा गायकवाड, वालचंद सोनकांबळे, शिवानंद सोनकांबळे, दयानंद सोनकांबळे, विलास गायकवाड, विजय साखरे, संदीप सोनकांबळे, संदीप इंगळे, विशाल इंगळे, भिम इंगळे,शांतकुमार इंगळे, उत्तम इंगळे, किशोर गायगवळी, चप्पळगाव विभागात राजकुमार गवळी, संतोष बाळशंकर, मनोज सोनकांबळे, शेखर सोनकांबळे,मंजू बनसोडे, आशिष उकरंडे, राजकुमार बनसोडे यांनी आपापल्या भागात हिरीरीने सहभागी होऊन महायुतीचे उमेदवार यांना विजयी करण्याचे आवाहन केले. तसेच रिपाईंचे अभ्यासू पश्चिम महाराष्ट्र युवा नेते राहुल रूही आणि तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तालुक्यामध्ये प्रचारात आघाडी घेऊन महायुतीला निवडून आणण्यात मोलाची भूमिका बजावली.

### शालेय राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी जिशान मेलीनमनीची महाराष्ट्र संघात निवड

**अक्कलकोट, दि. २ डिसेंबर-**



जिल्हा अधिकारी क्रीडा कार्यालय नांदेड यांच्यामार्फत आयोजित राज्यस्तरीय हॉकी निवड चाचणी घेण्यात आली. या निवड चाचणीतून अक्कलकोट येतील इंडियन मॉडेल स्कूलच्या जिशान मेलिनमनी याची १७ वर्षाखालील मुलांच्या वयोगटातून रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.
या खेळाडूला राज्य क्रीडा मार्गदर्शक जर कुरेशी, क्रीडाशिक्षक दयानंद दणूरे व सहशिक्षक संतोष सोनकंटले हॉकी प्रशिक्षक अवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सिध्दाराम म्हेत्रे उपाध्यक्ष अमोल जोशी, संस्थेचे सचिवा शितल म्हेत्रे सायली जोशी, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे, मुख्याध्यापिका गौरी दातार यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## बोलीभाषा एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

भाषेच्या विविध बोलींची ही स्पर्धा या वर्षी आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. बोलीभाषा एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

२०१६ साली सुरू झालेली 'बोलीभाषा एकांकिका स्पर्धा' ही आगळी वेगळी एकांकिका स्पर्धा ठरली, जिची संकल्पना वस्त्रहरणकार लेखक गंगाराम गवाणकर यांची आहे व तिला मूर्तरूप प्रसिद्ध नाट्यनिर्माते गोविंद चव्हाण यांनी दिले आहे. पहिल्या वर्षापासूनच या स्पर्धेला स्पर्धकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. या सात वर्षांत स्पर्धकांनी प्रेक्षकांना सुद्धा वेगवेगळ्या बोली अनुभवायला दिल्या. यंदाही ही स्पर्धा होणार असून यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अद्वितीय असल्यामुळे खूप प्रसिद्ध झाली. आज ज्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्याच भाषेच्या विविध बोलींची ही स्पर्धा या वर्षी आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ९९३०४६६९२४ या मोबाईल क्रमांकावर वर संपर्क साधावा, www.supriyaproduction.com या संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन करण्यात आले आहे




## ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील रहावे : हत्तुरे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ डिसेंबर-**

मुलींनी स्वतःची काळजी घेत जीवनात आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक आप्पासाहेब हत्तुरे यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित श्री हनुमान विद्यामंदिर या शैक्षणिक संकुलात सखी सावित्री समिती विशेष सहविचार सभा आयोजित केले होती यावेळी मुख्याध्यापक हत्तुरे बोलत होते.

प्रारंभी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर या संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे व संस्थांमाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन शालेय समितीचे अध्यक्ष नागेश मदभावी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर समुपदेशक तथा माजी मुख्याध्यापक काशिनाथ कोणदे, डॉ. रणजित देशमुख, ग्रामपंचायत सदस्या पूजा देशमुख, पोलीस पाटील विश्वनाथ देशमुख उपस्थित होते.

यावेळी विद्यालयाच्या जेष्ठ शिक्षिका तथा सखी सावित्री मंचच्या सर्वेसर्वा. सुप्रिया जामगे यांनी समितीचे कार्य व कर्तव्य यावर विस्तृत अभ्यासपूर्ण माहिती विषद केली.यावेळी जेष्ठ शिक्षक श्रेयष पाटील, पालक प्रतिनिधी अंबिका बनसोडे, आरोग्य सेविका राजश्री कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती निर्मला राऊत यांनी केले तर आभार पंडीत कुंभार यांनी मानले.

## जैन गुरुकुलमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

वालचंद शिक्षण समूहाला प्रगतीचे मार्ग दाखविणारे भूतपूर्व सचिव स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जयंतीनिमित्त श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री दिगंबर जैन गुरुकुल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षी रक्तदान शिबीर आयोजित केले जाते. यंदा हे १८ वे वर्ष आहे. बुधवार दि. ४ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ९.३० ते २.०० यावेळेत बाळीवेस येथील श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात या शिबिराचे आयोजन केले आहे. डॉ. हेडगेवार रक्तपेढी या संस्थेकडून रक्तसंकलन केले जाणार आहे.

या रक्तदान शिबिरात प्रतिवर्षाप्रमाणे समाजातील सर्व रक्तदाते, माजी विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करावे, असे आवाहन प्रतिष्ठान व जैन गुरुकुल परिवार यांच्या वतीने मुख्याध्यापक राजकुमार काळे यांनी केले आहे.



## वटवृक्ष मंदिरात मुंबईच्या स्वामी समर्थ भजनी मंडळाचे भजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ डिसेंबर-**

सद्गुरु श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत जप, नामस्मरण, किर्तन भजन, गायन या सेवा म्हणजे अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामी सेवकांसाठी भक्ती प्रेमाचे हक्काचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात भजनी मंडळाकडून भजन सेवेच्या मागणीनुसार भजन सेवेचे आयोजन करण्यात येत असते. या भजन सेवेत स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवातील भजनी मंडळांसह वर्षभरात ही राज्यातील विविध भजनी मंडळाकडून भजन सेवा स्वामी चरणी समर्पित होत असतात. या अनुषंगाने श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील ज्योतिबा मंडपात मुंबईच्या श्री स्वामी समर्थ जय शंकर भक्त परिवारची भजन सेवा संपन्न झाली.

श्री स्वामी समर्थांच्या चरणी समर्पित झाली. आजच्या भजनी मंडळाच्या भजन सेवेसह सालाभरात मंदिरात भजनी मंडळाच्या वतीने स्वामी समर्थांच्या चरणी समर्पित होणाऱ्या भजन सेवांच्या माध्यमातून आध्यात्माच्या उन्नतीकरीता भजन सेवेसारखे उपक्रम मोलाचे असल्याचे मनोगत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुंबईच्या श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाचे कलाकार मंदार सावंत, अनिल कोळवणकर, दिनेश साळवी, पांडुरंग आमले, शिवाजी निकम, शिल्पा साळवी, प्राची चिले, सुनिता सरवडे यांचा महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी महेश इंगळे बोलत होते. श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाच्या वतीने आज संपन्न झालेल्या या भजन सेवेत भजनी मंडळाच्या कलाकारांनी स्वामींचा गजर, यावे गजा वदन यावे, तारी तारी स्वामी राया, अक्कलकोटचे स्वामी वंदितो तुमचा मी, शंकर बाबा हात जोडतो, तुमही देव आदींसह विविध भाव भक्ती गीते गाऊन उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत स्वामी सेवेचे ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमास भक्त श्रोत्यांनीही मोठी गर्दी केली होती.



## जि.प. नागणसूर कन्नड मुलींच्या शाळेस दुहेरी मुकुट

### नागणसूर केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा; कबड्डी व लंगडीमध्ये कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २ डिसेबर-**

जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट यांच्या मार्फत आयोजित नागणसुर केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत नागणसुर कन्नड मुली शाळेने मोठा गट कबड्डी व लंगडी स्पर्धेत विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर त्यांची बीटस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

एच.जी. प्रचंडे प्रशालेच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन केंद्र प्रमुख शिवाजी शिंदे यांचे हस्ते झाले. या वेळी केंद्रातील सर्व शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक बंधू भगिनी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे, केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव, बसवराज स्वामी, बसवराज खिलारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गंगाधर भोसगी, उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी, शिक्षणतज्ञ गुरुबाई प्रचंडे, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी ओंकार गंगोंडा, हणमंत प्रचंडे आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**अन्य कामगिरी** : मोठा गट खोखो, लहान गट लंगडी, लहान गट खो खो, लहान गट कबड्डी (उपविजयी)

वैयक्तिक खेळ : बुद्धिबळ : दिपाली विठ्ठल बिरादार (प्रथम), प्रतीक्षा शरणप्पा मणुरे (द्वितीय), ऐश्वर्या मल्लप्पा गांगोंडा (द्वितीय), १०० मीटर धावणे ज्योती हंद्राळ (द्वितीय). १०० मीटर धावणे : सविता शिवप्पा खिलारी (तृतीय), २०० मीटर धावणे : सविता शिवप्पा खिलारी (द्वितीय). वरील सर्व यशस्वी विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक शरणप्पा फुलारी,राजशेखर खानापुरे,राजकुमार नरूणे,लक्ष्मीकांत तळवार,मुख्याध्यापक श्रीशैल दोडमनी,शांता तोळणूरे,राजशेखर कुर्ले यांचे मार्गदर्शन लाभले.

## मंद्रुप पोलीस ठाण्याच्या सौंदर्यात भर

### प्रत्येक शनिवारी स्वच्छता; सपोनि मनोज पवार यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २ डिसेंबर-**

मंद्रुप पोलीस ठाण्यातील वृक्षांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी प्रत्येक शनिवारी कर्मचाऱ्यांकडून श्रमदान करून पर्यावरण रक्षणाचे कौतुकास्पद उपक्रम करीत आहेत. श्रमदान केल्याने तंदुरुस्त पोलीस बनण्यास मदत होणार आहे.

मंद्रुप पोलीस ठाण्यातील तत्कालीन पर्यावरणप्रेमी पोलीस अधिकारी अजित त्रिपुटे, संदीप धांडे, डॉ. नितीन थेटे यांनी पोलीस ठाणे आवारात विविध देशी वृक्ष लागवड केली. अनेक ठिकाणी अधिकारी बदलून गेल्यानंतर त्या झाडांची निगा राखण्याच्या कामाकडे दुर्लक्ष होते. मात्र मंद्रुपचे सध्याचे सहायक पोलीस निरीक्षक पर्यावरणप्रेमी असल्याने व कष्टाला प्राधान्य देणारे असल्याने तत्कालीन प्रभारी अधिकाऱ्यांनी लावलेल्या झाडांचे निगा राखून त्यांचे जतन करण्याचे कौतुकास्पद उपक्रम करीत आहेत. प्रत्येक शनिवारी संध्याकाळी पोलीस कर्मचाऱ्यांसह श्रमदान करीत आहेत.



> **श्रमदान केल्याचे समाधान**
>
> मंद्रुपच्या तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी परिसरात देशी वृक्षांची लागवड आदर्श निर्माण केला आहे. या झाडांमुळे पोलीस ठाणे आकर्षक बनला आहे. त्या अधिकाऱ्यांच्या कौतुकास्पद उपक्रमाला प्रतिसाद देण्यासाठी स्वच्छता करून श्रमदान केल्याचे समाधान वाटते. **- दिनेश पवार,** पोलीस, मंद्रुप पोलीस ठाणे

शनिवारी पोलीस ठाणे आवारातील झाडांना पाणी सोडण्यासाठी चर करणे, झाडांचे अस्ताव्यस्त फांदी काढणे, काटेरी झाडे काढून टाकणे, कचरा जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे, नवीन झाडांसाठी खड्डा करणे, झाडांचा पालापाचोळा एकत्र करून कंपोष्ट खत तयार करणे अशा प्रकारे पोलीस ठाण्यात श्रमदान सुरू आहे.

पोलिसांना शारीरिक कष्ट नसल्याने पोटाचा डेरा वाढणे, पाय सुजणे व विविध आजारांचा सामना करावा लागतो. मंद्रुपमधील अनेक पोलीस ग्रामीण भागातील असून ते शेतीकाम करीत असतात. तरी पण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञेचे पालन करून पोलीस ठाण्याच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी श्रमदान करून सहकार्य करीत आहेत. शिवाय श्रमदानामुळे अशा प्रकारच्या शारीरिक व्याधी कमी होण्यास मदत होऊन तंदुरुस्त कर्मचारी तयार होणार आहे. म्हणून प्रभारी अधिकारी मनोज पवार व पोलीस उपनिरीक्षक राजू डांगे यांच्या कल्पनेचे जनतेतून कौतुक होत आहे.

यावेळी प्रमोद असादे, अंकुश मोरे, किरण तोडेकर, महांतेश मुळजे, दिनेश पवार, कृष्णा पवार, शहानूर मुलाणी, बिरप्पा पुजारी, अयुब मुलाणी सागर चव्हाण, संदीप काळे, सफाई कामगार-मशाप्पा कोळी, सोमनाथ शेजाळ, शरणप्पा कांबळे आदींनी स्वच्छता कामात सहभाग घेतला.

> **पर्यावरण रक्षणासाठी हातभार**
>
> वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार मंद्रुप पोलीस ठाणेत प्रत्येक शनिवारी उपस्थित कर्मचाऱ्यांसह स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. सर्व पोलीस कर्मचारी स्वयंप्रेरणेने स्वच्छता करून पोलीस ठाण्याच्या सौंदर्यात भर घालत आहेत.
>
> **- मनोज पवार,** सहायक पोलीस निरीक्षक, मंद्रुप पोलीस ठाणे

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हर घर संविधानाचा संदेश घरोघरी पोहचवा : जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ डिसेंबर-**

येथील सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या प्रांगणात ७५ व्या संविधानाचे निमित्ताने आयोजित कार्यक्रमात माध्यमिक विभाग, सोलापूरचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सर्व उपस्थितांनी केले. यावेळी इ. १० वीच्या विद्यार्थिनी वृंदा सुपेकर, सिमरन जानराव व इ. ८ वी चा प्रशुल डमरे यांनी आपले विचार मांडले. शिक्षणाधिकारी जगताप यांनी समता, बंधुता व धर्मनिरपेक्षता सर्वांनी अंगी बानावी तसेच घटनेतील नियमांचे वाचन करावे व ते कृतीत आणावे, असे आवाहन केले. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधानाच्या पाच प्रती त्यांनी भेट दिल्या. मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांनी प्रास्ताविक केले. उपमुख्याध्यापक अनिरुध्द चाटी यांनी आभार मानले. पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर व इतर गुरुजनांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. याप्रसंगी इ. ५ वी ते १० वी चे सुमारे १२७० विद्यार्थी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडच्या वतीने आ. अभिजित पाटील यांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. २ डिसेंबर-**

प्रतिनिधी महाराष्ट्रा मध्ये लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर विधानसभेची निवडणूक लागली होती, त्यामध्ये संभाजी ब्रिगेडने महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता त्याच अनुषंगाने अपक्ष उमेदवार रणजितसिंह शिंदे व महाविकास आघाडीच्या वतीने शरद पवार गटाचे उमेदवार अभिजित पाटील तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून मीनल साठे उभे होत्या त्यामध्ये अभिजित पाटील यांनी चांगल्या मताने विजय मिळवल्याने माढा तालुक्यातील मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांच्यावतीने नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी तात्या पाटील, किरणराज घाडगे, दिनेश जगदाळे, सचिन जगताप, किरण चव्हाण, संजय पाटील, बालाजी जगताप, निलेश देशमुख, दिगंबर मिसाळ, अविनाश पाटील, दत्तात्रय ताड, बाळासाहेब बागल, प्रकाश गाजरे, शेखर आटकळे, सतीश चांदगुडे, भारत माने, प्रशांत जगताप, आ. अजय गायकवाड, किरण जाधव, योगेश मुळे, उमेश जगताप, सागर गोडसे, महेश देशमुख, सागर पवार, नीळकंठ गरडे, प्रविण जगताप, सुनील ढवळे, प्रकाश खुपसे, गुणवंत वाघ, माउली आटकळे, पांडुरंग जगताप, बंडू ढवळे, महादेव जगताप, बाळासाहेब भोसले, विजय आसबे, बंडू कुटे, स्वप्निल जगताप, महेश ब्रेदर, प्रताप गवळी, दत्तात्रय चव्हाण, सिद्धेश्वर यादव, गोरख ताड, ज्योतीराम बागवाले, दादासाहेब पवार, शिवाजीराव लोकरे, आर. डी. यादव, शिवाजीराव लोकरे उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडच्या वतीने सत्कार केल्याबद्दल त्यांचे आभार अभिजित पाटील यांच्या वतीने नितीन सरडे यांनी मानले.



### ओन्ली समाजसेवा संस्थेतर्फे कर्णबधिर विद्यार्थ्यास श्रवण यंत्र

**बार्शी, दि. २ डिसेंबर-**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांना सुनील फल्ले व उमाकांत बुगडे यांनी सुलाखे हायस्कूल येथे इयत्ता दहावीमध्ये शिकत असलेला विद्यार्थी अतिश पवार हा परिस्थितीने गरजू आहे, तो विहिरीत पोहण्यास गेल्यामुळे त्याचे दोन्ही कानाने ऐकायला येत नाही, श्रवण यंत्राची गरज आहे, अशी मागणी केल्यामुळे राहुल वाणी यांनी चंद्रकांत मुळे, गवारे, उमाकांत बुगडे यांच्याशी संपर्क करुन अतिश पवार याच्या कानाची तपासणी करुन त्या गुणवत्तेची श्रवण यंत्र उपलब्ध करण्यात आली. सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल बार्शी येथे प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर, वर्ग शिक्षिका सुनीता कुलकर्णी, संतोष पवार, हरिदास कुंभार तसेच प्रशालेतील पदाधिकारी व ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकारी व कर्णबधिर मुलांची आई ललिता पवार यांच्या उपस्थित श्रवण यंत्र देण्यात आले. बार्शी शहरातील अनेक सामाजिक संघटना काम करीत असून त्यातील एक ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था ही आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यास श्रवण यंत्र दिल्यामुळे संस्थेचे व अध्यक्ष राहुल वाणी यांचे आभार मानले. यावेळी संस्थेचे राहुल वाणी, सुनील फल्ले, दादासाहेब मस्तूद, नागनाथ सोनवणे, माणको ताकभाते, सायरा मुल्ला, रेखा विधाते, रागिणी झेंडे, त्रिशाला मिसाळ उपस्थित होते.



### जि.प. पितापूर उर्दू शाळेचे विज्ञान परिक्षेत यश

**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

इकरा अकादमी अकोला आयोजित डॉ कलाम ज्यू सायंटिस्ट परिक्षा आयोजित केली होती. यात जिल्हा परिषद पितापूर उर्दू शाळेने सहभाग घेतला दोन फेज पूर्ण करून तिसऱ्या फेज मध्ये पोहचले व पारितोषिक प्राप्त केले. मुख्याध्यापिका गुलशन म. हनीफ हरकारे, विज्ञान शिक्षिका तस्कीन अ. रजाक नल्लामंदू, आसीया, तब्बसूम नायब, जहां आरा, नाजनीन यांनी मार्गदर्शन केले. या यशा बद्दल शहर काजी मुफ्ती अमजद अली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात यश प्राप्त मुली आएशा रहमत अली फकीर, अल्फीया अकबर सगरी व इतर सहभाग झालेल्या सर्व मुलींचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नजीर मुनशी, इम्रान जमादार, डॉ शफी चोबदार, महेमूद नवाज, मुख्यध्यापिका गुलशन हरकारे, तस्कीन नल्लामंदु उपस्थित होते.

# जिल्ह्यात दिव्यांगांसाठी मिशन अस्मिता ठरले 'बुस्टर'

### ग्राम पातळीवर पोहोचणारा राज्यातला पहिला जिल्हा

### जिल्ह्यात १२ हजार ६६६ पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप



**दिव्यांग दिन विशेष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ नोव्हेंबर-**

दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजनेच्या लाभासाठी दिव्यांगत्व प्रमाणपत्र आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र त्यांना सहजरित्या उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान राबविण्यात आले. जिल्ह्यात दिव्यांग बांधवासाठी अस्मिता अभियान यशस्वी झाले असून जिल्ह्यातील १२ हजार ६६६ पात्र लाभार्थींना विशेष प्रमाणपत्राचे घरपोच वाटप करण्यात येत आहे. दरम्यान, ग्रामीण पातळीवर दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करणारा राज्यातला पहिला जिल्हा म्हणून परिचित होणार आहे. त्यामुळे हा पथदर्शी प्रकल्प राज्यासाठी रोल मॉडेल ठरू शकतो.

जिल्ह्याचे हे भौगोलिक आवाहन लक्षात घेता जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मोहिमेचे नोडल अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा समाजकल्याण अधिकार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि मिशन इन्स्टिट्यूट ट्रेनिंग रिसर्च अँड एक्शन( मित्र) संस्थेचे अध्यक्ष अभिजित राऊत, सचिव संजय पुसाम यांच्या सहकार्याने संपूर्ण जिल्ह्यात शासन आपल्या दारी ही मोहिम राबविली गेली. या मोहिमेची तिन टप्प्यांत विभागणी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात गटविकास अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, आशा ताई, अंगणवाडी सेविका, समग्र शिक्षण अभियान, राष्ट्रीय बाल विकास प्रकल्प, पालक संघटना, दिव्यांग व्यक्तींच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, संघटना यांचे सहकार्य लाभले. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात ज्या व्यक्तींजवळ नविन दिव्यांगत्व प्रमाणपत्र नाही अशा एकूण १५ हजार ६६६ दिव्यांग व्यक्तींची प्राथमिक माहिती प्राप्त केली. तसेच समग्र शिक्षा अंतर्गत०-१८ वयोगटातील शिक्षण घेणाऱ्या एकूण १०१० बौधिक अक्षम बालकांसाठी ४३ बुध्दीगुणांक प्रामथिक तपासणी शिबिरे घेण्यात आली. दुस-या टप्प्यात जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये ३८ दिवसांत २५ शिबिरांची मोहिम यातून राबविली गेली. विशेष म्हणजे यात तब्बल १५हजार ६६६ दिव्यांग बांधवांची प्राथमिक तपासणी पूर्ण होऊ शकली. यातून पात्र ठरलेल्या १२ हजार ६६६ लाभार्थी दिव्यांग बांधवांना पुढील ६० ते ९० दिवसांमध्ये आता दिव्यांग प्रमाणपत्र घरपोच उपलब्ध होऊ शकणार आहे.

केंद्रिय सामाजिक न्याय विभागाने घेतलेल्या पुढाकारातून २०१८ मध्ये जिल्हा पातळीवर युनिव्हर्सल आयडी फॉर डिसॅबलिटी (युडीआयडी) प्रणाली सुरू झाली. २०११ च्या जनगनणेनुसार सोलापूर जिल्ह्यात १ लक्ष १६ हजार दिव्यांग व्यक्ति आहेत. ज्यामध्ये ६८ टक्के ग्रामीण भागात तर ३२टक्के शहरी भागात राहतात. या मोहिमेच्या माध्यमातून सोलापूर वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयाने मागील गेल्या पाच वर्षांत फक्त ४० हजार दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्र वाटप केले गेले. ही प्रक्रिया करताना तपासणी, निदान, प्रमाणपत्रासाठी किमान ३ ते ४ वेळा दिव्यांगांना जिल्हा मुख्यालय गाठावे लागत होते. मात्र जिल्हा प्रशासन आणि मित्र स्वयंसेवी संस्थेच्या संवेदनशील पुढाकारातून पाच महिन्यांत राबविलेल्या मोहिमांमधून दिव्यांग बांधवांना एकाच भेटीत जिल्हा मुख्यालयाऐवजी तालुका पातळीवचर दिव्यंगत्वाचे निदान शक्य झाले.

> दिव्यांग अस्मिता अभियानांतर्गत तपासणी आणि निदान करून प्रमाणपत्रासाठी पात्र ठरलेले तालुकानिहाय दिव्यांग बांधव पंढरपूर-९५७, अक्कलकोट- १३३७, बार्शी- ११५०, माळशिरस-१३१०, सांगोला-१२९०, करमाळा-११४०, मोहोळ -१३६०, माढा-८०४, मंगळवेढा-६१०, सोलापूर (दक्षिण)-७९०, सोलापूर (उत्तर)- ४१० असे ११ हजार १५८ तसेच काही लाभार्थींना जिल्हा पातळीवर रेफर करण्यात आले आहे. त्यातून संभाव्य १५०८ लाभार्थी पात्र होऊ शकतात. असे एकूण १२ हजार ६६६ लाभार्थींना दिव्यांग प्रमाणपत्रासोबतच शासनाच्या विविध योजनांचे माहिती पत्रक, जिल्हा परिषदेच्या योजनांचे माहिती पत्रक, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, शुभेच्छा पत्र, यु.डी.आय.डी. कार्डची छांयाकित प्रत असे सर्व कागदपत्रे एका बंद लिफाप्यात त्याच्या घरपोच देण्यात येत आहेत.
>
> **- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी**

> केंद्रिय सामाजिक न्याय विभागाने घेतलेल्या पुढाकारातून २०१८ मध्ये जिल्हा पातळीवर युनिव्हर्सल आयडी फॉर डिसेंबलिटी (युडीआयडी) प्रणाली सुरू झाली. २०११ च्या जनगनणेनुसार सोलापूर जिल्ह्यात १ लक्ष १६ हजार दिव्यांग व्यक्ति आहेत. ज्यामध्ये ६८% ग्रामीण भागात तर ३२% शहरी भागात राहतात. या मोहिमेच्या माध्यमातून सोलापूर वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयाने मागील गेल्या पाच वर्षांत फक्त ४० हजार दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्र वाटप केले गेले. ही प्रक्रिया करताना तपासणी, निदान, प्रमाणपत्रासाठी किमान ३ ते ४ वेळा दिव्यांगांना जिल्हा मुख्यालय गाठावे लागत होते. मात्र जिल्हा प्रशासन आणि मित्र स्वयंसेवी संस्थेच्या संवेदनशील पुढाकारातून पाच महिन्यांत राबविलेल्या मोहिमांमधून दिव्यांग बांधवांना एकाच भेटीत जिल्हा मुख्यालयाऐवजी तालुका पातळीवर दिव्यंगत्वाचे निदान शक्य झाले.
>
> **- अभिजित पाटील, अध्यक्ष, ट्रेनिंग रिसर्च अँड एक्शन (मित्र)**

## आ. मोहिते-पाटलांवर कारवाई होणारच

### भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. २ डिसेंबर-**

विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात काम करणारे विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षातून बडतर्फ करण्यात यावे, अशी शिफारस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. दरम्यान आ. मोहिते- पाटील यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आम्ही एकनिष्ठ आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी यावरून पक्षहिताचे काम केलेले आहे हे दिसून येत नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यावर योग्य ती भूमिका घेतील आणि भाजपच्या विरोधात काम करणाऱ्या आ.रणजितसिंह मोहिते-पाटलांवर कारवाई करतील. चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली तरीही पक्षविरोधी कारवाया करणाऱ्या आ. रणजितसिंह मोहिते-पाटलांवर कारवाई होणारच अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.



चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष असल्याने चंद्रशेखर बावनकुळे हे कोणाचीही भेट टाळू शकत नाहीत. आ.रणजितसिंह मोहिते पाटील हे चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याचे फोटो व्हायरल करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकीकडे भाजपच्या उमेदवाराचा पराभव करण्यासाठी पुढाकार घ्यायचा आणि दुसरीकडे पक्षातून निलंबनाची कारवाई होऊ नये यासाठी सहनभुती मिळवण्यासाठी भाजप नेत्यांची भेट घेतल्याचे फोटो व्हायरल करायचे अशी दुटप्पी भूमिका आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी घेतली आहे. विधानसभा निवडणुकीत माळशिरस मतदारसंघातून भाजपचे उमेदवार राम सातपुते यांचा पराभव करण्यासाठी आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विरोधकांना साथ दिली. त्यामुळे राम सातपुते यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे रणजितसिंह मोहिते पाटील यांना तत्काळ भाजपमधून बडतर्फ करावे, अशी मागणी राम सातपुते यांनी निकालाच्या दुसऱ्या दिवशी केली होती.

> विधानसभा निवडणुकीत जे जे चुकीचं वागलेत, त्या सर्वांना त्यांची जागा दाखवली जाईल, त्यांची भाजपतून लवकरच बडतर्फी होईल. तसेच भाजप विरोधी कारवाया करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

## संजवाड येथे मुलाने केला वडीलांचा खून

### आरोपीला न्यायालयीन कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथे मुलगा व सुनेला त्रास देत असल्याच्या कारणावरून मुलाने वडीलाचा खून केल्याची घटना संजवाड येथे २० नोव्हेंबर रोजी घडली होती. चंद्रकांत विठ्ठल व्हनमाने वय ४५ वर्षे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. खून कोणी व कशासाठी केला? याचा मंद्रुप पोलीसांनी तपास केल्यानंतर मुलगा सागर चंद्रकांत व्हनमाने वय २७ यांनी खून केल्याची कबूली दिली. त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी संपल्यानंतर न्यायालयीन कोठडी मिळाली आहे.



मयताच्या अंगावरील गळयावर तीन ठिकाणी काताडे निघालेल्या जखमा, दोन्ही हातांच्या मनगटावरील काताडे निघालेल्या जखमा व उजव्या पायाच्या गुडघ्याजवळ खरचटलेले जखम अशा मृत अवस्थेत चंद्रकांत व्हनमाने यांचे मृतदेह आढळून आला होता. सदर मयतास कोणत्यातरी अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने गळा दाबून खून झाल्याने अज्ञात इसमा विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता . खुनातील आरोपी फरार असल्याने सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व गुन्हे शाखेच्या पथकांनी शोध घेतल्यानंतर मृत व्यक्तीच्या मुलाने सागर चंद्रकांत व्हनमाने यांनी खून केल्याचे निष्पन्न झाले. मला व पत्नीला त्रास देत असल्याने वडीलाचा खून केल्याचे सागर व्हनमाने यांनी सांगितले. आरोपीला अटक करून न्यायालयासमोर हजर केला असता पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

## कोंढार चिंचोलीच्या उपसरपंचपदी ज्ञानेश्वर गलांडे

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील कोंढार चिंचोलीच्या ग्रामपंचायत उपसरपंचपदी ज्ञानेश्वर गलांडे यांची निवड झाली. त्यावेळी त्यांचा सत्कार प्रा. रामदास झोळ व माया झोळ यांनी केला. यावेळी कोंढार चिंचोली गावचे सरपंच शरद भोसले, अनिल डफळे, प्रकाश गलांडे, मनोज साळुंखे, भरत लांडगे, चंद्रशेखर जगताप, ज्ञानेश्वर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.



# अकलूज येथे भाजपाच्या पाच शाखांचे उद्घाटन

### माजी आ. राम सातपुते यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपूते, दि. २ डिसेंबर -**

माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत अकलूज येथील ऐतिहासिक विजय चौकातील भारतीय जनता पार्टीच्या नूतन शाखेसह पाच शाखांचे उद्घघाटन करण्यात आले अनेक राजकीय घटनांचा साक्षीदार असणाऱ्या विजय चौकात भाजपने प्रथमच शाखा उद्घाटन केल्याने राजकीय जाणकारातून अनेक तर्क वितर्क लढविले जात आहेत

यावेळी भाजपाचे माळशिरस तालुका अध्यक्ष ॲड.मदने, आप्पासाहेब देशमुख, रंजन गिरमे, सुजयसिंह माने-पाटील, सोपान नारनवर, बाजीराव काटकर, ॲड. बी. वाय. राऊत, जयराज माने पाटील, बाळासाहेब सरगर, बाळासाहेब वावरे, अकलूज शहराध्यक्ष महादेव कावळे, सोनू पराडे, दादासाहेब उराडे, संजय देशमुख, लक्ष्मण गोरड, महादेव पवार, शिवराज पुकळे, रणजीत मोटे, सुरेश तरंगे, राहुल पद्मन, शशी कल्याणी उपस्थित होते.



भाजपाच्या नूतन शाखेचे उद्घाटन करताना माजी आमदार राम सातपुते, ॲड. शरद मदने, रंजन गिरमे, सुजयसिंह माने पाटील, आप्पासाहेब देशमुख, जयराज माने पाटील, महादेव कावळे, सोपान नारनवर, संजय देशमुख आदी.

माळशिरस विधानसभा निवडणुकीत सातपुते यांनी आपल्या विकास कामाच्या जोरावर माळशिरस तालुक्यातून जवळपास एक लाख दहा हजार मतदान मिळविले मा आ. राम सातपुते यांचा या निवडणुकीत जरी पराभव झाला असला तरी त्यांना मिळालेल्या मताधिक्याची चर्चा सर्वत्र होत असून भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून आगामी काळातील माळशिरस तालुक्यातील सर्व निवडणुका या माजी आ. राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली लढणार असल्याचे नुकतेच माळशिरस तालुक्यातील भाजपा पदाधिकाऱ्यांनी सांगितले होते, त्या अनुषंगाने माळशिरस तालुक्यात अकलूज येथूनच भाजपाच्या नवीन पाच शाखांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विजय चौकातील शाखेच्या अध्यक्षपदी संतोष अडगळे, उपाध्यक्षपदी अमर खंडागळे, आंबेडकर चौकातील शाखेच्या अध्यक्षपदी राहुल लोंढे, उपाध्यक्षपदी शुभम वाघमारे, होनमाने प्लॉट शाखेच्या अध्यक्षपदी ओंकार चंदनशिवे, उपाध्यक्षपदी सागर थोरात, समता नगर शाखेच्या अध्यक्षपदी लक्ष्मण सदाफुले, उपाध्यक्षपदी मनोज घोडके तर पंचवटीनगर शाखेच्या अध्यक्षपदी महेश घाडगे, उपाध्यक्षपदी गौरव घोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

> आमचे नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज आणि परिसरातील सर्वच ठिकाणी भाजपच्या नूतन शाखा उद्घघाटन करून भाजपाची ध्येयधोरणे व विकास कामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणार असून माळशिरस तालुक्यातील गावागावातील वाडी वस्तीवर भाजपाच्या शाखांचे उद्घाटन करणार आहे.
>
> **- राम सातपुते, माजी आमदार**

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ. पाटील मंत्री व पालकमंत्री व्हावे म्हणून येडेश्वरीला घातला खेटा

तभा वृत्तसेवा
**येरमाळा, दि.२ डिसेंबर -**

आ. राणाजगजितसिंह पाटील यांना मंत्रिपद मिळावे व धाराशिव जिल्हयाचे पालकमंत्री व्हावे यासाठी तेर येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्या नसिम मुलांनी यांनी येरमाळा येथे येडेश्वरीला दोऱ्याचा खेटा घालून येडेश्वरी मंदिराच्या पायरीवर कापूर प्रज्वोल्लित केला.

यावेळी तेर येथील लतिका पेठे उपस्थित होत्या.





## संक्षिप्त वृत्त...



### राठोड यांची पुण्यतिथी साजरी

**धाराशिव, दि.२ डिसेंबर -**

विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तसेच इंदिरा गांधी मुलांचे वस्तीगृह व सोबा नाईक बालगृहात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. मनोहरराव सोबा राठोड यांची द्वितीय पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी कै. मनोहरराव यांच्या प्रतिमेचे पूजन आश्रम शाळेचे माजी मुख्याध्यापक जगताप बी.यू. व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांनी केले. कार्यक्रमास आश्रम शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी दोन मिनिटं स्तब्ध उभा राहून आदरांजली वाहून कांबळे के.डी. यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

### मरणोत्तर देहदानाचा संकल्प

**धाराशिव, दि.२ डिसेंबर -**

शहरातील व्यावसायिक विश्वेश्वर चंद्रकांत चपने यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला आहे. जिवंत असताना




समाजासाठी आपण काम करत असलो तरी मरणानंतरही आपल्या देहाचा उपयोग व्हावा यासाठी आपण हा निर्णय घेतला असल्याचे चपने यांनी सांगितले. धाराशिव शहरातील विकासनगर येथील रहिवासी विश्वेश्वर चपने यांनी अनेक वर्ष एसटी महामंडळात सेवा केली. स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी व्यवसायात पदार्पण केले. व्यवसाय करत असताना समाजकारणातही ते सक्रिय आहेत. सध्या मेडिकल कॉलेजच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना देखील अभ्यासासाठी आपला देह कामी येईल या उद्देशाने आपण देहदानाचा संकल्प केला आहे. त्यासाठी धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देहदानाबाबत नोंदणी देखील केली असल्याची माहिती चपने यांनी दिली.



### एनएमएमएस अभिरूप परीक्षेचे आयोजन

**इटकळ, दि.२ डिसेंबर -**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थीसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा इयत्ता ८ वी शिकत असलेल्या विद्यार्थीची मुख्य परीक्षा दि.२२ डिसेंबर रोजी होणार आहे. या परीक्षा ची पूर्व तयारी म्हणून विध्यार्थीना एक सराव व्हावा या दृष्टीने Genius Maths Publication धाराशिव याच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय अभिरूप एनएमएमएस परीक्षाचे आयोजन केले होते. या परीक्षेत महाराष्ट्रात २० हजार पेक्षा जास्त विद्यार्थीनी परीक्षा दिली. या परीक्षेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ येथील ४ विध्यार्थीनी परीक्षा दिली. शाळेतील एनएमएमएस अध्यापन काम सतिश ढोणे यांनी केले असून शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी पुढाकार घेऊन ही परीक्षा पार पाडली. या परीक्षेमुळे विध्यार्थी गुणवत्ता वाढीत नक्की फरक पडेल. याकामी शाळेतील सहशिक्षक रविंद्र गायकवाड व युवा प्रशिक्षणार्थी राजश्री बागडे यांनी काम पाहिले.



### श्रीशैल्य बदोले यांचा सत्कार

**कदेर, दि.२ डिसेंबर -**

श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या माजी विद्यार्थी श्रीशैल्य बदोले यांचे राज्य राखीव पोलीस बल येथे नियुक्ती झाल्याबद्दल आई-वडील नीलम्मा संजय बदोले वडील संजय करबसप्पा बदोले तसेच सत्कारमूर्ती श्रीशैल्य संजय बदोले यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ फेटा पेढा देऊन प्रशालेत सत्कार करण्यात आले. श्री शैल्य बदोल यांचे इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण श्री सिद्धेश्वर विद्यालय झाले असून. ऑगस्टमध्ये एसआरपीएफ हिंगोली येथे मैदानी आणि लेखी परीक्षा संपन्न झाले होते. याच्या कौतुकाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत, सेक्रेटरी विठ्ठलराव बदले, मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे यांनी कौतुक आणि अभिनंदन केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू शिक्षकेतर कर्मचारी तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते

### बळीराम जाधव यांचे निधन

**जळकोट, दि.२ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील शिवनेरी



गल्लीतील रहिवासी बळीराम लिंबाजी जाधव (वय ९०) यांचे दि.२ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, जावई, सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# पोद्दार स्कूलमधील शिक्षकाचा शिक्षकेवर अतिप्रसंग; गुन्हा दाखल

## पालकांच्या 'त्या' तक्रारीनंतरही त्या शिक्षकावर कारवाई नाही; संस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह?

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२ डिसेंबर -**

शहरातील नामांकित असणाऱ्या पोद्दार इंग्लिश स्कूलमधील हैदर अली शेख नामक शिक्षकाने एका ३१ वर्षीय शिक्षिकेला विविध स्वरूपाचे अमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध सोलापूर व धाराशिव येथील लॉजवर नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची घटना घडली आहे. सदरील शिक्षिकेच्या तक्रारीवरून धाराशिव शहरातील आनंदनगर पोलिस ठाण्यात त्या शिक्षकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या शिक्षकाविरूद्ध दि.२५ मार्च २०२३ रोजी ई-मेलद्वारे मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडे २५ पालकांनी शाळेतील मुलींसोबत होत असलेल्या गैरवर्तनबाबत तक्रार केली होती. मात्र त्यावर पोद्दार स्कूलच्या व्यवस्थापनाने समाधानकारक कारवाई न केल्यामुळे या संस्थेच्या विश्वासार्हतेवर पालकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.


याबाबत माहिती अशी की, शहरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कुल येथे सदरील महिला शिक्षिका म्हणुन जुन २०२३ पासुन कार्यरत आहे. तिची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. याच शाळेत असणारा सिनीअर कोआर्डीनेटर म्हणुन हैदर अली शेख हा कार्यरत आहेत. कोआर्डीनेटर हैदर अली शेख हा पिडित शिकवत असलेल्या वर्गात जावून पिडितेचे शिकवण्याचे काम पहात होता. त्याने शिकवण्याचे काम पाहुन सदरील पिडितेस 'तुम्ही चांगले शिकवता. मी तुम्हाला एयर लीडर करतो' व मी प्राचार्य होतो असे म्हणुन त्याने पिडितेशी ओळख निर्माण करुन घेतली. त्यानंतर त्याने एयर लीडर बनवण्याचे अमिष दाखवुन पिडितेशी जवळीक निर्माण करुन मोबाईलवर



संपर्क साधुन वॉटसॲपवर देखील मॅसेज पाठविण्यास सुरुवात केली. नंतर तो पिडितेस नौकरीमध्ये प्रमोशन करण्यासाठी मदत करतो, असे सांगत होता. पिडितेला नौकरीची गरज असल्याकारणाने ती मॅसेजला उत्तरे देवु लागले. या संधीचा फायदा घेवून पिडितेस त्याने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. प्रेमाचा फायदा घेत दि.२० ऑगस्ट २०२३ रोजी पिडितेला सर्व शाळेचे कागदपत्र घेवुन एमआयडीसी धाराशिव येथे रात्रीच्या सुमारास बोलावले होते. त्यास पिडितेने नकार दिला. परंतु त्याने 'तु माझ्या शिवाय शाळेमध्ये पदावर राहु शकत नाहीस, त्यामुळे तुला माझ्याकडे येवुन कागदपत्र दाखवावी लागतील. अन्यथा मी तुझ्याविरूद्ध खोटे कागदपत्र तयार करेन व तुला नौकरीवरुन काढुन टाकण्यासाठी प्राचार्यांना सांगेल', अशी धमकी दिली. पिडितेला नोकरीची गरज असल्याकारणाने ती कागदपत्रे दाखविण्यासाठी धाराशिव येथील एमआयडीसी भागात गेले असता त्याने पिडितेच्या हाताला धरुन जवळ ओढले. तसेच पिडितेच्या इच्छेविरुध्द शरिरीक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्या पिडितेने नकार दिला असताना तुला नोकरीवरून काढून इतर कोठेही तुला नोकरी मिळू देणार नाही, अशी धमकी देवून इच्छेविरूद्ध शरीर संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर सोलापूर व धाराशिव येथील लॉजवर नेऊन वारंवार अत्याचार केल्याची तक्रार सदरील पिडितेने आनंद नगर पोलिस ठाण्यात दिली आहे.

याप्रकरणी सदरील पिडितेच्या तक्रारीवरून भा.न्या.सं. ६४, ३५२, ३५१ (२), ३५१ (३) अन्वये आनंदनगर पोलिस ठाण्यात सदरील शिक्षकाविरूद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### २५ मार्च २०२३ ची तक्रारीवर कारवाई नाही



Gmail — Lalit Chaudhari <lalitchaudhari5677@gmail.com>

**Complaint regarding the functioning of the Podar International School, Dharashiv**

Lalit Chaudhari <lalitchaudhari5677@gmail.com> — Wed, Mar 29, 2023 at 2:20 PM
To: "pavan@podar.org" <pavan@podar.org>

---------- Forwarded message ---------
From: Lalit Chaudhari <lalitchaudhari5677@gmail.com>
Date: Wed, Mar 29, 2023 at 2:19 PM
Subject: Complaint regarding the functioning of the Podar International School, Dharashiv
To: gaurav@podar.org <gaurav@podar.org>
Cc: <Pawan@podar.org>

The detailed complaint regarding the functioning of the Podar International School, Dharashiv is attached herewith for your reference. It is kindly requested that necessary corrective measures may kindly be taken at the earliest.
Regards,
Lalit Ashok Chaudhari
Mob No. 8087805315 /9404879411

धाराशिव शहरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमधील हैदर अली शेख नामक शिक्षक मुलींना अश्लिल शब्द वापरण्याच्या दृष्टीकोनातून वारंवार गणवेशावरून सतत टोमणे मारत होता. तसेच तो मुलींना हिंदी चित्रपटातील अभिनेत्री सारख्या तुम्ही दिसता, असे म्हणून सदरील मुलींसोबत गैरवर्तन करत होता. यावरून पालकांनी धाराशिव शहरातील पोद्दार स्कूलच्या प्राचार्या यांना मुंबई मुख्य कार्यालयाकडे ई-मेलद्वारे पाठवलेली तक्रार माहितीस्तव दि.२५ मार्च २०२३ रोजी दिली होती. त्यावरून पोद्दार स्कूलचे धाराशिव, लातूर विभागाचे एजीएम. प्रमोद पोनसे हे पालकांची तक्रार मिटविण्यासाठी धाराशिव येथे आले होते. यात त्यांनी त्या शिक्षकाविरूद्ध कारवाई करण्याचे व शाळेची गुणवत्ता सुधारण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पालकांच्या त्या तक्रारीवर आश्वासनाशिवाय शाळेने कोणतीच कारवाई केली नाही. यामुळे 'निर्ढावलेल्या' त्या शिक्षकाने थेट शिक्षिकेवरच अतिप्रसंग केला आहे.

### आमच्याकडे तक्रार आली नाही : शाळा प्रशासन

धाराशिव शहरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमधील शिक्षक मुलींना अश्लिल शब्द वापरत असल्याबाबत तक्रारी 'दै. तरूण भारत'च्या हाती लागताच शाळा प्रशासनाशी संपर्क साधला असता शाळेचे श्री. कुलकर्णी यांनी अशी पालकांची कोणतीही तक्रार धाराशिव पोद्दार स्कूलमध्ये आली नसल्याचे सांगितले. तसेच आनंदनगर पोलिस ठाण्यात ३० नोव्हेंबर रोजी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीबाबत विचारना केला असता हा प्रकार शाळेबाहेर घडल्यामुळे याचा शाळेशी काहीही संबंध नाही असा सावध पवित्रा श्री. कुलकर्णी यांनी घेतला.

## परंडा तालुक्यात बिबट्याची दहशत कायम; शेतकऱ्यांत घबराटीचे वातावरण

तभा वृत्तसेवा
**परंडा, दि.२ डिसेंबर -**

परंडा तालुक्यात गेले पंधरा दिवसांपासून बिबट्याच्या दहशतवादीमुळे तालुक्यातील शेतकरी वर्ग परेशान झाला असून शेती मधील कामे सोडून शेतकरी वर्ग सांयकाळीच्या गांवात मुक्कामी येत आहेत. परंतु वनविभागाला बिबट्या पकडण्यात अद्यापही यश आले नसलेल्यामुळे शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून बिबट्याने तालुक्यातील १० ते १२ जनावरांवर हल्ला करून ठार मारले आहे.

तर काही ठिकाणी शेळ्या वर हल्ला केला आहे.त्यामुळे शेतकरी वर्गात दहशत निर्माण झाली आहे. या तालुक्यात शेतकरी वर्गासाठी एक आठवडा रात्र पाळीची वीज चालू असते.

त्यामुळे नाईलाजाने रात्रीच्या वेळी पिकांना पाणी द्यावे लागते. पण बिबट्या च्या भीती मुळे शेतकरी वर्गाने रात्रीच्या वेळी शेतात जाणे बंद केले आहे.

## फिरते वस्तू संग्रहालयातील प्राचीन शिल्प पाहाण्यासाठी तेरमध्ये गर्दी



तभा वृत्तसेवा
**तेर, दि.२ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या फिरते वस्तू संग्रहालयातील प्राचीन शिल्प पाहाण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.

तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयात फिरते वस्तू संग्रहालयाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेदरे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी फिरते वस्तू संग्रहालयाचे शिक्षण सुलभक चिन्मय वैशाली, सहाय्यक शिक्षण सुलभक काश्यपी राणे,ऋतूजा काळे, सहाय्यक सुलभक देवेश पाले, ओंकार डोंगरकर, पर्यवेक्षक एस.एस. पाटील, एस.एस. बळवंतराव, नवनाथ पांचाळ, एस.यू. गोडगे उपस्थित होते.

यावेळी शिक्षण सुलभक चिन्मय वैशाली यांनी फिरते वस्तू संग्रहालयाचा उद्देश काय आहे याची सविस्तर माहिती सांगितली. यावेळी १४ व्या शतकातील युरोपमध्ये छापील चित्राची जगामध्ये पहिली सुरूवात झाली.

त्याचे प्रात्यक्षिक उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना दाखविण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थीनी, नागरिक यांनी फिरते वस्तू संग्रहालयातील प्राचीन शिल्प पाहाण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.

यावेळी अविनाश राठोड, किसन काळे, दुर्गेश नान्नजकर, सविता बागडे, मेघा राऊत, भाग्यश्री बिराजदार, विवेक उबाळे, सलमानखा पठाण, गिरीश चवरे उपस्थित होते.

## कपिलापूरी हल्लयातील आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
**भूम, दि.२ डिसेंबर -**

कपिलापूरी (ता.परंडा) येथे दि.२५ नोव्हेंबर रोजी मांतग समाजातील कुटुंबातील महिला, पुरुषांवर गावातील गांवगुंडानी विधानसभेतील निवडणुकीत आमच्या पक्षाच्या विरोधात का प्रचार केलास म्हणून करून लोखंडी रॉडने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देऊन फरार झालेले आहेत. या प्रकरणी परंडा पोलिस ठाण्यात या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद देखील करण्यात आलेला आहे.

परंतू आज सहा दिवस झालेले असताना देखील आरोपीना अटक करण्यात आलेली नाही. या आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी यासाठी सकल मांतग समाज भुम-परंडा-वाशीच्या वतीने पोलिस उपअधिक्षक कार्यालय भूम यांना निवेदन दिले आहे.

निवेदनावर बाळासाहेब थोरात, जालिंदर थोरात, रोहन थोरात आदिंची स्वाक्षरी आहे.

## शिक्षिका मिनाक्षी नकाते यांच्या पुढाकारातून हॅप्पी क्लबचा शुभारंभ




तभा वृत्तसेवा
**परंडा, दि.२ डिसेंबर -**

शहरातील आत्मसूर्य महिला बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने शालेय मुला-मुलींचे भावविश्वाला आकार मिळावा, विद्यार्थ्यांची सर्वांगिण जडणघडण होवुन सकारात्मक व्यक्तिमत्व घडावे यासाठी संचालक शिक्षिका मिनाक्षी नकाते यांच्या पुढाकारातुन शहरातील लाल मारुती चौकात रविवार दि.१ रोजी हॅप्पी क्लब शुभारंभ करण्यात आला.

हल्ली घरोघरी एकच ऐकायला मिळते की, मुले बिघडली आहेत. आमचे काही ऐकतच नाहीत, स्वच्छंदी, विलासी, आळसी, हट्टी बनली आहेत. गप्प गप्प राहतात त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव नाही, अतीलाडाने ती पार बिघडून गेली आहेत. छोट्या छोट्या गोष्टीचा चटकन राग येतो. या सर्व बाबींची कारणमिमांसा पाहता त्यावरील उपाय शोधण्याच एक माध्यम म्हणजे हॅप्पी क्लब आहे. या क्लबच्या माध्यमातून मुलांना मानसिकदृष्ट्या सक्षम करणे. त्यांच्या मध्ये सकारात्मकता वृद्धिंगत करणे, मनातील भावनांना व्यक्त करण्यासाठी हे व्यासपीठ त्यांना नक्कीच मदत करेल असे मत नकाते यांनी बोलताना व्यक्त केले.

या क्लबच्या माध्यमातुन अभ्यासाची गोडी निर्माण होवुन स्पर्धा परीक्षांची प्रेरणा मिळावी याकरिता जिल्हा परिषद शाळेत शिकलेले व मराठी अधिकाऱ्यांचं गाव म्हणून सर्वदुर परिचीत आसलेल्या माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक या गावातील उच्चपदस्थ, यशस्वी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष भेट या गोष्टी मुलांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

तसेच क्षेत्रभेट, शैक्षणिक सहल, गीतगायन, वक्तुत्वकला, चित्रकला यातून मुलांचे मनोरंजनासह आनंद निर्माण करणारे सकारात्मक बदल होण्यास मदत होणार आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून हॅप्पी क्लब हा सर्वांसाठी मोफत चालविला जाणार असल्याचे नकाते यांनी सांगितले. यावेळी जेष्ठ महिला निर्मला विटकर, वृक्ष संवर्धन समितीचे तालुकाध्यक्ष मुख्याध्यापक बाळासाहेब घोगरे, सुजित देशमुख, उपक्रमशील शिक्षक महेश शिंदे, व्हाईस आफ मिडिया जिल्हाउपाध्यक्ष प्रकाश काशीद, मुख्याध्यापक गणेश विटकर, मुख्याध्यापक सुरेखा भोसले, शिक्षिका अर्चना कोकाटे आदिसह पालकांची उपस्थिती होती. मंजुषा फडके यांनी आभार व्यक्त केले.

## कळंब तालुक्यातील नविन रेशनकार्ड धारकांना धान्य उपलब्ध करा

### मानव अधिकार आंदोलन संघटनेची मागणी...

तभा वृत्तसेवा
**कळंब, दि.२ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील नविन रेशनकार्ड धारकांना धान्य मिळत नसल्याने तात्काळ धान्य उपलब्ध करण्याची मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कळंब तालुक्यातील अनेक नागरीकांनी नविन शिधापत्रिका काढल्या आहेत. परंतु सदरील शिधापत्रिका धारकांना अद्यापही धान्य मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होऊ लागली आहे.

तसेच अनेक कुटुंबातील काही व्यक्तींची नावे रेशनकार्डमध्ये ऑनलाईन नसल्याने महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या योजना ही घेता येत नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत.



त्यामुळे रेशनकार्ड धारकांना त्यांच्या हक्काच्या लाभांपासून वंचित राहवे लागते.

त्यामुळे अशा नागरीकांसाठी गावस्तरावर विशेष कॅम्पचे आयोजन करून त्यांची नावे ऑनलाईन करावीत, तसेच रेशन धान्य दुकानातून धान्य उचलल्यास रेशन कार्डधारकांना त्याची पावती देण्यात यावी. अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. मागण्या मंजूर न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सदरील निवेदनावर मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण बनसोडे, तुकाराम ताटे, सचिव रामभाऊ आव्हाड, संघटक संतोष सोनवणे, सुशील गायकवाड, सुरज कांबळे, किरण सावंत, शिवहरी शिंदे यावेळी उपस्थित होते.

## एनव्हीपी शुगरचा दुसरा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : चेअरमन नानासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि. कारखान्याच्या प्रथम गळीत हंगामात दुसऱ्या परंधवाड्यात १६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल २५०० रुपये प्रमाणे बँक खात्यात वर्ग करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.



तरी ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे. अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते दिले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. धाराशिव येथे जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन चेअरमन पाटील यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अंबाजोगाईत अतिक्रमणांवर पडणार पुन्हा हातोडा

# रस्ता रुंदीकरणाचे काम वेगात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ डिसेंबर**

अंबाजोगाई शहरात अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा सुरु होणार आहे. रस्ता रुंदीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणांचा अडथळा जाणवू लागल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शहरात पुन्हा एकदा अतिक्रमणांवर हातोडा पडणार आहे. तशा आशयाच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने भोंग्याद्वारे शहरातील अतिक्रमण धारकांना देण्यात येत आहेत. येत्या तीन दिवसांत रस्त्यावरील अतिक्रमणे काढली नाहीत तर ती अतिक्रमणे पोलिस बंदोबस्तात जमीनदोस्त करण्यात येतील, अशी सूचना देण्यात आली आहे.

अंबाजोगाई शहरातील संत भगवानबाबा चौक ते यशवंतराव चव्हाण चौक तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते – 'स्वाराती' रुग्णालय – यशवंतराव चव्हाण चौक या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण होत आहे. यासाठी तब्बल ४२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे कामही सुरु करण्यात आले आहे. परंतू, काम पुर्णत्वास नेण्यासाठी अतिक्रमणांचा अडथळा सार्वजनिक बांधकाम विभागाला होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण हटाव मोहिम पुन्हा सुरु करण्याचे ठरविले असून त्या दृष्टीने तयारीही सुरू केली आहे. या अगोदर शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात आली होती. त्यात बरेच अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आले होते. नंतर विधानसभेच्या निवडणुका लागल्याने अतिक्रमण हटाव मोहिम थांबविली होती.विधानसभा निवडणूक आता पार पडल्याने पुन्हा एकदा ही अतिक्रमण हटाव मोहिम सुरु होणार आहे. या मोहिमेद्वारे शहरातील अतिक्रमणे काढली जाणार आहेत. दरम्यान, अतिक्रमण हटाव मोहिमेसाठी जेसीबी, मोठे क्रेन यासह विविध यंत्रसामग्री आणि पोलिस बंदोबस्ताची पुर्ण तयारी झाली असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांचा बीडकरांकडून अभूतपूर्व नागरी सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

बीडच्या मायबाप जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशिर्वादानेच मी दुसर्यांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेन असे आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त होताना सांगितले. रविवारी (दि.१) रोजी नागरी सत्कार समितीच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांचा, दुसर्यांदा आमदार पदी निवडून आल्याबद्दल सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

रविवार (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे नागरी सत्कार समिती, बीड यांच्या आयोजनाने सलग दुसर्यांदा विधानसभा सदस्यपदी निवडून आल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी समस्त बीडकरांच्या वतीने आ.क्षीरसागर यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्ती विना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुसर्यांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही मग परत आपल्याला निधी मिळणार नाही! पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासक राज जेव्हा हटेल तेव्हा लोक निहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही. त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले.

## माजी सभापती भिवाजी पौळ यांच्या स्मृतीदिनी शालेय साहित्याचे वाटप
## आपला परिवार वृद्धआश्रम आजी-आजोबांना भोजनदान देवुन स्मृतीदिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ डिसेंबर**

येथील पंचायत समितीचे माजी सभापती कालवश भिवाजी पौळ यांच्या चौथ्या चौथा स्मृतीदिना निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शुकलतिर्थ लिंबगाव येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.तर कळसंबर ता. बीड येथील आपला परिवार वृद्धआश्रम आजी-आजोबांना भोजनदान देवुन स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी विवेक भिवाजी पौळ,संजीवनी भिवाजी पौळ, सुजाता विवेक पौळ,माया मिलींद रणदिवे,प्रज्ञा संतोष साळवे,आनंद श्रीराम मोरे,वर्षाताई आनंद मोरे, यांच्यासह आदींची उपस्थीती होती.

यावेळी जिल्हा परिषद शाळा शुकलतिर्थ लिंबगाव या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप विवेक पौळ भागवत वगरे,किसन वगरे,सरपंच कृष्णा थावरे,अमोल शेरकर,सिद्धार्थ पौळ,भास्कर कांबळे,अभिमान शेरकर, नारायण पांचाळ,प्रकाश खडुळ,मुख्याध्यापक शिंदे सर, कांबळे सर,रत्नपारखी सर,जावळे सर,कर्डीले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

## जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभातफेरीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

जागतिक एड्स दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनपर्यंत एड्स प्रतिबंधात्मक जनजागृती प्रभातफेरी काल काढण्यात आली. रॅलीस युवा वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

प्रभातफेरीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव जी.जी.सोनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या हस्ते



हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.

प्रभातफेरीमध्ये महाविद्यालयीन युवक-युवती, रेड रिबन क्लब सदस्य, रोटरी क्लब अध्यक्ष, इन्नर व्हील क्लब, इन्फंट इंडिया, विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, विविध अशासकीय संस्थेचे कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते, सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना एड्स मुक्त जीवन जगण्याची शपथ यावेळी देण्यात आली.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.अशोक थोरात यांनी एचआयव्ही, एड्स जनजागृती रॅलीमधून दिलेली माहिती सर्व समाजातील घटकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन केले. त्यानंतर उपस्थित शाळा, महाविद्यालयांना तसेच अशासकीय संस्थांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरुण राऊत, तत्वशील कांबळे, रोटरी क्लबचे अध्यक्ष नितीन गोपन यांनी युवक-युवतींना मार्गदर्शन केले. अशोक तांगडे यांनी गिताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी यांनी केले. श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी सूत्रसंचालन केले. एफ.आर.फारोकी यांनी आभार मानले.

## मतदार संघाच्या विकासाठी आमदार प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या-ॲड.नारायण पाटील तेलगड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ डिसेंबर**

माजलगाव विधानसभा मतदार संघाचे विकासाचा महामेरू भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांची कॅबिनेट मंत्री पदी वर्णी लावण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडे राजेवाडीचे ग्रामंचायत सदस्य ॲड.नारायण पाटील तेलगड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केली आहे.



माजलगाव मतदार संघात आमदार प्रकाशदादा सोळंके यांना मतदारांनी विधानसभा निवडणुकीत विजयी करून पाचव्यांदा प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली असून मतदार संघात विकासगंगा आणली आहे.तर मतदार संघात लघु व मध्यम जलसिंचन प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असल्याने हजारो हेक्टर क्षेत्र सुजलाम् सुफलाम झाले आहे. तसेच बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे व मतदार संघातील युवक बाहेर जिल्हयात स्थलांतरित होवू नये यासाठी ४५० एक्करमध्ये पंचतारांकित औद्योगिक वसाहती मध्ये नवनवीन उद्योग उभे राहावे हा मानस असून उद्योगास चालना देण्यासाठी आमदार प्रकाश सोळंकेंना मतदारांनी पुन्हा निवडूण दिलं आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करून कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लावण्यात यावी अशी मागणी राजेवाडी ग्रामपंचायतचे सदस्य ड.नारायण पाटील तेलगड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.

## विज्ञान उपकरण निर्मितीतून विदयार्थ्यांचा शाश्वत विकास झाला पाहीजे-शिक्षणाधिकारी भगवान फुलारी

तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ डिसेंबर**

गट शिक्षणाधीकारी कार्यालय पंचायत समिती माजलगा व श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राथमीक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी बोलत होते .यावेळी त्यांनी सांगितले की, विज्ञान उपकरण निर्मितीतून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता विकसित होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करुन झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, तर उदघाटक माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, तर विचारपीठावर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी, उपशिक्षणाधिकारी हजारे साहेब, उपशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक, गटशिक्षणाधिकारी माजलगाव रवींद्र महामुनी, गटशिक्षणाधिकारी केज लक्ष्मण बेडसकर, विज्ञान विभाग प्रमुख लक्ष्मण पोटभरे ,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी शाश्वत ज्ञान प्राप्त करण्यासाठी आतूर असले पाहिजे यासाठी अत्यंत प्रभावी उदाहरणे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. यानंतर गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक यांनीही प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण (practical knowledge) घेण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शाश्वत शिक्षण मिळावे यासाठी शासनाने अटलटिंकरिंग लॅब, कार्यान्वित करण्यात आली आहे. यातून विज्ञानाच्या विविध संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. प्रास्ताविक रवींद्र महामुनी (गटशिक्षणाधिकारी माजलगाव) यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार सदाशिव ढगे व सुत्रसंचलन श्रीमती सुरेखा गवळी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विभाग प्रमुख रवींद्र खोडवे यांनी सांगितला. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता नववी ते बारावी व सहावी ते आठवी या गटातून तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. यावेळी तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी उपकरणासह उपस्थित होते. तसेच संपूर्ण प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, सचिन मोती , रवि अदमाने , विठ्ठल पवार , पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व विज्ञान विषय शिक्षक, प्रयोगशाळा परिचर, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीमध्ये सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

बीड दिनांक २ डिसेंबर २०२४ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत एक डिसेंबर जागतिक एड्स दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.या दिनानिमित्त आज दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय बीड मार्फत आयोजित प्रभात फेरीमध्ये सहभाग नोंदला मार्ग *हक्काचा सन्मानाचा --टेक द राईट पाथ* ही घोषणा देऊन एड्स जनजागरण अभियानात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला ही प्रभात फेरी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सकाळी ८:०० वाजता निघाली या रॅलीचा मार्ग श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कारंजा रोड- माळी वेस - सुभाष रोड अण्णाभाऊ साठे चौक बस स्टॅन्ड या ठिकाणाहून गेली होती या रॅलीचा समारोप नगर रोड येथील *सामाजिक न्याय भवन* या ठिकाणी झाला जागतिक एड्स दिनानिमित्त हे अभियान दिनांक २ डिसेंबर ते नऊ डिसेंबर या कालावधीमध्ये विविध कार्यक्रम घेऊन संपन्न होणार आहे. या रॅलीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर प्रीती पोहेकर, उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉक्टर उत्तम साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ सुहास जोशी,डॉ संगीता ससाने, प्रा. संजय काळे यांनी रॅली यशस्वी होण्याकरिता परिश्रम घेतले या रॅलीसाठी सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

## आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जागतीक एड्सदिन व इतर दिनीही विविध कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ डिसेंबर**

आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात १ डिसेंबर २० २४ रोजी जागतिक एड्सदिन विविध उपक्रम व कार्यक्रम घेवून संपन्न झाला.

जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने युवक संवाद , एड्स एक गंभीर समष्या -उपाययोजना व घ्यावयाची काळजी, प्रबोधन आदी कार्यक्रम घेण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे संस्यापक, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिद्ध वक्ते व व्याख्याते वसुदेव ( बप्पा) गायकवाड हे होते.माजी सरपंच रामराजे गायकवाड, रंजीत पाटील यांची थोडक्यात व्याख्याने झाली तर ह.भ.प. नारायण भाऊ गायकवाड यांनी प्रबोधन केले.बाळासाहेब गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी सखोल मार्गदर्शन केले.तसेच यरावंतराव चव्हाण पुण्यतिथी, महात्मा फुले पुण्यतिथी ही साजरी करण्यात आली.

तीन्ही वेगवेगळया कार्यकरमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले. मोठ्या संख्येने युवक, जेष्ठ नागरीक, विदयार्थी यांची उपस्थिती होती.

# बीड येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा शांततेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

रविवार १ डिसेंबर रोजी उपजिल्हाधिकारी,पोलीस उपअधीक्षक, तहसीलदार इत्यादी पदांसाठी घेतली जाणारी राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा बीड येथे शांततेत पार पडली . बीडचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, अविनाश शिंगटे, नरेंद्र कुलकर्णी, उपकेंद्र प्रमुख, पोलीस कर्मचारी व अधिनस्त कर्मचारी यांनी या कामी मेहनत घेतली. एकूण दहा केंद्रावर ३०४७ उमेदवार होते.त्यापैकी सकाळच्या सत्रात २०१० तर दुपारच्या सत्रात १९९७ उमेदवार हजर होते.

राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एक डिसेंबर रोजी घेण्यात आली . राजपत्रित अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे अनेक तरुण-तरुणी रात्रंदिवस अभ्यास करून ही परीक्षा देत असतात. अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत बीडला कोठेही अनुचित प्रकार घडला नाही व अत्यंत शांततेत ही परीक्षा पार पडली असे जिल्हा केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले.

विविध केंद्रावर भेटी दिल्या असता विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता दिसून आली . परीक्षा संपल्यानंतर काही खुशीत दिसले तर काहींचे चेहरे पडलेले दिसले . अर्थातच या परीक्षेत बौद्धिक क्षमतेचा कस लागत असतो . बीड येथे चंपावती विद्यालय , चंपावती इंग्रजी शाळा , भगवान विद्यालय , शिवाजी विद्यालय , सौ के एस के महाविद्यालय , संस्कार विद्यालय , गीता कन्या प्रशाला , बलभीम महाविद्यालय , छत्रपती शाहू विद्यालय , चंपावती विद्यालय येथे या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी दहा ते बारा या पहिल्या सत्रात पहिला पेपर घेतला गेला तर दुपारी तीन ते पाच या कालावधीत दुसरा पेपर घेण्यात आला . बीड जिल्ह्यातून ३०४७ उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला होता. सकाळच्या सत्रात २०१० विद्यार्थी हजर होते तर १०३७ गैरहजर होते. दुपारच्या सत्रात १९९७ विद्यार्थी हजर होते तर १०५० गैरहजर होते. विविध केंद्रावर उपकेंद्र प्रमुख म्हणून पॉलिटेक्निक कॉलेजचे अधिव्याख्याता विवेक थिगळे, दत्तात्रय वाघ आनंद जाधव, महेश रायते, दत्तात्रय करवर, सुहास वीर, प्रफुल्ल गावडे, सचिन देशमुख , अन्सारी ए आर,सचिन आगाम यांनी काम पाहिले.

ही परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची परीक्षा असते . म्हणजे दिलेल्या पर्यायातून एका पर्यायाची निवड करायची असते . प्रश्नपुस्तिका उमेदवारांना सोबत घेऊन जाण्याची मुभा असते.

परीक्षेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व गैरप्रकारास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात येते . प्रत्येक उमेदवाराची त्यांच्या डोळ्यांचे स्कॅनिंग करून बायोमेट्रिक पद्धतीने तपासणी करण्यात येते. त्यामुळे कोठेही गैरप्रकार होण्याची शक्यता राहत नाही. दिव्यांग उमेदवारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येते. उमेदवारांना परीक्षा कक्षात त्यांच्या बॅग्स, स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन , ब्लूटूथ इत्यादी दूरसंचार साधने अथवा डायरी, पाऊच, परीगनक (कॅल्क्युलेटर ) , मोबाईल फोन, पुस्तके इत्यादी घेऊन जाण्याची मुभा नसते. विद्यार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी ते स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट इत्यादी सोबत ठेवू शकतात.

परीक्षा केंद्रावर एका हॉलमध्ये प्रत्येकी २४ उमेदवारांची बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली असते. त्यांची प्रश्न पुस्तिका ही अ ब क ड अशा संचामध्ये असते, जे की वेगवेगळे असतात . उत्तरपत्रिका वाटप करणे, प्रश्नपुस्तिका वाटप करणे, हजेरीपट भरून घेणे इत्यादी कामे समवेक्षक करून घेत असतात . समवेक्षक हे हजेरीपटावर सही घेताना प्रवेश प्रमाणपत्रावर व हजेरीपटावर असलेले उमेदवाराचे छायाचित्र हे एकच असल्याची खात्री करून घेतात.

बीड जिल्ह्यातुन अनेक अधिकारी यापूर्वी निवड झालेले आहेत. अनेक अधिकाऱ्यांनी बीडचे नाव देशात व राज्यात उंचावलेले आहे.त्याचाच परिणाम म्हणून नवीन पिढीला आपणही अधिकारी व्हावे असे वाटत असते. बीडचे विद्यार्थी पुणे , छत्रपती संभाजीनगर येथे पूर्वपरीक्षेचा, मुख्य परीक्षेचा अभ्यास करतात असे एका परीक्षार्थीने यावेळी सांगितले.

परीक्षा केंद्राच्या प्रमुखास उपकेंद्र प्रमुख असे म्हणतात. साधारणतः तीन ते चार मतदान केंद्रांमागे एक समन्वय अधिकारी म्हणून नेमलेले असतात. बीड येथे जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके, तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी समन्वय अधिकारी म्हणून उत्तमरीत्या कर्तव्य बजावले . सर्व मतदान केंद्रावर प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका पोहोच करणे, मतदान केंद्रावर शांतता व सुव्यवस्था असल्याची खात्री करणे इत्यादी कामे समन्वय अधिकाऱ्यांची असतात.एकंदरीतच प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा शांततेत पार पडली.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## त्रिमूर्ती शाळेचे घवघवीत यश

वाळूज महानगर / प्रतिनिधी : शंभर शिक्षक क्लब जालनातर्फे आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये बजाजनगर येथील त्रिमूर्ती शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. इयत्ता दहावीमधून सायली गौतम अंभोरे हिने प्रथम क्रमांक पटकविला सहावीमधून नियती परमेश्वर खरात हिने द्वितीय क्रमांक मिळवला. आठवीमधून आर्यन कडूबा गटकाळ या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक मिळवला. याप्रसंगी शाळेचे मिलिंद खरात व हरी निकम या शिक्षकांची उपस्थिती होती. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विजयसिंग ठाकूर, अध्यक्ष दोदू महाजन, व्यंकटेश ठाकूर, मुख्याध्यापक प्रदीप आमले, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका रंजना घोडके यांनी कौतुक केले.

## रांजणगाव फाट्यावर हायमास्ट लावा

वाळूज महानगर ( प्रतिनिधी) : औद्योगिक वसाहतीतून रहिवासी भागात जाण्यासाठीच्या मुख्य मार्गावरील सर्वच सिग्नल गेल्या चार महिन्यांपासून बंद पडलेले आहेत. तसेच रांजणगाव फाटा येथे हायमास्ट नसल्यामुळे सायंकाळी ७ वाजेनंतर याठिकाणी अंधार होतो. सायंकाळी जनरल शिफ्ट सुटल्यावर याठिकाणी खूप गर्दी होते. 'महाराणा प्रताप चौक, मोरे चौक, एनआरबी कॉर्नर प्रमाणे रांजणगाव फाटा येथेही हायमास्ट दिवा लावावा अशी मागणी उद्योजक, कामगारांतून होत आहे.

## रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिगारे

वाळूज महानगर (प्रतिनिधी) नगर महामार्गावर असणाऱ्या वाळूज गावाच्या परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. कचऱ्याभोवती भटकी कुत्री कायम वावरतात. अचानक ही कुत्री वाहनासमोर आल्याने अपघात होत आहेत. ग्रा.पं. प्रशासनाने तत्काळ दुभाजकावरील कचऱ्याची विल्हेवाट लावावी, शिवाय कचरा टाकणाऱ्या परिसरातील व्यावसायिकांवर कारवाई करावी, अशी वाहनधारक व नागरिकांतून मागणी होत आहे.


## कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी प्रशासनासह विश्वस्त मंडळाने पुढाकार घ्यावा



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२ :- दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण येथून देशातील मोठी समजली जाणारी गोदावरी नदी प्रवाहित होऊन नांदेड मार्गे आंध्रातील राजमहेंद्री येथील सागरास मिळते. सन २०२६ मध्ये प्रयागराजला महाकुंभमेळा भरणार आहे. या पर्वावर नाशिक व पैठणला ही कुंभमेळा भरणार आहे.पैठण येथील कुंभमेळ्यातील गोदावरीत शाही स्नान करण्यासाठी संत,महंत, महाराज, महामंडलेश्वर,आचार्य अदि मान्यवरांसह लाखोंच्या संख्येने वर्षेभरातील स्नानासाठी भाविक लोटणार आहे. शासनाने या उत्सवात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी गोदावरीच्या काठावरील नाथसागर ते नागघाटापर्यंत सुरेख घाट बांधण्याचे नियोजन केले आहे. काही घाटांसाठी निधीही मंजूर केला आहे. वेळेवर घाटाचे बांधकाम होणे आवश्यक आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी आढावा बैठक घेणे आवश्यक आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाने यापूर्वी पैठण येथे पार पडलेल्या कुंभमेळ्याच्या बैठका घेतलेल्या आहे.स्थानिक प्रशासन, श्री संत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळ व नगर परिषदेने मराठवाड्यातील विविध वारकरी संघटनांना विश्वासात घेऊन व या उत्सवातील सर्व शाही स्नानासह विविध कार्यक्रम चांगल्याप्रकारे पार पाडण्यासाठी नियोजन बैठक घ्यावी अशी मागणी गोदावरी भक्तांनी केली आहे.

## एमजीएममध्ये अभिरुप न्यायालयाचे उद्घाटन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लिगल स्टडीज अँड रिसर्चच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या अभिरुप न्यायालयाचे (मुट कोर्ट) उद्घाटन ज्येष्ठ विधिज्ञ, खासदार कपिल सिब्बल यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. सिब्बल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, ॲड.एस.के.कदम, ॲड.विक्रम कदम, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर, संचालिका डॉ.झरताब अंसारी, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार सिब्बल म्हणाले, कायद्याचे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी अधिक बोलण्यापेक्षा ऐकण्याची सवय लावणे आवश्यक आहे. बहुतांशवेळा आपण दुसऱ्या व्यक्तीचे ऐकत नाहीत. या आपल्या न ऐकण्याच्या स्वभातून संघर्षाची सुरूवात होते. हे सगळीकडे असून यामध्ये राजकारण, समाज, कुटुंब, देश आदि सर्वांचा समावेश होतो. या मुट कोर्टच्या माध्यमातून आपण अनेक विषय सहजपणे सोडवाल, असा विश्वास मला वाटतो.

प्रत्येक विषयावर दोन किंवा अधिक मते मतांतरे असतात. आपल्या स्वत:च्या विचारापेक्षा आणि दृष्टिकोणापेक्षा इतरही दृष्टिकोण असू शकतात आणि या वेगळ्या दृष्टिकोणाला स्वीकारत आपण त्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. लोकं कायम बोलत असतात मात्र, या बोलण्याच्या प्रक्रियेत ऐकून घेण्याची आपली क्षमता नाहीशी होत आहे. जीवन जगत असताना तडजोड करणे आवश्यक असते. तडजोड करणे म्हणजे आपण आपले तत्व सोडून वागणे नव्हे तर समोरच्या व्यक्तीचे ऐकून घेणे असल्याचे खासदार सिब्बल यांनी यावेळी सांगितले.

मुट कोर्ट विषयी माहिती :

अभिरुप न्यायालय (मूट कोर्ट) कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी बनवले जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना एक समस्या देऊन त्यांना त्यांचे युक्तिवाद तज्ञासमोर मांडावे लागतात. मुट कोर्टामध्ये विद्यार्थ्यांनी प्रकरणाचा युक्तिवाद करण्यासाठी वकील म्हणून काम करणे अपेक्षित असते. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत मूल्यमापनासाठी मुट कोर्टच्या माध्यमातून सादरीकरण घेतले जाते.

## बांग्लादेशातील हिंदूंवर अत्याचार शिवसेना ठाकरे गटाची निदर्शने

छत्रपती संभाजीनगर : बांगलादेशातील हिंदू वर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाने आज क्रांती चौकात धरणे आंदोलन केले. यावेळी विरोधी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

यावेळी आ. दानवे म्हणाले की, बांग्लादेशात हिंदू समाजावर सातत्याने अत्याचार होत आहेत. अन्याय, अत्याचार व दडपशाहीने हिंदू समाज दहशतीखाली आहे. भारतीय ध्वज तिरंग्याचा अपमान करणाऱ्या धर्मद्वेषी बांग्लादेशींना प्रत्युत्तर देत हिंदू समाजाचा सन्मान टिकावा यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत. यावेळी कार्यकर्त्यांनी बांग्लादेशाचा ध्वज जाळून आणि रस्त्यावर तुडवून निषेध व्यक्त केला. याप्रसंगी करु नका हिंदू द्वेष.. शांत ठेवा बांग्लादेश.. इस्कॉन मानवतावादी, नाही दहशतवादी.. बांग्लादेशी हिंदूओ पर, हमले बंद करो.. बांग्लादेशी हिंदू के सन्मान में, शिवसेना मैदान में.. अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी जिल्हाप्रमुख राजू वैद्य, माजी महापौर नंदकुमार घोडेले, संतोष जेजुरकर, गोपाळ कुलकर्णी यांच्यासह अनेक पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

## पैठणला ग्रीन हार्टफुलनेस रन स्पर्धा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२:-: फिट इंडिया, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार व हार्टफुलनेस इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान येथे पर्यावरण जतन करणे, शांती, झाडे लावणे यासाठी ग्रीन हार्टफुलनेस रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. राम लोंढे, लोखंडे , लोळगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली . हार्टफुलनेस परिवारातील सदस्य तसेच पैठण येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने उस्फुर्त सहभाग घेतला. योगशिक्षिका ईश्वरी चव्हाण व योगशिक्षक संजय घोंगडे यांनी उपस्थितांसाठी योगा घेतला.



संस्थेचे वतीने प्रथम द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केलेल्या स्पर्धकांना डॉ किल्लारीकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले. जेष्ठ अभ्यासी विठ्ठलराव थोरात यांनी उपस्थितांना ध्यानाचे महत्त्व पटवून दिले.

पैठण केंद्र समन्वयक राधाकृष्ण कुंढारे सह. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाळासाहेब सोनवणे, शिवराज गायके, विशाल गवळी, अमित सूर्यवंशी, उमेश देशमुख, दशरथ खराद, श्रीराम काकडे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत घेर तसेच आभार प्रदर्शन भागिनाथ चव्हाण यांनी केले स्पर्धेत सुधाकर घोडके, रवी गुडदे ,रामदास रामावत,अभिजीत रामावत, विशाल गवळी, अमित सूर्यवंशी, रमेश नवगिरे, राजेश गवळी, शशिकांत रासने,ठोंबरे ,सपाटे, गाढे, पोकळे, अशोक जंगम ,विमल नवगिरे, वेणु भादीकर ,अन्नपूर्णा गायकवाड,छाया घेर, डॉ.अनुराधा गायकवाड ,वैष्णवी गायकवाड ,मनिषा सोनवणे, पुष्पलता थोरात आदी अभ्यासी सदस्यांनी सहभाग घेतला.

## श्री ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधीसोहळा भाविकांना उर्जा देतो : डॉ. विजयकुमार फड






संभाजीनगर - जगाला ज्ञानाचा प्रकाश देणारी संत श्री ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी ही वारकरी सांप्रदायाचा आत्मा असल्याने व या ग्रंथात उत्तमप्रकारे जीवनमार्ग दाखवला असल्याने आणि माऊलींच्या संजीवन समाधी सोहळयात माऊलींच्या साहित्याचा प्रसारी होत असल्याने हा सोहळा सर्व भाविकांना जबरदस्त उर्जा देतो, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन सोहळयानिमित्त आयोजित कार्यक्रमात फड बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, ज्ञानदेवांना सद्गुरू या नात्याने निवृत्तीनाथांनी ज्ञानाचा अथांग सागर सर्वांसाठी खुला करण्यास परवानगी देऊन समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. या उपकाराची परतफेड म्हणून का होईना, भाविकांनी श्रीज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, माऊलींचे स्फुट अभंग, श्री निवृत्तीनाथांचे अभंग प्रत्यक्षात आचरणात आणले पाहिजेत. संत जनाबाईंच्या, वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पाहावी पंढरी ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ।।, आणि संत नामदेवांच्या, नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी । एक तरी ओवी अनुभवावी ।। या अभंगाप्रमाणे हा ग्रंथ अनुभवण्याचा ग्रंथ आहे. ईर्षा, व्देष, मत्सर, क्रोध, अहंकार आदी विकारांनी भरलेल्या संसारामध्ये खऱ्या अर्थाने विश्रांती मिळवायची असेल तर संत एकनाथांच्या, स्मरतां निवृत्ती पावलो विश्रांती । संसाराची शांती झाली माझ्या ।। या म्हणण्याप्रमाणे श्री निवृत्तीनाथ व ज्ञानदेवांचे आणि त्यांच्या ग्रंथांचे स्मरण करण्याची गरज आहे. या सप्ताहात यावर्षी श्रीमद्भागवत सार, महाभारत सार, रामायण सार, हरिपाठसार, श्रीगीताज्ञानेश्वरी सार, भक्तविजयसार आणि समग्र ज्ञानेश्वरमाऊली सार या विषयावर दररोज दोन तास डॉ. फड यांनी प्रवचन केले. हा कार्यक्रम वारकरी सांप्रदायात आगळा वेगळा असल्याने खूप चर्चेचा विषय ठरला. आठ दिवस सर्व उपस्थितांना श्री ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, भजन, कीर्तन, हरिपाठ आणि महाप्रसादाचा लाभ दररोज मिळाल्याने हा सप्ताह आनंद देणारा ठरल्याचे भाविकांचे मत बनले, ही उत्तम बाब असल्याचे संयोजकांचे म्हणणे आहे. अशा सप्ताहाची सर्वत्र आवश्यकता असल्याचे फड म्हणाले.

## संकटात काम येतो तोच खरा मित्र : प्रदीप जी मिश्रा



खुलताबाद प्रतिनिधी : जो, संकटकाळी आपल्या कामाला येतो तोच खरा आपला खरा मित्रपरिवार असतो असे प्रतिपादन पंडित प्रदीप मिश्रा यांनी वेरूळ येथे शिव पुराण कथा समरूप प्रसंगी आपल्या मधुर वाणीतून आलेल्या लाखो भक्तांना केले वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर च्या पवन भूमीत संत जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या आश्रमातील भव्य अशा डोम मध्ये २४, नोव्हेंबर पासून सुरू असलेल्या शिव महापुराण कथेच्या समारोप दि ३० शनिवार रोजी हे झालं पाहिजे टाकीवर हे करू ते मला ते येणे काढतात इकडे येतो म्हणजे आपल्याला बातमी टाकून देते पंडित प्रदीप जी मिश्रा यांच्या उपस्थितीत झाला. मिश्रा म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज ना, महादेवाच्या भक्ती ची गोडी वेरूळ, येथेच लागली त्यामुळे वेरूळ ही पवित्र भूमी आहे या ठिकाणी अनेक साधुसंत व थोर पुरुष चे, पदस्पर्श झालेली पावन भूमी आहे वेरूळला खूप जुना धार्मिक इतिहास आहे यावेळी. नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्कताई महाराज . विधा वामदेव तीर्थ वासुदेव सरस्वती भरत महाराज गजानन बापू जनार्धन महाराज सोपान नरखेडे हितेश नरखडे डॉक्टर पार्क पल्लवी नरखेडे. उपस्थित होते.

## जवखेडा बु. राशेश्वर महादेव मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह

तभा वृत्तसेवा

नाचनवेल : दि .३. डिसेंबर- कन्नड तालुक्यातील जवखेडा बु.येथील राषेश्वर महादेव मंदिर येथे दि.५ ते १२ डिसेंबर अखंड हरीनाम सप्ताह व शिवमहापुरान कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिवमहापुरान सप्ताहाचा पंच क्रोशितील भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन जवखेडा बु. येथील तरूण मित्र मंडळ, हरिभक्त मित्र मंडळ व ग्रामस्थांनी केले आहे.

आठवडाभर चालणारा शिवमहापुरान कथेनिमित्त दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ४ते ६:३० काकडा, ९ ते १२ शिवमहापुरान कथा, दुपारी १२ ते ३ विश्रांती, ३ ते ५ शिवमहापुरान कथा, सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ, रात्री ७ ते ९ हरीकिर्तन, ९ ते १० भोजन पंगत,नंतर जागर होईल.

या कार्यक्रमात शिवमहापुरान कथा प्रवक्ते ह.भ.प.महादेव महाराज निपाणीकर हे कथा वाचन करणार आहेत.

दि ५ सायंकाळी ७ ते ९ गुरूवार रोजी ह.भ.प.सागर महाराज काचोळे, दि.६ शुक्रवार रोजी ह.भ.प.बाळु महाराज म्हस्के, दि.७ शनिवार रोजी ह.भ.प.विजय महाराज फंड, दि.८ रविवार रोजी ह.भ.प.पांडुरंग काका पळसकर, दि.९ सोमवार रोजी ह.भ.प. विठ्ठल महाराज उमरीकर, दि.१० मंगळवार रोजी ह.भ.प.परमेश्वर महाराज गोंदखेडा, दि.११ बुधवार रोजी ह.भ.प.त्र्यंबक महाराज काकडे, दि. १२ गुरूवार रोजी सकाळी ११ ते १ ह.भ.प.महादेव महाराज निपाणीकर यांचे काल्याचे किर्तन होईल या शिवमहापुरान सप्ताहाचा पंच क्रोशितील भाविकांनी श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन जवखेडा बु.सारोळा येथील ग्रामस्थांनी केले आहे.दरवर्षी या सोहळ्यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात.

## ट्रक टर्मिनल मोकळे असूनही ट्रक रस्त्यावर उभ्या; वाहतूक शाखेचे दुर्लक्ष







वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : वाळूज महानगर परिसरात एमआयडीसीच्यावतीने ट्रक पार्विंग करण्यासाठी जवळपास पाच एक्कर परिसरात पार्किंग हब तयार केले आहे. परंतु ट्रक चालक व ट्रान्सपोर्टचालक याकडे दुर्लक्ष करून रस्त्यावरच वाहने उभी करून रहदारीस अडथळा निर्माण करत आहेत. या प्रकाराकडे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

वाळूज औद्योगिक परिसर असल्याने राज्यातून मालाची आयात व निर्यात करण्यासाठी ट्रक येत असतात, त्यांच्या सोयीसाठी एमआयडीसीच्यावतीने कामगार चौकात जवळपास पाच ते सहा एक्कर परिसरात १९९९ मध्ये वाहनतळ उभारला आहे. सुरुवातीला काही दिवस ट्रक चालक व ट्रान्सपोर्ट मालक या पार्विंगचा वापर करून नियमांचे काटेकोरपणे पालन करत होते. परंतु गेल्या काही दिवसांपासून ट्रक टर्मिनल म्हणजेच वाहनतळ फक्त नावालाच उरले असून, अधिकृत वाहनतळ रिकामा असूनही त्यामध्ये वाहन पार्विंग न करता एमआयडीसी परिसरात जागोजागी रस्त्याच्या कडेला ट्रक पार्विंग केल्याचे चित्र दिसत आहेत. यामुळे बर्याचवेळा गंभीर स्वरुपाचे अपघातही घडलेले आहेत.

वाहतूक शाखेचे दुर्लक्ष

एमआयडीसी परिसर हा मोठा असल्याने या परिसरासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा विभाग स्थापन केलेला आहे. परंतु एमआयडीसीमधील वाहतूक शाखा फक्त सिग्नल व चौकात उभे राहून मोटारसायकल, माल वाहतूक करणार्या छोट्या रिक्षा आर्दीवर कारवाई करीत आहेत. तर विना नंबरच्या हावया, रस्त्याच्या कडेला सर्रासपणे दोन-दोन दिवस एकाच जागी उभ्या असलेल्या ट्रकांकडे मात्र दुर्लक्ष करतात, त्यामुळे परिसरातील नागरिक वाहतूक शाखेच्या या बेजबाबदारपणामुळे खूपच वैतागले आहे. कामगार चौकात वाहनतळाच्या आसपास रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या ट्रकांवर कारवाई केली तर पुन्हा रस्त्यावर वाहने उभे दिसणार नाही असे काही नागरिक व व्यावसायिक बोलून दाखवत होते.

## माजी कुलगुरू प्रा. शिवराज नाकाडे यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. शिवराज बशेट्टीअप्पा नाकाडे (वय ९१ वर्षे) यांचे रविवारी,१ डिसेंबर रोजी सकाळी हृदयविकाराने लातूर येथे निधन झाले. त्यांना श्रद्ांजली अर्पण करण्यासाठी विद्यापीठात सोमवारी, २ डिसेंबर रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात १९९४ ते १९९९ या कळत ते कुलगुरू म्हणून कार्यरत होते. अत्यंत शांत, संयमी व शिस्तप्रिय कुलगुरू म्हणून ते परिचित होते.

लातूर येथील दयानंद विधी महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून त्यांनी प्रदीर्घ सेवा दिली. राज्यशास्त्र, राज्यघटना, कायदा, तत्त्वज्ञान या विषयांचे गाढे अभ्यासक म्हणून त्यांची ओळख होती. दयानंद विधी महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य तसेच बसवेश्वर महाविद्यालयात त्यांनी काही काळ प्राध्यापक म्हणून सेवा केली. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. उदगीरच्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ते अध्यक्ष होते. शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान असलेल्या डॉ. शिवराज नाकाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून अनेक उपक्रम राबविले. त्यांनी विद्यापीठ व्यवस्थापनामध्ये अनेक नियम घालून शिस्त लावली. मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाचे सदस्य म्हणून त्यांचे योगदान राहिले आहे. चाकूर येथील औद्योगिक वसाहतीचे ते संस्थापक चेअरमन होते. विनाअनुदानित विधी महाविद्यालयांना शासकीय अनुदान मिळावे, यासाठी त्यांनी लढा दिला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच मराठवाड्यातील विधी महाविद्यालयांना शासकीय अनुदान मिळाले. त्यांच्या पार्थिवावर लातूर जिल्ह्यातील गंगापूर येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.

आज शोकसभा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.शिवराज नाकाडे यांना श्रद्ांजली अर्पण करण्यासाठी विद्यापीठात सोमवारी सकाळी १०:३० वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. कुलगुरू डॉ विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले सभागृहात प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## चार उमेदवारांनी भरले ईव्हीएम पडताळणीसाठी शुल्क

छत्रपती संभाजीनगर : मतदान यंत्रातील मतदानाची पडताळणी करण्यासाठी जिल्ह्यातील चार पराभूत मतदारांनी शुल्क भरले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे शुल्क भरत पडताळणीची मागणी या उमेदवारांनी केली आहे. एका उमेदवाराने मात्र शुल्क न भरल्याने त्याचा अर्ज प्रशासनाने बाद ठरवला. औरंगाबाद मध्य मतदारसंघातील शिवसेना उबाठाचे उमेदवार बाळासाहेब थोरात, न एमआयएमचे औरंगाबाद मध्य मतदारसंघातील उमेदवार नासेर सिद्दीकी, औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे आणि वैजापूर येथील शिवसेना उबाठाचे उमेदवार डॉ. दिनेश परदेशी यांनी १२ ईव्हीएम पडताळणीसाठी शुल्क भरले आहे. कन्नडचे अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांनी देखील अर्ज केला होता. मात्र त्यांनी पैसे भरल्याने त्यांचा अर्ज बाद ठरवण्यात आला. विधानसभा निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाले. या निकालानंतर अनेक उमेदवारांकडून ईव्हीएमबाबत आक्षेप घेतले जात आहेत. निवडणूक आयोगाच्या निकषानुसार पराभूत झालेल्या दुसरा आणि तिसऱ्या क्रमांकावरील उमेदवारास एकूण मतदान केंद्रांपैकी पाच टक्के केंद्रांच्या ईव्हीएम मशीनच्या पडताळ णीची मागणी करता येते.

## रवींद्र जगताप यांचे निधन



सोयगाव,दि.१ डिसेंबर : सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ)येथील माजी होमगार्ड रवींद्र हरिभाऊ जगताप (वय.५०) यांचे रविवारी मध्यरात्री २:००वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी ४:०० वा.गलवाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,नातवंडे,असा परिवार आहे. ते गलवाडा येथील पोलीस पाटील मिलिंद सोनवणे यांचे भाचे होत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मोती नगरात यात्रा माहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२ डिसेंबर -**

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी जय मल्हार खंडोबा देवस्थान मोती नगर, लातूर येथे खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे.

शनिवार दि.७ डिसेंबर रोजी शुभांगी सचिन मजगे यांच्या हस्ते अभिषेक होणार आहे. दुपारी १ ते ४ पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम,पालखी मिरवणुक सायंकाळी ५ वाजता व वाघ्या मुरळीचा कार्यक्रम होईल.

पहाटे ५ वाजता लंगर तोडण्याचा कार्यक्रम व सुनिता चाळक यांच्या हस्ते संध्याकाळी ५ वाजता पालीखीती आरती होणार आहे.



तरी सर्व लातूर शहरातील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन खंडोबा देवस्थान समितीचे अध्यक्ष नामदेव मामा चाळक, अमित खंडेलवाल, उपाध्यक्ष मनोज झंवर, सचिन खंडेलवाल, गणेश गवारे, जयराम सुर्यवंशी, अनिल धुमाळ, आरूण सुर्यवंशी भैरवनाथ कदम, प्रमोद काळे आदींनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तेजज्ञान फाउंडेशनच्या ध्यान महोत्सवाची उत्साहात सांगता

**उदगीर, दि.२ डिसेंबर -**

'हॅपी थॉट्स' नावाने ओळखल्या जाणाऱ्या तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन या आध्यात्मिक सेवाभावी संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त उदगीर येथे लॉयन्स नेत्र रुग्णालयाच्या सभागृहात १ डिसेंबर रोजी 'रजत जयंती ध्यान महोत्सव सोहळा' (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटीया व साहित्यिका अश्विनी निवर्गी यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात तेजज्ञान फाउंडेशनच्या बबिता साळुंखे यांनी फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांचा आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा परिचय करून देत केला. या कार्यक्रमात ८५ पेक्षा जास्त साधक आणि नागरिक सहभागी झाले होते. उपस्थितांनी मनोभावे कार्यक्रमाचा आनंद घेतला.



### आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनचा सत्कार

**लातूर, दि.२ डिसेंबर -**

राजस्थान जयपूर येथील श्री कल्पतरू संस्थान ही मागील तीस वर्षापासून निसर्ग आणि संस्कृती संवर्धनासाठी वाहिलेली संस्था असून पर्यावरण रक्षणासह विविध सामाजिक प्रश्नांसाठी स्वतःला समर्पित करून तळागाळात अर्थपूर्ण प्रयत्न करत आहे. या संस्थेच्या सार्थक प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून राजीव गांधी पर्यावरण पुरस्कार, अमृता देवी विश्नोई पुरस्कार, वनीकरण पुरस्कार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम नेशन बिल्डिंग पुरस्काराने संस्था सन्मानित झालेली आहे. श्री कल्पतरू संस्थानने २०४७ पर्यंत ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. (तोपर्यंत भारताला स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण होत असतील.) आणि याच क्रमाने नुकतेच मागील ३० वर्षांत एक कोटी रोपे लावण्याचे आणि जतन करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. शनिवार, ३० नोव्हेंबर रोजी जयपूरच्या इंदिरा गांधी पंचायती राज संस्था, जवाहरलाल नेहरू सभागृह येथे आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सदस्यांना ग्रीन आयडॉल अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री कल्पतरू संस्थांनचे अध्यक्ष विष्णू लांबा यांच्यासह केंद्रीय कृषिमंत्री भगवानदास चौधरी व महाराष्ट्र राज्याचे माजी वनमंत्री सुधीरखी मुनगंटीवार, तेलंगणा राज्याचे मंत्री संतोष कुमार यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.



### व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. सोनवणे

**लातूर, दि.२ डिसेंबर -**

व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ. सितम सोनवणे यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांची ही निवड व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, डिजिटल मीडिया विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, डिजिटल मिडीया विंगचे प्रदेश सचिव ईरशाद शेख यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून या संबंधीचे पत्र व्हाईस ऑफ मिडीयाचे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडीया यांच्याहस्ते त्यांना प्रदान करण्यात आले. यावेळी व्हाईस ऑफ मिडीयाचे लातूर जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, कार्याध्यक्ष शहाजी पवार, इलेक्ट्रॉनिक विंगचे राज्य उपाध्यक्ष दीपरत्न निलंगेकर, व्हा. ऑफ मिडीयाचे मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव, विठ्ठल कटके, रेवण मळभागे, प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, देडे, व्हा. ऑफ मिडीयाचे उपाध्यक्ष योगीराज पिसाळ, चाकूरचे तालुकाध्यक्ष विनोद निडवदे, जळकोट तालुकाध्यक्ष ॲड. अमोल कळसे आदी मान्यवर उपस्थित होते.



### आ. बनसोडे यांच्या मंत्रीपदासाठी उदागिर बाबा चरणी साकडे

**उदगीर, दि.२ डिसेंबर -**

उदगीरचे आ. संजय बनसोडे पुन्हा एकदा मंत्री व्हावेत म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, स्व. रामचंद्र पाटील तळेगावकर तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले यांनी उदगीर नगरीचे ग्रामदैवत उदागिरबाबा चरणी महापूजा व आरती करून साकडे घातले. यावेळी उपस्थित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमोद कुलकर्णी, रामकिशन नादरगे, साईनाथ चीमेगावे, सुरेंद्र अकनगिरे, बालाजी परगे, विजयकुमार येडले, युवराज कांडगिरे, करण गायकवाड, वीरेंद्र नादरगे, प्रतीक पाटील आदी उपस्थित होते.

# 'मतदार संघ माझे कुटुंब' याच भावनेतून सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार : आ. रमेश कराड

## खरोळा जि.प. सर्कलच्या वतीने आमदार कराड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२ डिसेंबर -**

लातूर ग्रामीण मतदार संघात विकास कामे करताना आजपर्यंत कधीही जात, धर्म पाहिला नाही यापुढील काळातही संपूर्ण मतदारसंघ हेच माझे कुटुंब याच भावनेतून मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार आहे. कार्यकर्त्यांनीही सर्व समाज घटकांना सोबत घेऊन गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेश कराड यांचा घवघवीत यश संपादन करून नवा इतिहास घडविल्यानंतर आज रविवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेश कराड यांचा खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील विविध गावातील भाजपासह महायुती कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष वसंत करमुडे, सुरेंद्र गोडभरले यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

या सत्कार कार्यक्रमास भाजपासह महायुतीचे कार्यकर्ते मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे उपकार मी कदापी विसरू शकत नाही. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून काम केले. केलेल्या प्रयत्नाला यश आले याबद्दल सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करून यावेळी बोलताना आ. रमेश कराड म्हणाले की, विधानसभेची ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशीच झाली. या लढाईत धनशक्तीचा पराभव होऊन जनशक्तीचा विजय झाला आहे.

देशमुख यांनी अनेकांना विकत घेण्याचा प्रयत्न केला मात्र माझा गरीब कार्यकर्ता विकला गेला नाही. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून या निवडणुकीत गावागावात भाजपाला कशा पद्धतीने मताधिक्य मिळेल यासाठीच प्रयत्न केले कार्यकर्त्याच्या मेहनतीने आणि लाडक्या बहिणीच्या आशीर्वादाने आपल्याला हे यश मिळाले आहे.

गेल्या १५-२० वर्षापासून बलाढ्य शक्तीच्या विरुद्ध गोरगरीब सामान्य माणसाच्या हितासाठी संघर्ष केला या संघर्षाला कार्यकर्त्यांनी साथ दिली. विधान परिषदेचा आमदार या नात्याने काम करत असताना मतदार संघात शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि गावागावातील विकास कामांना गती दिली.



आता विधानसभा आमदारकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवू लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ एक विकासाचे मॉडेल मतदार संघ निर्माण करू असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात आणि राज्यात आपले सरकार असल्याने गोरगरीब सर्वसामान्य गरजू प्रत्येक व्यक्तीपर्यंत विकास पोहोचला पाहिजे यासाठी आपण सर्वजण काम करू. येणाऱ्या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत, सोसायटीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका जिंकायच्या आहेत आज माझ्यासाठी काम केले येणाऱ्या काळात कार्यकर्त्यांना मान सन्मान निवडून देण्यासाठी पदावर बसविण्यासाठी काम करणार असल्याचे आ. रमेश कराड यांनी बोलून दाखविले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस तोडणीबाबत भीती बाळगण्याचे अथवा घाबरण्याची गरज नाही मी तुमच्या पाठीशी आहे. आडवणूक अथवा पिळवणूक होवू देणार नाही साखर कारखान्यांनी ऊस तोडणी कार्यक्रमांनुसारच शेतकऱ्यांच्या उसाची तोडणी करावी जोपर्यंत कारखाना कार्यक्षेत्रात ऊस आहे. तोपर्यंत कार्यक्षेत्राबाहेरील गेटकेनचा ऊस येता कामा नये यासाठी आपण निश्चितपणे प्रयत्न करू अशीही ग्वाही आ. कराड यांनी यावेळी बोलताना दिली.

प्रारंभी महेंद्र गोडभरले यांनी प्रास्ताविक केले तर नवनाथ भोसले यांनी सविस्तर मनोगत व्यक्त करून रमेश आमदार व्हावेत हे अनेक वर्षापासून कार्यकर्त्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले असल्याचे बोलून दाखविले.

## औसा शहरातील मोकाट कुत्र्यांना आवर घालण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ डिसेंबर -**

पिसाळलेले आणि झुंडीतील मोकाट कुत्र्यांचा वावर नुसता वाढला नाही. तर शहरवासियांना चावा घेत फिरत आहेत. यामुळे घराबाहेर पडणे धोक्याचे झाले असून यामध्ये लहान मुले व वृध्दांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.

अनेकवेळा बंदोबस्ताची मागणी करुनही याकडे पालिका प्रशासन डोळेझाक करीत आहे. औसा नगरपालिकेने शहरातील मोकाट कुत्र्यांना तात्काळ आवर घालावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा मुझ्झफरअली इनामदार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

औसा शहरात व परिसरात मोकाट कुत्र्यांची होत असलेले वाढ शहरातल्या नागरीकांसाठी खुप मोठी समस्या झाली आहे. रात्री उशीरा घराबाहेर पडायचे असेल किंवा बाहेरुन घरी परतायचे असेल तर मोकाट कुत्र्यांचे मोठे झुंड अंगावर येत चावा घेत आहेत. अनेक नागरिकांनी शासकीय ग्रामिण रुग्णालयात उपचार घेतला आहे. तर आजपर्यंत शेकडो जणांनी खाजगी रुग्णालयात उपचार केले आहेत. याकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे.

या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त व्हावा. यासाठी वेळोवेळी निवेदन दिले आहे. तसेच याबाबत खा. ओमराजे निंबाळकर यांनी पत्राद्वारे बंदोबस्त करण्यास सांगितले होते. परंतु त्यावर नगरपालिकेने कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जाणिवपुर्वक याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

## निटूर मोड येथे २३ हजार रुपयांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२ डिसेंबर -**

शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या निटूर मोड येथे स्वतःच्या फायद्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखु जन्य सुगंधी गुटखा निटूर ते लातूर जणाऱ्या रोडलगत असलेल्या प्रसाद कन्फेश्नरी दुकानासमोर निटूर मोड येथे आरोपी प्रशांत भगवान डांगे यांनी विक्रीसाठी ठेवला होता. या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

शिरूर अनंतपाळ पोलीसांनी दिलेली माहिती अशी कि दि.१ डिसेबर रोजी दुपारी ३ च्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने



निटूर मोड (ता. निलगा जि. लातूर) येथे विक्री साठी आपल्या दुकानात निटुर ते लातूर जणाऱ्या रोड लगत असलेल्या प्रसाद कन्फशानरी दुकानासमोर निटुर मोड येथे आरोपी प्रशांत भगवान डांगे यांनी विक्रीसाठी ठेवला होता. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला अन्नपदर्थ हा मानवी जिवीतास धोकादायक असल्याचे माहित असताना शुद्धा सुगंधी पान मसाला, रजनीगंधा, विमल पान मसाला, तंबाखू, सुगंधित तंबाखू अशा जवळपास २३ हजार १२४ रुपयांचा माल लातूर येथील स्थानीक गुन्हा शाखेचे पोलीस कॉन्सटेबल राहूल श्रीरंग कांबळे यांनी माल जप्त केला.

याप्रकरणी आरोपी प्रशांत भगवान डांगे (रा. निटूर) यांच्या विरुद्ध फिर्यादी राहूल श्रीरंग कांबळे पो.का. स्थानीक गुन्हा शाखा लातूरच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक विठ्ठलराव दराडे करीत आहेत.



## लातूर कॉलेज ऑफ फार्मसीत जागतिक एड्स दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ डिसेंबर -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला आहे .या दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली. तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे यांनी यावेळी रलीचे उद्घाटन केले. सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रलीची सुरुवात करण्यात आली. भारत सरकार व महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमानुसार मानव जातीमध्ये अनेक प्रकारचे संसर्गजन्य रोग होत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज जागतिक एड्स दिनानिमित्त महाविद्यालयात एड्स निर्मूलन जनजागृती रॅली उपक्रम सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने घेण्यात आला.

या रोगाबद्दल प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी विद्यार्थ्यांना एड्स होण्याचे कारणे, लक्षणे व उपाय मनोगत व्यक्त करताना सांगितले. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित प्रा. माधुरी पोलकर, प्रा. शबनम शेख, सुप्रिया जाधव, प्रा. मनकरणा कराळे, प्रा. अतुल कदम, चैतन्य पवार, शबिर शेख यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

## यशदा चे डॉ. बबन जोगदंड यांचा पीएचडीबद्दल सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२ डिसेंबर -**

यशदा पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांना नुकतीच 'लोकप्रशासन' या विषयात पी.एच.डी. पदवी मिळाल्याबद्दल व त्यांनी आतापर्यंत २५ हून अधिक पदव्या संपादन केल्याबद्दल अहमदपूर येथील अंनिस कार्यकर्ते यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

डॉ. बबन जोगदंड साहेब यांनी आतापर्यंत पंचवीस पदव्या प्राप्त केल्याने त्यांची लिमकाबुक मध्ये नोंद झाली आहे. ते यशदामध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना आज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे ही दुसरी पीएचडी प्राप्त झालेली आहेफ त्याबद्दल सत्कार करण्यात आला.

डॉ. बबन जोगदंड यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या ते म्हणाले जीवनामध्ये मोठं व्हायचं असेल तर मोठी स्वप्न पाहावीतफ त्याचबरोबर संवाद कौशल्य, इंग्रजी भाषा, तंत्रज्ञान, आत्मविश्वास आणि कष्ट ही पंचसूत्री जीवनामध्ये अंगीकारावीत, असे ते म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भालचंद्र आलापुरे, शिक्षा अभियानाचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास ढवळे, नांदेड जिल्हा परिषदचे जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे, अनिसचे मेघराज गायकवाड, जोगोलकिशोर शर्मा, पुजा गायकवाड, अमीत गाजरे, संतोष जावळे, जगदिश पेनलेवाड, आत्माराम गुटे, डि.जे. वाघमारे, रुपेशकुमार कांबळे, प्रशांत क्षिरसागर, दयानंद जाधव, शिवहार कसनुरे यांची उपस्थिती होती.

## आ. अभिमन्यू पवारांना मंत्रीपद मिळण्यासाठी हनुमान मंदिरात महाआरती



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२ डिसेंबर -**

औसा विधानसभा मतदार संघातून महायुतीतील भाजपाचे आ. अभिमन्यू पवार यांनी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला असून राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्रीपद मिळावे. यासाठी भाजपाचे शहराध्यक्ष सुनील उटगे यांच्या हस्ते शहरातील संभाजीनगर येथील हनुमान मंदीरात महाआरती करण्यात आली.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा येथील प्रचारसभेत तुम्ही विजयरुपी आशिर्वाद द्या. तुमच्या तालुक्याला लाल दिवा देतो, असे आश्वासन औसेकरांना दिले होते. यावेळी मतदारांनी माजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून अभिमन्यू पवार यांना २७ हजार मतांनी निवडून दिले होते.

मात्र राज्यातील सत्तेच्या घडामोडीत औशाचे मंत्रीपद हिरावले गेले होते. यानंतर पाच वर्षांनी बारा दिवसापुर्वीच विधानसभेच्या निवडणुका झाल्या.

यावेळी तरी लाल दिवा मिळून अनेक दशकांचा दुष्काळ संपेल अशी अपेक्षा ठेवून औसा मतदारसंघातील मतदारांनी ३४ हजाराचे अधिक मताधिक्य देत विजयी केले आहे. तसेच यावेळी राज्यातील राजकीय परस्थिती वेगळी असून या निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा मिळवलेल्या आहेत. यामुळे सत्तेत महायुतीकडून सरकार स्थापन करण्याच्या हालचालींनी वेग वाढला आहे.

राज्यात होणाऱ्या महायुतीच्या सत्तातरांत आ. अभिमन्यू पवार यांना मंत्रीपद मिळावे. यासाठी कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी देव पाण्यात ठेवले आहेत. कांहीनी आपआपल्या गावातील कुलदेवतांना साकडे घातले आहेत. व कांहीनी पुजा केली आहे. तर औसा शहरवासियांच्या वतीने शनिवार दि.३० रोजी शहरात महाआरती करण्यात आली. आज औशातील संभाजीनगर येथील हनुमान मंदीरात भाजपाचे शहराध्यक्ष सुनील उटगे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

भाजपाचे जेष्ठ नेते सुशील बाजपायी, कंठाप्पा मुळे, ॲड. अरविंद कुलकर्णी, प्रदीप मोरे, संतोष चिकुर्डेकर, समीर डेंग, शिवरुद्र मुर्गे, जयराज कारंजे, अचुत्य पाटील, गोविंद मोरे, शिवशंकर मोरे, आबा बनसोडे, नितीन शिंदे, विकास कटके, गणेश जाधव, अमित राचट्टे, संगमेश्वर इळेकर, हणमंत मोरे, सुधाकर शिंदे, नरशिंग जाधव, विजय नलगे, किशोर पवार, विष्णु कुरपे, किरण दुरुगकर, कमलाकर दुरुगकर, दानेश कासार, ॲड. पाटील, सागर जाधव, काशीराम शिंदे शहरातील महिला व नागरिक यावेळी उपस्थित होते.

## बोरा कुटुंबाचे दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

**लातूर, दि.२ डिसेंबर -**

येथील ज्येष्ठ चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) तेजमलजी बोरा (वय ९२) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले सोमवारी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लातूर येथील बोरा कुटुंबाच्या निवासस्थानी भेट देऊन स्वर्गीय तेजमलजी बोरा यांच्या प्रतिमेला आदरांजली वाहिली बोरा कुटुंबाचे सांत्वन केले त्यांच्या कार्याच्या आठवणीचा उजाळा दिला.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मण मोरे, संजय बोरा, सतीश बोरा, श्रेयस बोरा, किर्ती भुतडा, सोमनाथ रोडे, डॉ. हंसराज बाहेती, वसंतराव पाटील जयप्रकाश दगडे आदी बोरा कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.